# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ६६

## सभावृत्तांत

दिनांक – २०.१२.२०१६ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे डिसेंबर-२०१६ ची मासिक मा.महापालिका सभा मंगळवार दि.२०.१२.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.पात्रे राम संभाजी

३. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

४. मा.खाडे तानाजी विठ्ठल

५. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

६. मा.आर.एस.कुमार

७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

८. मा.तरस बाळासाहेब जयवंत

९. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

१०. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

११. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

१२. मा.मडिगेरी वर्षा विलास

१३. मा.सावळे सिमा रविंद्र

१४. मा.कदम सदगुरु महादेव

१५. मा.गिता सुशील मंचरकर

१६. मा.कैलास महादेव कदम

१७. मा.शेंडगे आशा सुखदेव

१८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

२०. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.गावडे-सहआयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक,मा.चव्हाण-शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टिकर-सहा.आयुक्त,मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.लडकत, मा.बरशेट्टी,मा.मोरे-कार्यकारी अभियंता,मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**------**

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, ऐनवेळचे दोन विषय आहेत त्यामध्ये स्पोर्टसचा विषय घेतला नाहीतरी आम्ही मान्य करु पण परंतु कोर्टाने ऑर्डर केलेली आहे उद्या कोर्टाने ताशेरे ओढायला नकोत की, आम्ही सांगून सुद्धा तुम्ही विषय घेतला नाही. तरी त्याची खात्री करुन घ्यावी.

**मा.नगरसचिव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची प्रकरण दोन नियम १ (के) प्रमाणे ऐनवेळचा विषय सभाकामकाजात दाखल करुन घ्यायचा असेलतर “कोणत्याही सभेपुढे कोणतेही तातडीचे कामकाज आणण्यास अशा सभेत उपस्थित असलेल्या पालीका सदस्यां पैकी निदान ३/४ पालीका सदस्यांनी असे ३/४ सदस्य हे, पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या १/४ पेक्षा कमी असता कामा नयेत. अनुमती दिली नसेलतर, असे कोणते कामकाज अशा सभेपुढे आणता येणार नाही” अशी तरतूद आहे. त्यामुळे किमान ३२ सन्मा.सदस्यांचा ऐनवेळचा विषय दाखल करुन घेण्यास पाठींबा लागेल परंतु मा.कोर्टाचे आदेश असल्यामुळे कायदासल्लागार याबाबत सांगू शकतील.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण सांगीतलेल आम्हाला मान्य आहे. परत उदया कोणी अस म्हणू नये की कोर्टाचा अवमान झालेला आहे. त्यामुळे हा खुलासा करावा ही विनंती.

**मा.दुधेकर - (सह शहर अभियंता पापु ) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. नगरसचिव साहेबांशी चर्चा केल्या प्रमाणे उदया स्टॅण्डींगला विषय घेवून स्टॅण्डींगकडून ठराव जीबीला पाठवता येईल. जीबीच्या उमेदमान्यतेवरती उदया मंजूरी घेऊन जीबी कडे तो ठराव पाठवता येईल.

**मा.गोरक्ष लोखंडे -** मा.महापौर साहेब, तमिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता यांचे निधनानंतर आत्मदहन झालेले नागरीक, फिडेल कॅस्ट्रो-क्यूबाचे माजी अध्यक्ष,जयललिता जयरामन- उर्फ जे.जयललिता (अम्मा) तमिळनाडूच्या मुख्यमंत्री, सौरभ नंदकिशोर फराटे-जम्मू काश्मिरमधील पाम्पोर येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्यात शहीद झालेले लान्स नाईक,कुणाल गोसावी व संभाजी कदम -दहशतवादी हल्ल्यामध्ये हुतात्मा झालेले मेजर व लान्सनाईक,दिलिप पाडगांवकर-ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक,आनंद यादव-ज्येष्ठ साहित्यिक,सुलभा ब्रम्हे-ज्येष्ठ अर्थतज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या, भीमाबाई ठोमगीरे या मान्यवरांचे नुकतेच दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.राम पात्रे -** मा.महापौर साहेब,सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.मंगलाताई कदम -**मा.महापौर साहेब, आजची सभा गुरुवार दि.२२/१२/२०१६ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.गिता मंचरकर** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर-**सन्मा.सदस्यांचे विनंतीला मान देऊन आजची सभा गुरुवार दि.२२/१२/२०१६ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ६६</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०.१२,२०१६ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २२.१२.२०१६</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक २०/१२/२०१६ (माहे डिसेंबर-२०१६) ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२२.१२.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
५. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
६. मा.जाधव साधना रामदास
७. मा.आल्हाट मंदा उत्तम
८. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
९. मा.पात्रे राम संभाजी
१०. मा.बाबर शारदा प्रकाश
११. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१२. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१३. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१४. मा.पवार संगीता शाम
१५. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
१६. मा. तानाजी विठ्ठल खाडे

१७. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

१८. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

१९. मा.आर.एस.कुमार

२०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२१. मा.नंदा विकास ताकवणे

२२. मा.नेटके सुमन राजेंद्र

२३. मा.तरस बाळासाहेब जयवंत

२४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

२५. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

२६. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

२७. मा.लोंढे गणेश नारायण

२८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

२९. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३१. मा.अपर्णा निलेश डोके

३२. मा.अनंत सुभाष को-हाळे

३३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

३४. मा.पवार मनीषा काळूराम

३५. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

३६. मा.काळभोर वैशाली जालिंदर

३७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

३८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

३९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४०. मा.वाबळे संजय मल्हारराव

४१. मा.मडिगेरी वर्षा विलास

४२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

४३. मा.सुपे आशा रविंद्र

४४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

४५. मा.मोहिनीताई विलास लांडे

४६. मा.गोफणे अनुराधा देविदास

४७. मा.सावळे सिमा रविंद्र

४८. मा.भोसले राहूल हनुमंतराव

४९. मा.पालांडे सुजाता सुनिल

५०. मा.बहल योगेश मंगलसेन

५१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

५२. मा.कदम सदगुरु महादेव

५३. मा.गिता सुशील मंचरकर

५४. मा.छाया जगन्नाथ साबळे

५५. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

५६. मा.टाक अरुण मदन

५७. मा.आसवाणी सविता धनराज

५८. मा.वाघेरे सुनिता राजेश

५९. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६०. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६१. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

६२. मा.काळे विमल रमेश

६३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

६४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

६५. मा.विमलताई सुरेश जगताप

६६. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

६७. मा.बारणे निलेश हिरामण

६८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६९. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदू बारणे

७०. मा.बारणे माया संतोष

७१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

७२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

७३. मा.चौंधे आरती सुरेश

७४. मा.बोकड रामदास गेणभाऊ

७५. मा.जवळकर वैशाली राहु ल

७६. मा.जगताप राजेंद्र गणपत

७७. मा.शितोळे शैलजा बाबुराव

७८. मा.प्रशांत शितोळे

७९. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

८०. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८१. मा.शेंडगे आशा सुखदेव

८२. मा.संजय केशवराव काटे

८३. मा.पाटील सुजित वसंत

८४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप -नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा,पाटील, मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.माने,मा.खोसे, मा.दंडवते,मा.कडूसकर,मा.माछरे,मा.दुरगुडेमा.आष्टीकर,मा.बोदडे-सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.सवणे, मा.कुलकर्णी,मा.बरशेट्टी,मा.कांबळे,मा.रत्नपारखी-कार्यकारी अभियंता,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच इंडियन रोड काँग्रेसच्या कौन्सिल मेंबरपदी आपल्या महापालिकेचे सहशहर अभियंता श्री.राजन पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. पालीकेच्या दृष्टिने ही अतीशय गौरवाची बाब आहे. हैद्राबाद येथे ७७ व्या अखिल भारतीय अधिवेशन दि.१५ डिसेंबर ते १९ डिसेंबर या दरम्यान भरले होते सदर अधिवेशनात म्युनिसिपल कॉर्पोरेशन इन्स्ट्रूमेंट डेव्हलपमेंट ऑथोरेटी व कँटोनमेंट बोर्ड यामधून ऑल इंडिया लेव्हलवर एक प्रतिनिधीची निवड होत असते. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सह शहर अभियंता श्री.राजन पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याचा कार्यकाळ एक वर्षाचा आहे. या निवडीबद्दल त्यांचा मा.महापालिका सभेत सत्कार करण्यात यावा.

**मा.कैलासभाऊ थोपटे** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, मा.गटनेते यांच्या हस्ते श्री.राजन पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.)

अ) मा.महापालिका सभा क्र-६१ दि.२०/७/२०१६, दि.५/८/२०१६ (दु.२.०० व २.२०) व दि.२०/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्र-६२ दि.२०/८/२०१६, दि.२३/८/२०१६ (दु.२.०० व २.२०) व दि.२९/८/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.नगरसचिव** - प्रश्नोत्तरे - मा.वर्षा विलास मडिगेरी यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर-** प्रश्नोत्तराचे वेळी प्रश्न विचारणारे सदस्य मा.वर्षा विलास मडिगेरी या सभागृहात हजर नसल्याने त्यांचे प्रश्न वगळणेत येत आहेत.

------

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-१

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.९११ दि.२९/८/२०१६

४) मा.महापालिका ठ.क्र.९२६ दि.२८/११/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील आरक्षण क्र१/१३३ यामध्ये शाळेचे आरक्षण एकुण क्षेत्र १८००० चौ.मी. आहे. या क्षेत्रापैकी ४७५४ चौ.मी. क्षेत्र हे महानगरपालिकेने FSI/TDR बदल्यात ताब्यात घेतले आहे. उर्वरीत क्षेत्राचा ताबा सुभद्राज्

एज्युकेशनल सोसायटी पुणे यांचेकडे आहे. आरक्षणाचे संपुर्ण क्षेत्र माध्यमिक शाळा आरक्षण तरतुदीन्वये विकसित करणेसाठी महानगरपालिकेच्या ताब्यातील ४७५४ चौ.मी. जागा जागेसाठी नगररचना विभागाने ठरविलेल्या दरानुसार ३० वर्ष कालावधीसाठी ई-निविदा नोटीस क्र.१/२०१६-१७ अन्वये दर मागविणेत आले होते. (निविदा रक्कम रुपये २,५१,४८,६६०/-) सदर कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांची एकमेव निविदा पात्र ठरली असून त्यांनी सदरकामी निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% जास्त असा दर सादर केला आहे. सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे या निविदाधारकांची निविदा निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त रक्कम रुपये २,५२,७४,४०३/- (अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी बावन्न लाख चौ-याहत्तर हजार चारशे तीन फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्ष कालावधीसाठी लीज दराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.गीता मंचरकर** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ९६१ विषय क्रमांक-१

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.९११ दि.२९/८/२०१६

४) मा.महापालिका ठ.क्र.९२६ दि.२८/११/२०१६

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९६२ विषय क्रमांक-२

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१५/कावि/५६०/२०१६ दि.१५/१०/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१८३०२ दि.२९/११/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील वर्ग १ ते वर्ग ४ चे अधिकारी/कर्मचारी यांना सन १९७९-८० पासून शासन निर्णयाच्या आधारे महानगरपालिका ठराव व स्विकृत धोरणानुसार घरबांधणी, भुखंड, घरदुरुस्ती, घरविस्तार अग्रिम दिले जात आहे. सद्यस्थितीत शासन निर्णय क्रमांक घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२० फेब्रुवारी २०१५, शासन शुध्दीपत्रक क्रमांक घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२९ फेब्रुवारी २०१६, मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक.१६३३९ दिनांक ३१/०५/२०१६ व मा.महापालिका सभा ठराव क्रमांक.८८१ दिनांक.२०/०६/२०१६ अन्वये तसेच क्र.प्रशा/१५/कावि/ ४११/२०१६ दि.५/०८/२०१६ चे परीपत्रकानुसार घरबांधणी अग्रिमासंदर्भात धोरण निश्चित केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघ यांनी दि.२१/०९/२०१६ चे पत्रान्वये घरबांधणी अग्रिम मूळ मासिक (वेतन बॅंड मधील वेतन+ग्रेड वेतन) वेतनाच्या ८५ टक्के ऐवजी १००% टक्के करणेकामी मागणी केलेली आहे. त्यानुसार घरबांधणी/भुखंड/ घरदुरुस्ती/राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणेकामी घरविस्तार अग्रिम परिपत्रक क्र.प्रशा/१५/कावि/४११/२०१६ दि.५/०८/२०१६ मधील मुददा.क्र.८ मधील अ.क्र.१ मध्ये २० वर्षानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मूळ मासिक (वेतन बॅंड मधील वेतन+ग्रेड वेतन) वेतनाच्या ८५ टक्के ऐवजी १०० टक्के अशी सुधारणा करणेस तसेच मा.महापालिका सभा ठराव क्रमांक.८८१ दिनांक २०/०६/२०१६ अन्वये तसेच क्र.प्रशा/१५/कावि /४११/२०१६ दि.५/०८/२०१६ चे परिपत्रकानुसार घरबांधणी अग्रिमासंदर्भात निश्चित केलेल्या धोरणानुसार घरविस्तार अग्रिम अदा केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या १० पेक्षा कमी असलेने या कर्मचाऱ्यांना सुद्धा त्यांचा सेवा कालावधी २० वर्षापेक्षा अधिक असल्यास त्यांना ८५ टक्के इतके अग्रिम मंजूर केले असलेतरी अशा कर्मचाऱ्यांनाही सुधारित धोरणानुसार १०० टक्के अग्रिम मंजूर करण्यास व फरकापोटी १५ टक्के अथवा योग्य ती उर्वरीत घरबांधणी अग्रिम रक्कम स्वतंत्रपणे पुरवणी आदेशानुसार अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-३

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/५५७/२०१६ दि.४/११/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१८६९७ दि.२९/११/२०१६

माहिती व जनसंपर्क विभागाकडील सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रसिध्दी या लेखाशिर्षावर र.रू.२,००,००,०००/- इतकी तरतूद करणेत आली होती. दि.२८/१०/२०१६ अखेर सदर लेखाशिर्षावर र.रू.१,००,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण व इतर विभागाकडील प्रलंबित जाहिरात बिलांची संख्या जास्त असून त्यासाठी र.रू.५०,००,०००/- इतकी तरतूद आवश्यक आहे. सदरची रक्कम नागरवस्ती विकास विभागाकडील "अंतविधीसाठी आर्थिक मदत" या लेखाशिर्षातून रक्कम रूपये ५०,००,०००/- "प्रसिध्दी" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व अनुसुची प्रकरण ७ मधील २ (२) (ब) नुसार मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रतिभा भालेराव** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये मनपाचे सर्व विभागांकडील वृत्तपत्रांची बिले अदा करणेकामी प्रसिध्दी या लेखाशिर्षावर र.रु. २,००,००,०००/- इतकी तरतूद करणेत आली होती. सदर लेखाशिर्षावर र.रु. ५,००,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण, विदयुत, पर्यावरण इ. विभागांकडील प्रलंबीत बिलांची संख्या लक्षात घेता त्यासाठी र.रु. ८०,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदरची तरतूद पशुवैदयकीय विभागाकडील "श्वान संतती नियमन" या लेखाशीर्षावरील र.रु. ३,००,००,०००/- तरतूदी मधुन र.रु. ८०,००,०००/- एवढी तरतूद प्रसिध्दी या लेखाशिर्षावर वर्ग करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व अनुसूची प्रकरण ७ मधील २(२) (ब) नुसार मान्यता देण्यात यावी. तसेच भारत विरुध्द न्यूझीलंड, डेविस कप (लॉन टेनिस) स्पर्धा २०१७ बालेवाडी पुणे स्पर्धा आयोजनाकरिता महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन यांचेशी करारनामा करुन त्यांना अटी व शर्ती शिथिल करुन शासन मान्यतेने, आर्थिक सहाय्य र.रु. २५,००,०००/- अदा करणेस व सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रकात, क्रिडा विभागाचे मैदानी खेळ (ॲथलेटिक्स) क्रिडा साहित्य खरेदी या लेखार्शीर्षावर तरतुद र.रु. २५,००,०००/- उपलब्ध करुन या तरतुदीतून सदर आर्थिक सहाय्य खर्ची टाकणेस मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील विशेष योजना पान क्र. १९ अनु.क्र.७ या

कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेबाबत सन २०१६-१७ चे सुधारित व २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद प्रमाणे मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | पान क्र. | कामाचा अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. | सन २०१६-१७ ची तरतूद | वाढ करावयाची अंदाजपत्रकीय र.रु. | वाढ करावयाची तरतूद र.रु. २०१६-१७ | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९ | ७ | महिंद्रा कंपनीच्या जागेत मुख्य कार्यालयाची विस्तारीत इमारत बांधणे. | ५००००००००० | १००००० | २३००००००००० | १००००० | विशेष योजना |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग कार्याक्षेत्रातील प्रभाग क्र ३ मोरेवस्ती चिखली प्रभागातील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे निविदा काढणेत आलेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा क्रमांक | निविदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ चिखली धर्मराजनगर व बगवस्ती व इतर ठिकाणी रस्ते विकसीत करणे | २०/१२२-२०१६-१७ | ५५,८३,८४५/- |
| २ | फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत साने चौक ते चिखली चौक या रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २०/५१-२०१६-१७ | ५६,००,०५६/- |
| ३ | प्रभाग क्र. ३ चिखली येथील शेलारवस्ती | ४४/४२-२०१६-१७ | ४६,६८,३३९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | येथील MIDC भागातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | | |
| ४ | प्रभाग क्र.३ चिखली येथील सोनवणे वस्ती व रामदासनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणे करणे. | ४४/२९-२०१६-१७ | ४६,६८,३३९/- |

तथापि सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार प्रभाग क्र. ३ मधील साने चौक ते चिखली गावठान चौक पर्यंतच्या सुमारे २.४० कि.मी. रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी शिफारस केली आहे. सदर रस्त्याची लांबी २.४० कि.मी. रुंदी (सरासरी ९.०० मी.) इतक्या लांबीचे डांबरीकरण करावयाचे झाल्यास सदर कामांच्या व्याप्तीत बदल करणे आवश्यक आहे. सदर कामांच्या एकत्रित रक्कमेतून साने चौक ते चिखली चौकापर्यंतच्या रस्त्याचे काम करणेस मान्यता देणेत यावी. तसेच दि.९/१०/२०१६ रोजी सकाळी ९.०० वाजता संजय गांधीनगर, पिंपरी येथील झोपडपट्टी मध्ये शॉर्टसर्कीटमुळे आग लागली आगीमुळे गॅससिलेंडरचा स्फोट होऊन एकूण २१ झोपडया जळून खाक झाल्या. या आगीमुळे ज्यांच्या झोपडया जळाल्या त्यांचा संसार पुर्णपणे उध्दवस्त झालेला आहे. या संदर्भात मनपाच्या अधिका-यांसमवेत तलाठी यांनी देखील पंचनामे केले आहेत. शासन निर्णयानुसार जळीतग्रस्तांचे पुनर्वसन होणे शक्य नाही. सदरचे सहाय्य स्विकारण्यास झोपडीधारक तयार नाहीत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम ६६ (३९) अन्वये शहरातील जनतेवर ओढवलेली कोणतीही आपत्ती दूर करण्यासाठी उपाययोजना करणेबाबतची तरतूद आहे. तरी मनपा मार्फत सदर झोपडीधारकांचे पुर्ण पुननिर्मिती करणेकामी र.रु. ५,०००/- व्यतिरिक्त विशेष बाब म्हणून र.रु. ३५,०००/- इतके अनुदान असे एकुण र.रु. ४०,०००/- प्रति झोपडीधारकास मनपाचे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे असलेल्या र.रु. २०,००,०००/-

तरतूदी मधुन आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत यावी. तसेच स्थापत्य उदयान विभागाकडील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील कामाच्या तरतूदीमध्ये खालीलप्रमाणे फेर बदल करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अ.क्र. | सन २०१६-१७ चा मुळ अंदाज | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी | | सन २०१६-१७ सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | प्रभाग क्र. १२ मधील विविध उदयानाची स्थापत्य विषयक कामे करणे. | स्थापत्य उदयान | ३५८ | ४११ | ८००००० | १५००००० | ० | २३००००० |
| २ | प्रभाग क्र. ०१ तळवडे अ.क्र.१/५२ डीअर पार्क व बॉटनिकल गार्डन विकसित करणे. | स्थापत्य विशेष योजना | ६४ | ४४ | १०००००००० | ० | १५००००० | ८५००००० |
| | | | | एकूण | १०८००००० | १५००००० | १५००००० | १०८००००० |

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आयुक्तांच्या पत्रातून जे वर्गीकरण दाखवलेले आहे, खरेतर अक्षरशः विचार करण्यासारख्या ठिकाणाहून वर्गीकरण केले आहे म्हणजे कोणी कोणाला काय बोलायचे आणि कोणी कोणाला काय म्हणायचे. कोणत्या हेडवरून पैसे घ्यावेत हे तरी माणसाला लक्षात आले पाहिजे. हे लक्षात आणून देण्यासाठी मी पहिल्यांदा उभी राहीली आहे. तुम्ही कोणत्या गोष्टींतून वर्गीकरण करून घेतले आहे ते बघा. अंत्यविधीसाठी आर्थिक मदत या विषयातून

वर्गीकरण करुन घेतले आहे. अंत्यविधीसाठी तुम्ही लोकांना मोफत गोष्टी द्या, असा आम्ही महापालिका सभेत ठराव केला होता. त्या निधीचे तुम्ही वर्गीकरण करत असालतर आम्ही याचा अर्थ काय समजायचा. मग आम्ही महापालिका सभेत ठराव करतो त्याला काय अर्थ आहे का नाही. अंत्यविधीसारख्या गोष्टीतून हा निधी वर्गीकरण करावा का. तुम्हाला दुसरा हेड दिसला नाही का. तुम्हाला कोणाचे बील द्यायचे आहे. तुम्ही वर्गीकरण करु नका असे आमचे अजिबात म्हणणे नाही. परंतू हे वर्गीकरण करत असताना कोणत्या हेडवरुन घेतले पाहिजे याचे सुद्धा तारतम्य ठेवा. प्रशासन चुकते व फुकट आम्हा लोकांची सत्ताधा-यांची नावे घेतली जातात. हे कशासाठी चालले आहे. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. आम्ही म्हटले होते त्या त्या वेळी तिथे तिथे तरतूद केली होती, तो विषय आहे. अंत्यविधीसाठी मोफत साहित्य देण्यासाठी निधी उपलब्ध केला होता. मग ही योजना राबवायची नाही का. योजना का राबवणार नाही याचा पहिल्यांदा खुलासा व्हायला पाहिजे. मा.आयुक्त साहेब, अशा भावनिक विषयांत असे बिल्कूल होता कामा नये. उद्या आम्ही म्हटले असते मंजूर. मग आम्ही काय म्हणायचे. तुम्ही करायचे आणि आम्ही निस्तरायचे असे किती दिवस करायचे. टर्म संपली ना. म्हणून याचा खुलासा झाला पाहिजे. मा.महापौर, मला परत बोलायचे आहे.

**मा.सुलभा उबाळे-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आम्ही काय विचारणार याचे तारतम्य समजून मा.मंगलाताई कदम यांनी आधीच या विषयाला उल्लेख केला आहे. परंतू या गोष्टीला जे कोणी जबाबदार आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. यानिमित्ताने मी एक विषय तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छिते की, मी एकदा भिमशक्ती नगरसाठी शौचालये बांधायचा विषय करायला सांगितला होता. तेव्हा त्या विषयात मी दिलेल्या पत्रावरुन हा विषय येतो आहे, असा त्यात फक्त माझ्या नावाचा उल्लेख आला होता. त्यामुळे हे विषयपत्र करणा-या त्या अधिका-याला मेमो गेला आहे. त्याला शिक्षा झाली आहे. त्याच्या सर्वीसबुकमध्ये पन्नास का दीडशे रुपये दंड मारला आहे. ही सत्य गोष्ट आहे. एका सदस्याचे नाव आले म्हणून त्यांच्यावर कारवाई झाली आहे. हा अत्यंत गंभीर विषय आहे. अंत्यविधीसाठी ठेवलेली रक्कम वापरलेली नाही. भले ती रक्कम वापरली, वापरली नाही, ही रक्कम लॅप्स झाली. पण असा निधी प्रसिद्धीसाठी वापरला हा कोणालाच पटणारा विषय नाही. हा विषय कुणाच्याच मनात रुजू शकत नाही आणि कुठेतरी काहीतरी तारतम्य बाळगलेच पाहिजे. ज्यांनी मागणी केली होती, त्यांचे सुद्धा नाव पुढे आले पाहिजे. यामागे कोण कोण आहेत, त्यांची नावे सभागृहाला समजली पाहिजेत.

दुसरे म्हणजे दोन कोटी रुपये लेखाशिर्षावर ठेवले होते आता एक लाख रुपये शिल्लक राहिले आहेत. आणि तुम्ही इतरत्र पन्नास लाख रुपये वर्ग करताय. आम्ही रस्त्याने जाहीराती बघतोय. मा.अजितदादा पवार असतील, मा.शरदचंद्रजी पवार असतील,

मा.मुख्यमंत्री असतील, ते शहरात येतात तेव्हा शहरात कार्यक्रमाच्या जाहीराती लागणे हे अपरिहार्यच आहे. कारण ते शहरात कार्यक्रमासाठी येतात. परंतू आत्ता पिंपरी चिंचवडमध्ये आम्ही पीसीएमसीकर अशा जाहीराती बोर्डवर दिसत आहेत. त्या जाहीरातीत खाली राष्ट्रवादीचा झेंडा आहे. याचा सुद्धा खुलासा व्हावा की, ही जाहीरात महापालिका करतेय का आपला पक्ष करतोय. कारण शेवटी आमच्या सगळ्यांच्याच वॉर्डमध्ये सुविधा झाल्या आहेत. आमच्या सगळ्यांच्या वॉर्डमध्ये काही ना काही सुविधा झाल्या आहेत. भले विरोधी पक्षाचा असो, भले सत्ताधारी पक्षाचा असो, भले कुठल्याही पक्षाचा असो. मग जर मॉडेल लावायचेच असेलतर आमची पण केलेली कामे, ती लावून त्यावर आमच्या पक्षाचा झेंडा किंवा फोटो लावावा. महापालिका खर्च करणार असेलतर सरसकट सगळ्यांचेच करा. मा.महापौर, माझा मुद्दा असा आहे की, एकतर चुकीच्या पद्धतीने अंत्यविधीचा निधी केला आहे. कोणी कोणी सुचवले आहे. कशा पद्धतीने करायचे. मग आम्हीच बोलायचे, आम्हीच रेटायचे, आम्हीच जिरवायचे असे चालणार नाही. याचा खुलासा झाला पाहिजे. जशी शौचालयाच्या विषयात कारवाई झाली, तशी कारवाई इथे होणे अपेक्षित आहे. दुसरे म्हणजे जाहिरात होत असताना २०१७ च्या येऊ घातलेल्या निवडणुकीच्या तोंडावर कोणताही पक्ष त्याचा वापर करणार असेलतर महापालिका त्याचा खर्च करणार आहे का. या जाहिराती करण्यामागील उद्देश काय असेल, त्याचा सुद्धा खुलासा झाला पाहिजे. नंतर मला सुद्धा पुन्हा बोलायची संधी देण्यात यावी.

**मा.महापौर** - जनसंपर्क विभागाने खुलासा करावा.

**मा.नारायण बहिरवाडे-** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, ज्यावेळी महापालिकेचे अंदाजपत्रक बनवले जाते, त्यावेळी या अंदाजपत्रकात भांडवली खर्च असेल, विकास कामे असतील, मग तो स्थापत्य विभाग असेल, पाणीपुरवठा विभाग असेल, जलनिःसारण असेल, याच्याशिवाय देखील अर्थसंकल्पात नागरवस्ती विभाग आहे, त्यांच्या कल्याणकारी योजना असतात. महिला व बालकल्याण योजना असेल, अपंग कल्याणकारी योजना असेल, आणि विशेष कल्याणकारी योजना असेल. अंत्यविधीसाठी ही जी एक लाख तरतूद विशेष योजना या हेडखाली ठेवलेली आहे. आता वर्ष संपत आलेले आहे. या पन्नास लाखांमधून एक रुपयादेखील खर्च झालेला नाही. मा.महापौर साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगतो की, गेले दहा महिन्यांपूर्वी एक विषय स्थायी समितीमार्फत आला होता की, शहरात जे अंत्यविधी होतील ते अंत्यविधी महापालिकेच्या माध्यमातून मोफत करावेत. असा ठराव यापूर्वी नाशिक महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, आणि अहमदनगर महानगरपालिका या सगळ्यांचा संदर्भ देण्यात आला होता. आणि आपल्याकडे तरतूद असूनदेखील आपण ही रक्कम खर्च केलेली नाही. आणि आज अचानक ही रक्कम प्रसिद्धीसाठी खर्च करतोय. अर्थसंकल्पात यासाठी एवढी मोठी तरतूद ठेवली होती, याची

माहिती नागरीकांपर्यंत पोहचवली किंवा पोहचवली नाही का. अशा प्रकारची तरतूद ठेवली आहे याची अनेक नागरीकांना माहिती नाही. शहरात असे अनेक गोरगरीब आहेत, ज्यांना लाकडे घेणे परवडत नाही. आपल्याकडे लिंगायत समाजातील लोक आहेत, ते स्वतः खड्डा खणतात व मयत पुरतात. त्यांना विचारले तर ते सांगतात की, त्यांच्याकडे खर्च करायला पैसे नाहीत. अशा नागरीकांपर्यंत ही माहिती पोहचवली नाही. कशा पद्धतीने प्रचार किंवा प्रसार केला किंवा नाही केला. केला नसेलतर त्यावर काय कारवाई करणार आहोत याचा खुलासा करावा.

**मा.डॉ.माने (सहा.आयुक्त,आरोग्य विभाग)**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड शहराअंतर्गत असणाऱ्या स्मशान भूमी आणि दफनभूमीच्या अंतर्गत अंत्यसंस्कारासाठी अर्थसहाय्य देणेबाबतीत मा.स्थायी समितीने दि.५/४/२०१५ आणि मा.महापालिका सभेने दि.२०/४/२०१६ला ठराव करुन त्याचे अनुदान देणेबाबतीतची योजना केली आहे. त्या योजनेअंतर्गत आपण नाशिक, ठाणे, नागपूर या महानगरपालिकांकडून माहिती मागवली होती. याचे दोन मतप्रवाह होते. त्यांना अनुदान स्वरुपात द्यायचे. याबाबतीत रक्कम काय ठरवायची याविषयी चर्चा झाली होती. त्यानंतर आत्ता फाईल प्रोसेसिंग. आरोग्य विभागामार्फत टेंडरसाठी फाईल प्रोसेस केलेली आहे. आर्थिक स्वरुपात अनुदान न देता अंत्यविधीसाठी लागणा-या ज्या गोष्टी आहेत. उदा. तीन प्रकारे अंत्यविधी होतात. आणि वेगवेगळ्या धर्माच्या रिच्युअल्स् प्रमाणे होतात ज्या त्या धर्माचे रिच्युअल्स् आहेत, त्याप्रमाणे हे विधी पार पडतात. लागणारे सरपण, गोव-या त्याचबरोबर पर्यावरण पूरक अश्या ब्रिक्स मिळतात. त्याचा यात अंतर्भाव करुन अंत्यविधीसाठी जो अग्नी करतो, त्यासाठी एक आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे दफनभूमी दफनभूमीमध्ये लेन्थवाईज आहे. लेन्थ छोटी असेल, मोठी असेल त्याप्रमाणे दोन्हीची टेंडर प्रक्रिया प्रगतीत आहे. प्रशासकीय मान्यतेसाठी आमची प्रक्रिया चालू आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आम्ही हा प्रश्न विचारलेलाच नाही की, तुम्ही प्रोसिजरमध्ये आहात का नाही. तुम्ही प्रोसिजरमध्ये आहात तर पैशांचे वर्गीकरण का करताय. आम्ही सरळ-सरळ हा प्रश्न विचारला. महापालिका सभेत, रथाची दोन चाके आहेत, एक कमिशनरांचे आणि एक सभागृहाचे, सदस्यांचे. आम्ही म्हणतोय की, कमिशनरांचे पत्र असेलतर आम्ही हा विषय डोळे झाकून मार्गी लावतो. आत्ता आम्ही वेगळी उपसूचना दिली आहे. आमचे एवढेच म्हणणे आहे की, आम्हाला हा विषय अडवायचा नाही. जनसंपर्क विभागातून वर्गीकरण पाहिजे असेलतर, आमचे म्हणणे इतपत आहे. आम्ही अंत्यविधीसाठी प्रोसिजर चालू केली आहे, आम्ही असे केले आहे, आम्ही तसे केले आहे असे सांगतात. मग त्या पैशांचे वर्गीकरण का केले. उद्या पैसे कमी पडलेतर कुठून आणणार. अंत्यविधी या हेडवरुन पन्नास लाख घ्यायचे तुमच्या डोक्यात का आले.

आणि असे का केले आम्ही हे विचारले आहे. तुम्ही प्रोसिजरमध्ये आहेत, अजून जाहिरात केली नाही हा प्रश्न आम्ही विचारलेलाच नाही. या गोष्टीसाठी इतके महिने लागतात का. एप्रिल महिन्यात ठराव केलात मग आज कुठला महिना चालू आहे. ठराव करुन आठ महिने झाले. आम्ही काय डोक्यावरुन पडलो आहोत का. ठराव करायला आठ-आठ महिने लागतात. काय लागते ते प्रोसिजरने द्या. खुशाल अंत्यविधीसाठी ठेवलेल्या निधीचे वर्गीकरण करताय. म्हणजे आम्हाला पब्लिकमध्ये जायचे असेलतर, लोक म्हणतील, पैसे कमी पडले म्हणून अंत्यविधीचे पैसे वर्गीकरण केले. म्हणजे तुम्ही चुकायचे आणि आम्ही भोगत बसायचे हे किती दिवस चालणार. वर्गीकरण करताना सुद्धा नीट केले पाहिजे. वर्गीकरण करताना कोणाची ही सुपीक कल्पना आली. होऊ दे एकदाचं. कळू दे सगळ्यांना.

**मा.डॉ.माने (सहा.आयुक्त,आरोग्य विभाग)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, टेंडर एस्टिमेट कॉस्ट साधारणतः वर्षाला १०,००० अंत्यविधीं कॅल्क्युलेट केले आहेत, साधारणतः रु.३,७९,७५,०००/-रुपयांचे एस्टीमेट आहे. त्याअनुषंगाने आपली प्रक्रिया चालू आहे. गेल्या वर्षाची आर्थिक तरतूद करुन वर्गीकरणाबाबतीत लेखा विभागाकडून ही प्रक्रिया होते. वर्गीकरणाबाबतीत आत्तापर्यंत आरोग्य विभागाच्या हेडवरुन फक्त खर्च झालेला नाही. या अनुषंगाने आरोग्य विभागाचा प्रश्न आहे. पुढील प्रक्रिया राबवायची आहे, तिथपर्यंत आरोग्य विभागामार्फत काम चालू आहे. आरोग्य विभागाच्या मागील हेडवरील अंत्यसंस्कार या हेडवर किती तरतूद होती. अजून खर्ची झालेले नाहीत आणि मार्च पर्यंत किती लागणार आहेत, हे बघून वित्त विभागामार्फत त्याची प्रक्रिया राबविली जाते.

**मा.सुलभाताई उबाळे** - माने साहेब शासकीय उत्तर देऊ नका. शासकीय भाषेत बोलू नका. शासकीय शब्द वापरू नका. सरळ भाषेत उत्तर द्या.

**मा.डॉ.माने (सहा.आयुक्त,आरोग्य विभाग)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, अंत्यविधीसाठी गेल्या वर्षाच्या सन २०१६-१७ च्या बजेटमध्ये एक कोटींची तरतूद केली आहे. त्या एक कोटींपैकी निधी अजूनही खर्ची पडलेला नाही. त्यापैकी जनसंपर्क विभागामार्फत त्यातला निधी त्यांना कमी पडत असल्याने, त्यांनी मागणी केल्यामुळे त्यांची मार्चपर्यंत असणारी रक्कम ठेवून त्यापुढचे ५० लाख वर्ग करायला आरोग्य विभागाकडून कळवले होते. प्रसिद्धी आणि जनसंपर्क विभागामार्फत त्याची प्रक्रिया राबवली जाते.

**मा.बोदडे (सहा.आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग)** - हे मा. आयुक्तांचे डॉकेट आहे.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, यातील एक रुपया पण खर्च झालेला नाही. खर्च का झाला नाही याचा खुलासा करा. ही शरमेची बाब आहे. आठ/आठ महिने प्रोसेस चालू असते का.

**मा.डॉ.माने (सहा.आयुक्त,आरोग्य विभाग)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, यापूर्वी खुलासा केल्याप्रमाणे या योजनेची अंमलबजावणी कशी करायची, याबाबत दोन विचारप्रणाली होत्या. यात एक विचार असा होता, डायरेक्ट अनुदान आर्थिक स्वरुपात लाभ द्यायचा. आर्थिक स्वरुपात लाभ द्यायचा तर अंत्यविधीची कॉस्ट कशी ठरवायची हा विषय तिथे चर्चीला गेला. त्यानंतर इतर महापालिकांमध्ये अशा स्वरुपाच्या काही योजना आहेत का याची चौकशी केली. त्यात प्रामुख्याने नाशिक, नागपूर, नवीमुंबई या महापालिकांकडून आपण माहिती घेतली. त्याप्रमाणे असे लक्षात आले की, तिथे अंत्यविधीसाठी अनुदान दिले जात नाही. त्यासाठी ज्या वस्तू लागतात, जसे सरपण, गव-या यास्वरुपात प्रोव्हिजन केले जाते. त्याचा रेट काढून एस्टिमेट काढायची प्रक्रिया सुरु केली आहे.

**मा.प्रशांत शितोळे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी या विषयाच्या अनुषंगाने एक माहिती सांगतो. मा.आयुक्त साहेब, मुळातच याठिकाणी तुम्ही चुकला आहात. डिसेंबर महिना आहे. दरवर्षी डिसेंबर महिन्यात तुम्ही बजेट रिवाईज केले पाहिजे. आमच्या समोर असा विषय कशासाठी येतो. अंत्यविधी म्हणजे शहरात सेन्सिटीव्ह पद्धतीने हाताळला जाणारा विषय, हा विषय आमच्या पटलावर येऊन आमच्या आमच्यात वाद सुरु केला आहे. या डिसेंबर महिन्यांत अंदाजपत्रकात वर्गीकरणाच्या निमित्ताने तुम्हाला सूचना आहे. तुम्ही हे अंदाजपत्रक चालू वर्षाचे, मागील महिन्यात आचारसंहिता लागली. येत्या काही दिवसांत परत एक नवीन आचारसंहिता लागणार आहे. मग या अंदाजपत्रकात तुमच्या अधिकारांत रिव्हाईज करणार आहोत का. राहीला प्रश्न या विषयाबाबतीतला. रु.एक कोटी तरतुद उपलब्ध आहे. रु.३,७९,००,०००/- रुपयांची निविदा प्रक्रिया चालू केली म्हणून माने साहेबांनी सांगितले. हे काम वर्ष किंवा दोन वर्षे कालावधीसाठी असेल. हे पैसे एक दिवसांत, एक/दोन महिन्यांत संपणार नाहीत. तुम्ही एक वर्षासाठी निविदा काढली असेल, दहा हजार देहांवर अंत्यसंस्कार होणार असतील तर ते काय लगेच होणार नाहीत. आजही निविदा प्रक्रिया झालीतरी तुम्हाला हे पैसे वापरता येणार आहेत. मग अशी काय तातडीची गरज पडली की, तुम्ही हे वर्गीकरण तुमच्या मान्यतेने इथे पाठवले आहे, हा माझा एक प्रश्न आहे. नोव्हेंबर व डिसेंबर या महिन्यांमध्ये महानगरपालिकेच्या चालू विकास कामांमध्ये पैसे कमी पडतात. मा.आयुक्त साहेब, तुमच्याकडून रिव्हाईज बजेटला ज्या ज्या विभागांकडून पैशांची मागणी असते, आवश्यकता असते, ते वाढीव बजेट मंजूर करुन घेतो. ही प्रथा आहे. प्रथा म्हणण्यापेक्षा हा नियम आहे. म्हणजे बजेटचे रिव्हिजन करण्याऐवजी हे असे एक एक विषय जर येत बसले तर मी उद्या माझ्या प्रभागातला विषय देत बसेन. मला दोन कोटी पाहिजेत, दहा कोटी पाहिजेत, पाच कोटी पाहिजेत. त्यापेक्षा आम्हाला पॉलिसी म्हणून तुम्ही आत्ता इथेच सांगा. आचारसंहितेच्या कालावधीत सुद्धा आयुक्तांनी

आयुक्तांच्या अधिकारांमध्ये संपूर्ण बजेटला चालू कामांवर जे काही पैसे कमी पडतील, ते तुमच्या अधिकारांत वर्ग करा. हा विषय अतिशय संवेदनशील आहे. संवेदनशील विषय असताना या काळात आमच्या पटलावर हा विषय ठेवायचाच कशाला. आम्ही जर एकदा पॉलिसीला मान्यता दिली असेल की, शहरातील नागरीकांवर प्रत्येक जातीच्या, प्रत्येक धर्माच्या, प्रत्येत मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार महापालिकेकडून केले जातील यासाठी वेगवेगळ्या जातीधर्माप्रमाणे ठराविक रक्कम खर्च करायची असेलतर, पॉलिसी झाल्यानंतर वर्गीकरणासाठी परत हा विषय इथे घेतलाच नाही पाहिजे. चौथ्या महिन्यात स्थायी समितीने मान्यता दिली आहे. आत्ता बाराव्या महिन्यात हा विषय यायचे काय कारण आहे. विनाकारण आमच्या आमच्यांत सदस्यांमध्ये वाद लावून देऊ नका. आपण ज्या हेडवरुन पैसे खर्च करणार आहोत, किमान हेडतरी चांगले निवडायचे. आपल्याकडे अशी कितीतरी कामे आहेत, आज त्यांची निविदा प्रक्रिया सुद्धा केलेली नाही. जर या हेडवर पैसे शिल्लक असतील तरी आपण कोणत्या हेडवरुन पैसे काढतोय, कुठल्या कामासाठी काढतोय, हे साधे आपल्याला कळायला नको का. मुळात अंत्यविधी किती होणार आहेत, त्याचे भविष्य तुम्ही सांगू शकता का. शहरातील अंत्यविधींचा अंदाजे आकडा दहा हजार असलातरी तो अंदाजेच आहे. त्याला पर्फेक्शन नाही. कुठल्याही परिस्थितीत ज्या ज्या ठिकाणी लोकांच्या भावना दुखावल्या जातील, मग तो कुठल्याही जातीचा असो, कुठल्याही धर्माचा असो, तुम्ही त्या ठिकाणच्या पैशाला हात लावायचे काय कारण आहे. मुळात आम्ही त्या पॉलिसीला मान्यता दिलेली आहे. हा विषय खरेतर चुकीचा आहे. पॉलिसीला मान्यता दिली असेल, त्याची प्रक्रिया चालू असेलतर त्याला बिल्कूल हात लावला नाही पाहिजे. राहिला प्रश्न माहिती व जनसंपर्क विभागाचा. तिथे ज्या ज्या कामासाठी पैसे खर्च करावे लागतात, ती तुम्ही इथे घेऊ शकता. कितीतरी कामे अशी आहेत की जी होणारच नाहीत, होऊ शकत नाहीत. मा.महापौर साहेब, माझी सूचना आहे की, तुम्ही आयुक्तांना सांगा. एकतर चालू बजेट तुम्ही तुमच्या अधिकारांत रिव्हाईज केले पाहिजे. येत्या दोन/तीन दिवसांत याचे काय परिपत्रक असेलतर ते काढा. तुमच्या अधिकारांत बजेट रिव्हाईज करुन द्या. कारण आमच्याकडे कोट्यावधी रुपयांची कामे चालू आहेत. चालू कामे आहेत. त्यांना जे बजेट शिल्लक होते ते संपले आहे. ते पूर्णपणे संपलेतरी उरलेल्या कामांसाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील. खर्ची न पडलेले जे पैसे आहेत, ते कामांवर वर्ग करावे लागतील. आयुक्त साहेबांनी त्यांच्या अधिकारांत ते वर्ग करावेत म्हणून माझी आयुक्त साहेबांना सूचना आहे याबाबतीत कुठल्याही परिस्थितीत कोणतीही अडचण येणार नाही. त्यातून जनसंपर्क विभागाला जे पैसे राहतील, ते तुम्ही खर्च करणे तुमचे काम आहे. आम्ही जी उपसूचना देऊ, ती सुद्धा तुम्ही ग्राहय करुन घ्या. हा जो मूळ विषय आहे, अंत्यविधीसाठी लेखाशिर्षावरून पैसे घ्यायचे, त्याबाबतीतली उपसूचना मान्य करुन हा विषय मंजूर करा.

**मा.शारदा बाबर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आजची सभा ही खरेतर शेवटची सभा आहे असे मला वाटते आहे. विषय पण असा आला आहे. या विषयाला पण शब्दच संपले आहेत. आत्तापर्यंत चारा घोटाळा, कोळसा घोटाळा हे ऐकलेय. आता आपल्याकडे हे नवीन ऐकतोय. अंत्यविधीसाठी जे सामान वापरतात, त्यासाठी त्यावर किती खर्च केला आहे. तो निधी खरोखर त्यासाठी वापरला जातो का. कारण लोकांना मृत्यू झाला त्यापेक्षा त्यासाठी येणा-या खर्चाचेच जास्त दु:ख असते.

**मा.महापौर**- प्रशासनाने या विषयाला आठ महिने लावले आहेत. आपण अंत्यविधीच्या लेखाशिर्षावरून वर्ग करुन देत नाही आहोत. दुसरीकडून वर्ग करुन देतोय.

**मा.सुलभा ऊबाळे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.पठाणताई आणि सर्व सन्मा.सभागृह, मी याठिकाणी प्रशासनाचा एकदम कडक शब्दांत निषेध करते. एकतर यांनी चुकीच्या हेडवरुन हे पैसे घेतले आहेत. दूसरे म्हणजे आत्ता सांगितल्याप्रमाणे एप्रिलपासून ही प्रोसिजर. म्हणजे किती अकार्यक्षम, किती असंवेदनशील, किती नियोजनशून्य कारभार चालला आहे याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. बाकी कामे आपण किती हॉर्सपॉवरने करतो. या कामाकडे मात्र तुम्ही दूर्लक्ष केले आहे. लोकांचे जाणे, यात काही रिटर्नस् नाहीत मग अशा कामाकडे लक्षच द्यायचे नाही का. मी याचा पहिल्यांदा निषेध करते. मी जे विचारले आहे त्याचा मला खुलासा मिळाला नाहीतर मी अशीच उभी राहणार आहे. तुम्ही त्याचा फक्त खुलासा द्या. सगळ्यांना कळू द्यात की, असे झाले असेलतर का झाले आणि परत होऊ नये. ती कोणाची जाहीराती होती.

**मा.योगेश कडूसकर (सहा.आयुक्त, आकाशचिन्ह, जाहिरात आणि परवाना विभाग)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आत्ता ज्या आम्ही पिंपरीचिंचवडकर या जाहिरातीचा उल्लेख केला आहे, या जाहीरातीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने, आकाशचिन्ह आणि परवाना विभाग किंवा अन्य कोणत्याही विभागाने खर्च केलेला नाही. दूसरी गोष्ट म्हणजे, जे होर्डींग आहेत, सध्या त्यांच्यावर डिमांड घेऊन जाहीरातकर व परवाना फि वसूल करतोय.

**मा.सुलभा ऊबाळे**-मा.महापौर साहेब, कसे असते ठेकेदार आपलाच, निविदा आपल्याच लावणारे आपलेच आणि सांगणारेही आपलेच या सगळ्या गोष्टी असल्यानंतर ही सारवासारवी करणे फार सोप्पे असते. याठिकाणी कडूसकर साहेब तुम्ही या गोष्टीची खातिरदारी कराल की, ज्या या जाहीराती लावल्या आहेत, त्याचे पेमेण्ट या जाहिरात कंपनीकडे कोणी केले आहे. त्याचे डिटेल्स आम्हाला पाहिजेत. तुम्हाला बोलणे फार सोप्पे आहे की हे तुम्ही केलेले नाही. पण ज्या कंपनीकडून हे फ्लेक्स लागले आहेत, त्यांच्याकडून आम्हाला पाहिजे. तुम्ही यांच्याकडून जाहीरात कर वसूल केला आहे का नाही नाही सांगणे फार सोप्पे आहे. शहरात किती बोर्ड आहेत ते आम्ही मोजले आहेत. याचे पेमेण्ट बिलिंग

कोणाच्या अकाऊंटमधून केले गेले आहे. जुन्या नोटांनी पेमेण्ट केले आहे का नव्या नोटांनी केले आहे. याचे सगळे डिटेल्स मला पाहिजेत. निश्चितपणे तुम्ही जबाबदारीने बोलताय. ही सगळी उत्तरे आम्ही तुमच्याकडूनच घेणार आहोत. ही जाहीरात सरळ,साधी आहे. त्यावर कोणत्याही लोकप्रतिनिधींचा फोटो नाही. निश्चितपणे मी तुम्हाला सांगितले आहे. परंतू त्यावर पक्षाचा झेंडा वापरला गेला आहे. त्यामुळे याचा खर्च कोणी केला, असा सरळ साधा प्रश्न मी विचारला आहे. याचे सगळे डिटेल्स पाहिजेत. तुम्ही ज्या पद्धतीने जाहीरात बोर्डावर ज्या जाहिराती वापरताय, त्याचे सगळे डिटेल्स द्या. जे पक्षाचे कार्यक्रम चालतात, त्यावर इथून पुढे स्वतःची जाहीरात, स्वतःचे पेमेण्ट. तुम्ही अंत्यविधीच्या लेखाशिर्षातून पन्नास लाख वर्ग करताय. आणि खर्च कुठे करायचा. राहिलेल्या एक महिन्यात तुम्हाला एवढे पैसे कशाला लागतात. आठ/दहा दिवसांत आचारसंहिता लागणार आहे. एवढे पैसे कुठल्या कारणासाठी लागतात हे सुद्धा सांगा. जे दोन कोटी खर्च केले ते कोणत्या गोष्टीवर खर्च केले. जेवढे सदस्य आहेत त्यांना त्याचे ॲनेलिसिस पाठवा. जाहीरात म्हणजे काय. फक्त फ्लेक्सवर दोन कोटी खर्च झालेत का टेंडर प्रक्रियेवर खर्च झालेत हे सुद्धा कळाले पाहिजे. कशावर खर्च झालेत कोणाला इतके पेमेण्ट केले.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, ज्याला-ज्याला महापालिकेकडून अंत्यविधीसाठी सहकार्य पाहिजे, त्या-त्या लोकांना अंत्यविधीसाठी सहाय्य दिले पाहिजे मग ती व्यक्ती कोणत्याही धर्माची असू देत. मा.आयुक्त साहेब, खरेतर अंत्यविधीसाठी जे पैसे ठेवलेले आहेत, ते इथून पुढे तुमच्यापुढे येतील त्याची फाईल येईल. त्यावेळी सही करताना, असे सेन्सेटीव्ह विषय असतील तर सही करताना तुम्ही थोडेसे लक्ष देऊन करा. कुठल्या हेडवरुन कुठे पैसे जातात. हा विषय कसा आहे, असे वाटते जो या शहरातील माणूस आहे, त्याला अंतःकरणापासून या शहराची ओढ वाटत असते. एका गावातले असलो की आपण गाववाले म्हणतो. ही जी ओळख असते, ओढा असतो. हे लोक ३०/४० वर्षे इथे राहिले आहेत. पिंपरी चिंचवडकरांसाठी काही गोष्टी केल्या आहेत. या गोष्टी करण्यासाठी म्हणून हा प्रस्ताव आणला होता. खूप लोक असेही आहेत की जे अंत्यविधी करण्यासाठी पैसे घेत नाहीत. परंतू जे गोरगरीब लोक आहेत त्यांना हे पाहिजे आहे, त्यांच्यासाठी ही सोय केली आहे. तुम्ही शिरवळ येथील स्मशानभूमी जाऊन बघा. तिथे घरी डायरेक्ट ॲम्ब्युलन्स जाते, बस जाते. तिथे सगळा खर्च केला जातो. जिथे दहन केले जाते तिथे अक्षरशः पाईप लाईनची योजना अशी केली आहे की, जी उरलेली अस्थी किंवा अस्थी काढल्यानंतरची जी रक्षा आहे तिथे डायरेक्ट नदीमधून पाईप घेतला आहे, तिथे व्यवस्थीत पाणी मारले जाते. इतकी सुंदर पद्धत तिथे आहे. जसे यांनी इतर महापालिकांमध्ये पाहिले की कसा खर्च केला जातो. या गोष्टी त्यांना बघायला सांगा. त्यातून ही गोष्ट नक्की निष्पन्न होईल.

आत्ता मा.सुलभाताई ऊबाळे जे म्हणत होत्या. मला एवढेच म्हणायचे आहे की, पक्षाचा झेंडा आणि जाहीरात, कितीतरी पक्षांची चिन्हे टाकून जाहीराती लावल्या जातात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महापालिकेकडून जाहिरात लावून घेण्याइतपत अजून परिस्थिती तशी नाहीए. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची परिस्थिती चांगली आहे. मला वाटते, कुठूनही खुलासा घ्या, कुठूनही माहिती घ्या, परंतू मला यात आनंद नक्की आहे की, ही जी केलेली ऍड असते. ऍड कशी करायची आणी ती सक्सेसफूल झाली पाहिजे. आम्हाला यात समाधान आहे की, जी जाहिरात झाली, ती विरोधकांपर्यंत पोहोचली आणि त्यांनी त्याची दखल घेतली. म्हणजेच आमची जाहीरात सक्सेसफूल झाली. आम्ही मूळ विषयाला उपसूचना दिली होती की, दुस-या हेडवरून ती दिली आहे. मा.महापौर, हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.सुलभा ऊबाळे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, कसे असते, शेवटचा बोलल्यानंतर ते खरे असतेच असे नाही. मा.महापौर साहेब, याठिकाणी सगळ्यांनाच माहिती आहे. सगळेच जण जाहिराती लावत असतात. सगळेजण मग ते कार्यकर्ते असतील, २० बाय २० च्या बोर्डाला दहा हजार मोजावे लागतात. यांना कदाचित आकडासुद्धा माहित नसेल की, एका बोर्डाला किती पैसे घेतात. परंतू बाकी ज्या जाहिराती लावल्या जातात, या सगळ्याचे डिटेल्स घेतलेतर तुम्हाला कळेल. यांना काय वाटतेय की, विरोधकांचे लक्ष गेले, विरोधकांनी दखल घेतली म्हणजे ही जाहीरात सक्सेसफूल झाली. अपोजिट पार्टीचे लक्ष झेंड्याकडेच असते की, तो कुठे चुकीचा लागतोय. मिळकत कराच्या पैशांतून जर सत्ताधारी पक्ष किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जाहिरात करणार असेलतर त्यांच्याकडे लक्ष देणे विरोधकांचेच काम आहे. म्हणून मी पुन्हा रिपीट करते, हे बोर्ड कोणाचे आहेत, त्याचे पेमेण्ट कोणी केले, मी,आपण सगळ्यांनीच या गोष्टीची खातरजमा करावी. मा.महापौर साहेब, कृपया स्वतःची पाठ स्वतःच थोपटून घेऊ नये. शेवटी तुम्ही आम्ही सगळे जनतेसाठीच आहोत. जाहिरात जनतेसाठीच आहे. परंतू योग्य प्रकारे चालली आहे का धाकधपटशाहीने चालली आहे, स्वतःच्या पैशाने चालली आहे का दुस-याच्या पैशाने चालली आहे हे कळायला नको का. विचारले तर कोणाला राग कशाला यायला पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - मा.सुलभाताऊ उबाळे यांनी मागणी केली आहे त्यानुसार सविस्तर माहिती देण्यात यावी. हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरूस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ९६३ विषय क्रमांक-३

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/४/कावि/५५७/२०१६ दि.४/११/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१८६९७ दि.२९/११/२०१६

माहिती व जनसंपर्क विभागाकडील सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रसिध्दी या लेखाशिर्षावर र.रू.२,००,००,०००/- इतकी तरतूद करणेत आली होती. दि.२८/१०/२०१६ अखेर सदर लेखाशिर्षावर र.रू.१,००,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे. स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण व इतर विभागाकडील प्रलंबित जाहिरात बिलांची संख्या जास्त असून त्यासाठी र.रू.५०,००,०००/- इतकी तरतूद आवश्यक आहे सदरची रक्कम नागरवस्ती विकास विभागाकडील “अंतविधीसाठी आर्थिक मदत” या लेखाशिर्षातून रक्कम रूपये ५०,००,०००/- “प्रसिध्दी” या लेखाशिर्षावर वर्ग करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व अनुसुची प्रकरण ७ मधील २ (२) (ब) नुसार मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये मनपाचे सर्व विभागांकडील वृत्तपत्रांची बिले अदा करणेकामी प्रसिध्दी या लेखाशिर्षावर र.रु. २,००,००,०००/- इतकी तरतूद करणेत आली होती. सदर लेखाशिर्षावर र.रु. ५,००,०००/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

स्थापत्य, पाणीपुरवठा, जलनि:सारण, विदयुत, पर्यावरण इ. विभागांकडील प्रलंबीत बिलांची संख्या लक्षात घेता त्यासाठी र.रु. ८०,००,०००/- इतकी तरतूद उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदरची तरतूद पशुवैदयकीय विभागाकडील “श्वान संतती नियमन” या लेखाशीर्षावरील र.रु. ३,००,००,०००/- तरतूदी मधुन र.रु. ८०,००,०००/- एवढी तरतूद प्रसिध्दी या लेखाशिर्षावर वर्ग करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ व अनुसूची प्रकरण ७ मधील २(२) (ब) नुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच भारत विरुध्द न्यूझीलंड, डेविस कप (लॉन टेनिस) स्पर्धा २०१७ बालेवाडी पुणे स्पर्धा आयोजनाकरिता महाराष्ट्र स्टेट लॉन टेनिस असोसिएशन यांचेशी करारनामा करुन त्यांना अटी व शर्ती शिथिल करुन शासन मान्यतेने, आर्थिक सहाय्य र.रु. २५,००,०००/- अदा करणेस व सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रकात, क्रिडा विभागाचे मैदानी खेळ (ॲथलेटिक्स) क्रिडा साहित्य खरेदी या लेखार्शीर्षावर तरतुद र.रु. २५,००,०००/- उपलब्ध करुन या तरतुदीतून सदर आर्थिक सहाय्य खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकामधील विशेष योजना पान क्र. १९ अनु.क्र.७ या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कमेबाबत सन २०१६-१७ चे सुधारित व २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकात प्रस्तावात नमूद प्रमाणे मान्यता देणेत येत आहे

| अ. क्र. | पान क्र. | कामाचा अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र. रु. | सन २०१६-१७ ची तरतूद | वाढ करावयाची अंदाजपत्रकीय र.रु. | वाढ करावयाची तरतूद र.रु. २०१६-१७ | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९ | ७ | महिंद्रा कंपनीच्या जागेत मुख्य कार्यालयाची विस्तारीत इमारत बांधणे. | ५०००००००० | १००००० | २३००००००००० | १००००० | विशेष योजना |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ प्रभाग कार्याक्षेत्रातील प्रभाग क्र ३ मोरेवस्ती चिखली प्रभागातील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे निविदा काढणेत आलेल्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्रमांक | निविदा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ चिखली धर्मराजनगर व बगवस्ती व इतर ठिकाणी रस्ते विकसीत करणे | २०/१२२-२०१६-१७ | ५५,८३,८४५/- |
| २ | फ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत साने चौक ते चिखली चौक या रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २०/५१-२०१६-१७ | ५६,००,०५६/- |
| ३ | प्रभाग क्र. ३ चिखली येथील शेलारवस्ती येथील MIDC भागातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | ४४/४२-२०१६-१७ | ४६,६८,३३९/- |
| ४ | प्रभाग क्र.३ चिखली येथील सोनवणे वस्ती व रामदासनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे | ४४/२९-२०१६-१७ | ४६,६८,३३९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरणे करणे. | | |

तथापि सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार प्रभाग क्र. ३ मधील साने चौक ते चिखली गावठान चौक पर्यंतच्या सुमारे २.४० कि.मी. रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी शिफारस केली आहे. सदर रस्त्याची लांबी २.४० कि.मी. रुंदी (सरासरी ९.०० मी.) इतक्या लांबीचे डांबरीकरण करावयाचे झाल्यास सदर कामांच्या व्याप्तीत बदल करणे आवश्यक आहे. सदर कामांच्या एकत्रित रक्कमेतून साने चौक ते चिखली चौकापर्यंतच्या रस्त्याचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच दि९/१०/२०१६ रोजी सकाळी ९.०० वाजता संजय गांधीनगर, पिंपरी येथील झोपडपट्टी मध्ये शॉर्टसर्कीटमुळे आग लागली. आगीमुळे गॅससिलेंडरचा स्फोट होऊन एकूण २१ झोपडया जळून खाक झाल्या. या आगीमुळे ज्यांच्या झोपडया जळाल्या त्यांचा संसार पुर्णपणे उध्दवस्त झालेला आहे. या संदर्भात मनपाच्या अधिका-यांसमवेत तलाठी यांनी देखील पंचनामे केले आहेत. शासन निर्णयानुसार जळीतग्रस्तांचे पुनर्वसन होणे शक्य नाही. सदरचे सहाय्य स्विकारण्यास झोपडीधारक तयार नाहीत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम ६६ (३९) अन्वये शहरातील जनतेवर ओढवलेली कोणतीही आपत्ती दूर करण्यासाठी उपाययोजना करणेबाबतची तरतूद आहे. तरी मनपा मार्फत सदर झोपडीधारकांचे पुर्ण पुनःनिर्मिती करणेकामी र.रु. ५,०००/- व्यतिरिक्त विशेष बाब म्हणून र.रु. ३५,०००/- इतके अनुदान असे एकुण र.रु. ४०,०००/- प्रति झोपडीधारकास मनपाचे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे असलेल्या र.रु. २०,००,०००/- तरतूदी मधुन आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच स्थापत्य उदयान विभागाकडील सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील कामाच्या तरतूदीमध्ये खालीलप्रमाणे फेर बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अ.क्र. | सन २०१६-१७ चा मुळ अंदाज | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी | | सन २०१६-१७ सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १२ मधील विविध उदयानाची स्थापत्य विषयक कामे करणे. | स्थापत्य उदयान | ३५८ | ४११ | ८००००० | १५००००० | ० | २३००००० |
| २ | प्रभाग क्र. ०१ तळवडे अ.क्र.१/५२ डीअर पार्क व बॉटनिकल गार्डन विकसित करणे. | स्थापत्य विशेष योजना | ६४ | ४४ | १०००००० | ० | १५००००० | ८५००००० |
| | | | | एकूण | १०८००००० | १५००००० | १५००००० | १०८००००० |

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९६४ विषय क्रमांक-४

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/२/कावि/३८३/२०१६ दि.१५/११/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१८७८२ दि.२९/११/२०१६

पिंपरी वाघेरे स.न.२९३ येथील यशवंतराव चव्हाण स्टेडीयम खालील व्यापारी संकुल मधील प.म.वरील कॅन्टीन गाळा त्यांचे क्षेत्रफळ २८९.४४ चौ.फु. ही मिळकत नगररचना विभागाने पाच वर्षासाठी ठरवुन दिलेला लिजदर र.रु.२,०७५/-प्रती चौ.फु. नुसार येणारी लिज र.रु.५,३९,८०६/- प्रमाणे ५ वर्ष कालावधीसाठी ई-निविदा सुचना क्र.६/२०१६-१७ प्रसिध्द करण्यात आले होते. सदर कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या असुन सर्व निविदा पात्र ठरलेल्या आहेत. सदरकामी निविदा मधील सर्वउच्च दर र.रु.६,०१,२००/- हा मे.समीप सर्व्हिसेस श्री. संदिप शांताराम शिवले यांनी दर सादर केला आहे. मे.समीप सर्व्हिसेस श्री. संदिप शांताराम

शिवले या निविदा धारकांची निविदा ही निविदा दरापेक्षा ११.३७% जास्त रक्कम रुपये ६,०१,२००/- (अक्षरी रक्कम रुपये सहा लाख एक हजार दोनशे फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ५ वर्ष कालावधीसाठी लिजदराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषयाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९६५ विषय क्रमांक-५

दिनांक - २२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/२३४३/२०१६ दि.२२/११/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१८९१७ दि.२९/११/२०१६

भूसंपादन विभागाकरिता सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात र.रु.१०० कोटी तरतूद केली होती. मा.स्थायी समिती सभेत व मा.महापालिका सभेत त्यातील र.रु.८४,३९,४८,०००/- चे हे उपसूचना द्वारे वर्गीकरण केलेले आहे व सध्या र.रु.१५,६०,५२,०००/- तरतुद उपलब्ध आहे. शहरातील बी.आर.टी.एस प्रकल्पासाठी World Bank मार्फत मोबदला अदा करणेकामी मागणी होत आहे त्यामुळे सदर प्रकल्पातील खाजगी वाटा घाटीने रक्कम अदा करावी लागणार आहे त्यासाठी त्यांना र.रु.५० कोटी रक्कमेची आवश्यकता असलेचे उपसंचालक नगररचना यांनी कळविले आहे. शहर अभियंता स्थापत्य,सह शहर अभियंता जलनि:सारण, कार्यकारी अभियंता, पर्यावरण यांनी प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे त्यानुसार भूसंपादन निधी या लेखाशिर्षावर वाढ एकूण र.रू.४०,२४,००,०००/-ची अंदाजपत्रकीय तरतूद वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, या विषयाची माहिती द्यावी.

**मा.कैलासभाऊ थोपटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आपल्याकडे भूसंपादनासाठी जी तरतूद वर्ग करण्यात आली आहे. आपण प्रत्येक वर्षी बजेटमध्ये १०० कोटी रुपये तरतूद करत आहोत आणि त्यानंतर उपसूचना देऊन र.रु.८४,३९,४८,०००/- उपसूचना देऊन वर्ग केलेले आहेत. भूसंपादनासाठी फक्त रु.१५,६०,५२,०००/- शिल्लक राहिले आहेत. बीआरटी

रस्त्यांसाठी जे पैसे कमी पडलेले आहेत, त्याकरिता इतर विभागांकडून रु.४०,२४,००,०००/- वर्ग केले आहेत. मा.आयुक्त साहेब, हे पैसे आपण वर्ग करतो. आपण बजेटमध्ये १०० कोटी ठेवतो. पण आपण विचार करा की, आपण महापालिकेच्या माध्यमातून गेले १० वर्षांपासून कितीतरी विषय भूसंपादनासाठी पाठवले आहेत. १००/२०० कोटींचे विषय भूसंपादनाच्या ऑफीसमध्ये पडून आहेत. असे विषय पडून असताना आपण तो विषय का करत नाही. आपण आज भूसंपादनासाठी बजेट ठेवलेले असताना दुसरीकडे निधी वर्ग का करतोय. आपण बीआरटी रस्ता असताना काळेवाडी इथे हे पैसे वर्ग केले आहेत. नुसता बीआरटी रस्ता करुन शहराचा विकास होत नाही. १९९४ मध्ये आपल्या डिपी प्लॅनला मंजूरी मिळाली होती. मंजूरी मिळत असताना शहरातील अंतर्गत रस्ते असतील, मग काही १८ मी.चे रस्ते असतील, काही १२ मी. चे रस्ते असतील, काही २४ मी.चे रस्ते असतील, हे रस्ते शहरातील अंतर्गत रस्ते आहेत. काही-काही रस्ते गेले अनेक वर्षांपासून अर्धवट पडलेले होते. उदा.माझ्याच प्रभागातील गेले १० वर्षांपूर्वी प्रस्ताव पाठवला होता. रहाटणी मेन रोडचा काही भाग १८ मी. रस्ता आहे. या रस्त्याचा काही भाग काही शेतकरी किंवा नागरीक त्याठिकाणी रस्ता करु देत नाहीत. त्यामुळे ज्या-ज्या वेळी भूसंपादनाचा विषय येईल, त्या-त्या वेळी मी या सभागृहात बोललो आहे. रहाटणीतला मेन रोड आहे, हा रस्ता गेले १० वर्षांपासून अर्धवट पडलेला आहे. काही लोकांनी असा निश्चय केला आहे, आम्ही जोपर्यंत पदावर आहोत, तोपर्यंत हा रस्ता करु द्यायचा नाही. आम्हाला असे वाटते की, त्यांनी आपले प्रशासन किंवा आयुक्त साहेब किंवा नगररचना विभाग हा पण त्यांच्याशी सहमत आहे का काय असे इथे वाटतेय. आपण जाणूनबुजून ही जागा भूसंपादन का करत नाही. संबंधित अधिका-यांनी आम्हाला याची माहिती द्यावी. धन्यवाद.

**मा.शमिम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरे म्हणजे आम्ही सगळ्यांनी हा विषय घ्यायला हवा होता. पण प्रशासनाच्या निष्क्रियतेचे उत्तम उदाहरण म्हणून या विषयपत्रिकेवर खर्च आदलाबदलीचा विषय आला आहे. वाढ/घट करा. या विषयावरचा निधी त्या विषयावर वळवा. हे काम आमचं होतं. पण निवडणूक आल्यामुळे सगळे अधिकारी जागे झाले आहेत. आत्ता मागचा जो विषय झाला, त्यात उपसूचना दिल्यामुळे या विभागासाठी असलेला निधी कमी पडला आहे. आपली जी धोरणे आहेत, त्यांची प्रसिद्धी कधी झालेली नाही. त्यापैकी एक धोरण होते की, गोरगरीबांच्या अंत्यविधीसाठी काही मदत द्यावी. खरेतर आपली हिंदू संस्कृती असेल, किंवा कुठलीही, प्रत्येक धर्मात ऐपत असलेला माणूस अंत्यविधीचे कोणाचेच घेतलेले पाच रुपये सुद्धा ठेवत नाही. तो परत देतो. पण जे गरीब आहेत, तेच लोक या सुविधेचा फायदा घेतील. प्रशासनाचे संपूर्ण धोरण त्याबद्दलच मी बोलतेय. उदाहरण म्हणून मागचाच हा विषय घेतला आहे. गरीबांसाठी असलेल्या या विषयात एक नया पैसा सुद्धा या आठ महिन्यांत खर्च केलेला नाही. आपल्या प्रशासनाकडून किती दिरंगाई होते. प्रशासन किती निष्क्रिय आहे, हे आम्हाला आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. आपण हा

विषय मागे घेतला आहे. १०० कोटी रुपये भूसंपादन विभागासाठी राखून ठेवले होते. आपली वाटचाल स्मार्ट सिटीकडे खूप जोमाने चालू आहे. कोणी नाव देवो न देवो. तो विषय कोणी घेवो न घेवो. त्याच दिशेकडे वाटचाल चाललेली असताना आपण आपल्या शहरातील किती जमिनी महापालिकेच्या,सन्मा.अधिका-यांच्या थंड कामामुळे ताब्यात्त आलेल्या आहेत. त्यांना जमिनी ताब्यात घेण्यावाचून काही देणेघेणे नाही. शहरातल्या इतक्या जमिनी आरक्षणाखालील जमिनींबाबतीत कोण काही कारवाई करत नाही. कुठलेही पाऊल त्याबद्दल उचलले जात नाही. म्हणून आज अनेक क्रिडांगणांच्या जागा, अनेक गार्डनच्या जागा, अनेक शाळांच्या जागा, वेगवेगळ्या रिझर्वेशनच्या जागा कुणीतरी समाजकंटकांनी, गुंडांनी ताब्यात घेतलेल्या आहेत. तिथे काही ठिकाणी वसाहती झालेल्या आहेत. शहरातली सगळी क्रिडांगणे सुद्धा व्यापली गेली आहेत. आम्हाला १९५चे क्रिडांगण ताब्यात घेण्यासाठी दोन वर्षे लढावे लागले. आपण १९९४ मध्ये डि.पी. करतोय. गेले २०-२०/३०-३० वर्षे आपले हे प्रशासन त्याबाबतीत काहीही करत नाही. आम्हाला त्यांना पेपर नेऊन द्यावे लागतात. आम्ही मंजूरी दिलीतरी इमारती उभ्या राहिल्या आहेत. ज्यांच्या काळात रिझर्वेशन प्लॉटमध्ये या इमारती उभ्या राहिल्या, त्या अधिका-यांचे काय केले, तर काहीही केले नाही. त्यांनी जी पत्रे आली आहेत, ती फाईलला लावून ठेवली आहेत. अशा लोकांवर कारवाई झाली पाहिजे. अशा प्रकारे रिझर्वेशनच्या जागा लाटल्या जात आहेत. आणि आपले अधिकारी डोळे बंद करुन बसले आहेत. आम्ही किती वेळा तुमच्या निदर्शनास आणून दिले आहे. असे निगरगट्ट प्रशासन ते तुम्हाला सांगणार नाहीत कोणत्या जमिनी कोणी लाटल्या आहेत. त्यांनीच बिल्डींग परमिशन दिली आहे. बिल्डींग परमिशन सुद्धा रिझर्वेशनच्या जागेवर झाली आहे. पैसे त्याचसाठी आहेत. रिझर्वेशनच्या जागेवर पैसे द्यावे लागत नाहीत. त्यामुळे शहराचा बकालपणा वाढतो आहे हे लक्षात घ्या. याठिकाणी सगळ्यांच्याच बाबतीत हे करण्यापेक्षा तुम्ही आत्ता मा.प्रशांत शितोळे यांनी सांगितल्याप्रमाणे तुमच्या अधिकारात एक आढावा बैठक घ्या. शहरातील भूसंपादन विभागात जे लोक आहेत, त्यांनी फक्त टिडीआरचेच काम करावे. त्यांनी आपल्या ज्या हक्काच्या जमिनी आहेत, ज्या आपण घेऊ शकतो, त्याबाबतीत आम्हाला मदत करावी. मा.आयुक्त साहेब, हे अत्यंत चुकीचे आहे. मी याबाबतीत प्रशासनाचा निषेध करते व थांबते.

**मा.ठाकूर (उपसंचालक, नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, विषय क्रमांक ५च्या अनुषंगाने थोपटे साहेबांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात मी माहिती देऊ इच्छितो. सदरचा विषय आहे तो नगररचना विभागाकडे भूसंपादनासाठी निधी वर्ग करण्यासंदर्भात आहे. महापालिकेच्या पूर्व धोरणानुसार दरवर्षी भूसंपादनासाठी १०० कोटी निधी उपलब्ध करुन देत असतो. तथापि या वर्षी अन्य काही सदस्यांनी मागणी केल्यामुळे तत्कालिन आयुक्तांनी फक्त रु.१५ कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. आपले काही जागतिक प्रकल्प प्रलंबित आहेत. त्यासाठी भूसंपादनासाठी निधीची आवश्यकता आहे. त्यातील

बराचसा निधी सन्मा.थोपटे साहेबांच्या वॉर्डसाठी लागणार आहे. अशा परिस्थितीत तो निधी वर्ग करुन देण्यासाठी सन्मा.आयुक्तांनी प्रस्ताव ठेवलेला आहे. जागतिक बँकेच्या अनुषंगाने आणि बीआरटीएससाठी खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यासाठी हा निधी लागणार आहे. बीआरटीएस रस्त्यांसाठी जागतिक बँकेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे हे काम आपल्याला पूर्ण करणे आवश्यक आहे. असा जमिन संपादनासाठी खाजगी वाटाघाटीने जे पैसे द्यावे लागणार आहेत, त्यासाठी हा निधी आहे.

**मा.कैलासभाऊ थोपटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, तुम्ही भूसंपादनासाठी ठेवलेला निधी वापरता. परंतू शहरातील अंतर्गत रस्ते १० वर्षे झालीत तरी तो विषय का होत नाही, त्याचे उत्तर द्या.

**मा.ठाकूर (उपसंचालक, नगररचना)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मध्यंतरी स्थायी समितीमध्ये हा मुद्दा उपस्थित केला होता. आपल्या वॉर्डमधला एक रस्ता आहे, त्यातला बराचसा भाग हा जागेवर विकसित झाला आहे. एका प्रॉपर्टीमुळे हा रस्ता कार्यान्वित होणे शिल्लक आहे. मी सन्मा.कलेक्टर महोदयांना देखील यासंदर्भात विनंती केलेली आहे. त्याअनुषंगाने त्यांनी संबंधित जमिन मालकाला दोन वेळा नोटीस पाठवून जागा त्वरित हस्तांतरीत करण्याबाबतीत विनंती सुद्धा केली आहे. संबंधित जागा मालकाची आपल्या सूचनेवरुन आपण बैठक घेतली होती. त्याअनुषंगाने ते टिडीआरच्या बदल्यात जागा देण्याबाबतीत इच्छुक आहेत. तसा प्रस्ताव ते देतील. थोपटे साहेबांचा विषय लवकरच मार्गी लागेल, हे मी नमूद करु इच्छितो.

**मा.कैलासभाऊ थोपटे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आत्ताच ठाकूर साहेबांनी आपल्याला जे उत्तर दिले आहे. साहेब, विषय किती वर्षे प्रलंबित रहावा. आता आमच्या दोन टर्म संपल्या. आणि प्रत्येक वेळेस ज्या-ज्या वेळी विषय येईल त्या-त्या वेळी मी सभागृहात बोललो आहे. अजूनही आपल्याला अनेक उत्तरे दिली जातात. मा.बंड साहेब हे आयुक्त असताना त्यांनी सुद्धा त्या व्यक्तीबरोबर चर्चा केली. अनेक वेळा चर्चा केली. तरीसुद्धा बंड साहेबांना सुद्धा असेच खेळवले गेले. त्यानंतर आयुक्त म्हणून शर्मा साहेब आले मी अनेक वेळा स्थायी समितीच्या सभेत, महापालिका सभागृहात या विषयावर बोललो. त्यांनी सुद्धा चर्चा केली. त्यांना या कामात यश आले नाही. नंतर मा.डॉ.श्रीकर परदेशी साहेब आयुक्त म्हणून आले. नंतर मा.राजीव जाधव साहेब आले. परदेशी साहेबांच्या काळात मी हा विषय त्यांच्याकडे अनेक वेळा बोललो. तेही स्वतः जाऊन चर्चा करतो म्हणाले. जाधव साहेबांना त्या जागेवर नेऊन आम्ही स्वतः एकत्र जाऊन चर्चा केली. त्यांनी प्रयत्न केला. तरीसुद्धा हा विषय झालेला नाही. आत्ता मा.वाघमारे साहेब आले आहेत. ही शेवटची मा.महापालिका सभा आहे. आमची सुद्धा टर्म संपली आहे. गेले दहा वर्षांत सातत्याने प्रयत्न करुन मला एक साधा रस्ता करता आला नाही. आमचे हे दूर्दैव म्हणायला पाहिजे. यापेक्षा काय प्रयत्न करायला पाहिजे होता.

आम्ही आज नागरीकांना काय उत्तर द्यायचे हे तुम्हीच आम्हाला सांगा. आम्ही एवढे तळमळीने का बोलतो. नागरीकांना तिथे अडचणी आहेत म्हणून आम्ही बोलतो. ठाकूर साहेबांनी असे उत्तर दिले की, आम्ही चर्चा करुन तो प्रश्न मार्गी लावायच्या कामात आहे. मा.आयुक्त साहेब, हे योग्य आहे का, तुम्हीच सांगा. यासाठी अनेक वेळा चर्चा केली. सगळ्या आयुक्तांनी चर्चा केली, मिटींग घेतल्या, पण हे सोडून काही निष्पन्न झाले नाही. किती दिवसांत भूसंपादन करुन या जमिनीचे आवार्ड कधी करणार आहेत हे आयुक्त साहेबांनी मला सांगावे.

**मा.रामदास बोकड**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,नागरीकांचा प्रश्न मिटल्याशिवाय शेवट गोड होणार नाही, हे प्रत्येक नगरसदस्यांनी लक्षात घ्या. नगररचना विभागाचा प्रताप सदस्यांच्या चर्चेतून समोर येतो आहे. थोपटे साहेब म्हणाले तसे आमचे हे दूर्दैव म्हणावे लागेल की, गेले २० वर्षांपूर्वीची दोन आरक्षणे आहेत. त्यांच्यावर रिझर्वेशन पडले आहे. सीएमई आणि वैदूवस्ती शाळेचे क्रिडांगण. २० वर्षे आरक्षण पडल्यानंतर भूसंपादन करुन त्याचा निर्णय घ्यायला २० वर्षे जावी लागली. मला वाटते, येणारे प्रत्येक आयुक्त रिटायर्ड होतील पण हा प्रश्न सुटणार का नाही. हा प्रश्न निर्माण झाला आहे. राजू लोखंडे यांच्या काळात हा विषय आला होता. पण हा विषय पूर्ण झाला नाही. ठाकूर साहेब आरक्षणांसाठी आपला विभाग सक्षम नसेलतर या शहराचा विकास होईल का. आयुक्त साहेबांनी यावर विचार करायची गरज आहे. आरक्षणे झाली आहेत. आरक्षणांच्या ८० टक्के जागा ताब्यात आल्या आहेत. २० टक्के जागांसाठी प्रशासन कार्यरत नाही किंवा प्रशासन प्रयत्न करत नाही. नगररचना विभाग यात काही प्रयत्न करत नाही. अवॉर्ड डिक्लेअर केले आहे. कलेक्टर यांना पाठवले आहे. आयुक्तांना याची कल्पना दिली. काहीच नाही. अधिकारीच मुळात यावर काम करायला सक्षम नाहीत. लोकांचे प्रश्न कसे सुटतील. प्रत्येक महापालिका सभेत हा विषय विचारण्यात आला आहे. यावर सभागृहात चर्चा झाली. परंतू नगररचना विभागाने यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. याची पूर्तता झालेली नाही. जर असे २०/२० वर्षांसाठी प्रश्न राहीले तर शहराचा विकास होईल का. म्हणून या शहराचा स्मार्ट सिटीत समावेश होता होता राहिला आहे. जर नागरीकांच्या गरजेचे जे प्रश्न आहेत. विद्यार्थ्यांच्या खेळासाठी क्रिडांगणे असतील. याकडे नगररचना विभाग लक्ष देत नसेल, त्याठिकाणचे मूळ मालक बाजूलाच राहीला आहे. भाडेकरु सांगतात ते तुमचे अधिकारी ऐकतात. आपल्या विभागाचा कसा निर्णय होणार. खाजगी वाटाघाटीने होत नाही. आपल्या प्रशासनाची नियमावली आहे, त्याचा वापर केलात का. उलट ज्यांनी जागा दिल्या. मोठेमोठे ६० फूटाचे. जे रस्ते झाले. त्यांना आपले डिपार्टमेंट उत्तर देते की,आता डांबरी रस्ता झाला,आता मोबदला मिळणार नाही. मग शासनाचा आदेश. आणि आता इथे म्हणतात, तुम्हाला काम करताना शासन आदेश वापरता येत नाही. एखाद्याने जागा दिली, खाजगी वाटाघाटीने मोबदला मागीतला तर तूपसाखरे साहेबांचे उत्तर असते की, हा शासन निर्णय आहे. डांबरीकरण झाले आहे. मोबदला देता येत नाही. जागेचा ताबा घ्या. त्याचा

विकास करा. नागरीकांना फायदा होऊ द्या. त्यांना मोबदला द्या. प्रशासनाच्या दृष्टीने हे योग्य नाही. २०/२० वर्षे आरक्षणे ताब्यात येत नसतील तर उद्या हे शहर मोडीत काढून विकायला निघताय का काय. प्रशासन, नगररचना काय करतेय. वेळोवेळी नगररचना विभागाकडे पाठपुरावा करुन देखील पिंपळे गुरव सारखे मध्यवर्ती ठिकाण असताना त्याकडे दूर्लक्ष करुन ती आरक्षणे ताब्यात घेतली जात नाहीत. डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी कारवाई करायला सांगून सुद्धा ही कारवाई झालेली नाही. अधिकारी पण यांना सामिल आहेत. खरेतर शेवटचा दिवस आहे. मा.राजेंद्र जगताप म्हणाले, शेवटचा दिवस गोड व्हावा. ही शेवटची महापालिका सभा आहे. खरेतर आमची इच्छा नाही की इथे काही वाद व्हावा. परंतू हे प्रश्न वेळोवेळी मांडून पाच वर्षे त्याचा पाठपुरावा करुन देखील आम्हाला न्याय मिळाला नाही. हे खरे दुःख आहे. मा.आयुक्त साहेब, पाच-पाच वर्षे पाठपुरावा केला आणि आमचे प्रशासन त्याला न्याय देत नसेलतर ते या सभागृहाचे दूर्दैव आहे हे प्रशासनाने लक्षात घ्यावे. यावर काय करता येईल. बोलण्यासारखे भरपूर आहे. पण इथेच थांबतोय.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, इथे खाली असे लिहिले आहे की, अंदाजपत्रकात शहर अभियंता स्थापत्य, सहशहर अभियंता जलनिःस्सारण, कार्य.अभियंता पर्यावरण यांनी प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. उद्या असे व्हायला नको, आयुक्त साहेब, या गोष्टीला सुद्धा कुठेतरी निधी कमी पडेल व थोपटे साहेबांचे काम अपूर्ण राहील. मा.महापौर, मा.आयुक्त, मला एवढेच म्हणायचे आहे की, इथे ज्या-ज्या लोकांनी सांगितले आहे की, आम्ही निधी उपलब्ध करुन देतोय, त्यांना निधी कमी पडायला नको. दोन्ही झाले पाहिजे. त्यांनाही निधी कमी पडायला नको. आणि ठाकूर साहेबांनी सांगितले की, थोपटे साहेबांसाठीच हा निधी द्यायचा आहे. इथेही निधी कमी पडता कामा नये, याची दखल घ्यावी व हा विषय मंजूर करावा.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - भोसरी स.नं. १ आरक्षण क्र. ४३१ मध्ये अदयावत रुग्णालय व वाचनालय बांधणे या कामामध्ये करावयाची वाढीव कामे उदा.मुख्य प्रवेशव्दारा समोरी कॅनोपी करणे, ग्रेनाईट लावणे, फॉल्स सिलींग करणे, प्रवेशव्दार रुंद करणे इ. विविध कामे करणे आवश्यक आहे. या कामांमुळे खर्च वाढणार आहे सदर करावयाच्या वाढीव कामांचा एकूण खर्च अंदाजे १,००,००,०००/- (वाढीव १ कोट) एवढया रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

सदर रुग्णालयाची कामं अंतिम टप्प्यात असून वरील वाढीव कामे चालू कामातून केली असता रुग्णालयाचा वापर लवकरात लवकर करणे शक्य होणार आहे. सबब प्रस्तुत र.रु. २१,००,००,०००/- (वाढीव १,००,००,०००/-) एवढया रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेस व त्याअनुषंगाने होणा-या वाढीव खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली नाही.

**मा.महापौर** - मूळ विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-६

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/६६७/२०१६, दि.०७/०९/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४ दि.२/१२/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'कान-नाक-घसा तज्ञ' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०७/२०१५ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.२३९/२०१५ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. 'कान-नाक-घसा तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.२०/१२/२०१५ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेतउमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.२८/०३/२०१६ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'कान-नाक-घसा तज्ञ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.२१/०७/२०१६ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता,

अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.तेलंग वृषाली राहूल यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'कान-नाक-घसा तज्ञ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेअधीन नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. डॉ.तेलंग वृषाली राहूल यांना वेतनश्रेणीर.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'कान-नाक-घसा तज्ञ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, या विषयाबद्दल मला काही ऑबजेक्शन नाही. या विषयासंदर्भात मला काही बोलायचे आहे. नुकतेच ज्युनिअर इंजिनिअरचे डेप्युटी इंजिनिअर असे प्रमोशन झाले आहे. हे प्रमोशन चुकीच्या पद्धतीने झाले आहे, बेकायदेशीर आहे आणि यात फार मोठा आर्थिक घोटाळा झाला आहे. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी स्थापत्य अभियांत्रिकी यांची सेवाज्येष्ठता यादी आणि पदोन्नती घोटाळ्याबाबत चौकशी करायचे आदेश दिलेले आहेत काय. या अहवालाची सविस्तर माहिती या सभागृहाला देण्यात यावी. मा.आयुक्त यांना मा.अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री यांनी सेवाज्येष्ठता व पदोन्नती बाबतीत शासन नियमानुसार कारवाई करणेबाबत दिलेल्या पत्रावर काय कारवाई केली याचा सविस्तर अहवाल सभागृहाला देण्यात यावा. पदोन्नती सभा दि.१४/०९/२०१६ चा सविस्तर सभावृत्तांत सभागृहाला वाचून दाखवण्यात यावा. मा.उपसचिव, नगरविकास विभाग यांनी दि.२२/११/२०१६ रोजी शासनाच्या संबंधित विभागांना सेवाज्येष्ठता यादया करण्याबाबतीत स्पष्ट आदेश दिले होते. सदर आदेशात मा.महापालिका सभा ठराव क्र.८ दि.४/१/१९८३ नुसार एमसीएसआर १९८२ लागू आहे याबाबत आदेश दिलेले आहेत. सदर आदेशावर केलेल्या कारवाईचा तपशिल तसेच सन १९८३ पासून मनपाच्या स्थापत्य अभियांत्रिकीतील सेवाज्येष्ठता शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाअन्वये तयार करुन मा.विधी समितीला देण्यात आला आहे. दि.२२/११/२०१६ च्या शासन पत्रानुसार प्रमोशन झालेले नाही. चुकीच्या पद्धतीने प्रमोशन दिले आहे. गेले ४/५ महिने मी प्रशासनाला अनेक वेळा विनंती केली होती. जे.ई. टू डेप्युटी इंजिनिअर प्रमोशन दया. गेले ४/५ महिने प्रमोशन दिले नाही. आणि आम्हाला सांगितले आहे की, सरकारच्या इंस्ट्रक्शनसाठी थांबलेले आहे. एकच सिनिऑरीटी लिस्ट करायची. मग शासनाने दि.२२/११/२०१६ च्या पत्रात स्पष्ट उल्लेख केला आहे. यात ठराव क्र.८ दि.४/१/१९८३ आणि एमसीएसआर १९८२ यासंदर्भात स्पष्ट लागू केले आहे, याची कॉपी आत्ता माझ्याकडे उपलब्ध आहे. मग तुम्ही सरकारच्या ऑर्डरला बायपास कसे केले. एकाच अभियंत्यांच्या दोन वेगवेगळ्या यादया तयार करुन पदोन्नती देण्यास जबाबदार असणा-या सर्व अधिका-यांची नावे व त्यांची जबाबदारी याचा तपशिल या सभागृहाला देण्यात यावा. दि.२५/५/२०१५च्या पत्रावर काय कारवाई केली याचाही तपशिल देण्यात यावा.

सदर पत्रास उत्तर देण्यास दिरंगाई झाली असल्यास जबाबदार असणा-या व्यक्तीवर काय कारवाई करणार. कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांची एकत्रित सेवाज्येष्ठता यादी करुन तात्काळ तयर करुन पदोन्नती देण्यात यावी. याबाबतीत मा.उपसचिव, नगरविकास विभाग,महाराष्ट्र शासन यांनी दि.२२ नोव्हेंबर रोजी स्पष्ट आदेश दिलेले आहेत. असे असताना देखील महानगरपालिकेच्या प्रशासन विभागाने २ डिसेंबर २०१६ रोजी पुन्हा बेकायदेशीर, नियमबाह्य पदोन्नती दिलेली आहे. यामुळे मनपाच्या सेवाज्येष्ठ अभियंत्यांवर मोठा अन्याय झाला आहे. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असून महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची पायमल्ली करणारे आहे. त्यामुळे दिलेले प्रमोशन रद्द करुन सेवाज्येष्ठता यादी शासनाच्या दि.२२/११/२०१६ च्या पत्राप्रमाणे करावी असा उल्लेख मी इथे करु इच्छितो. या प्रमोशनमध्ये फार मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला आहे. महापालिकेच्या बिल्डींगमध्ये फिरत असताना काही-काही इंजिनिअरकडून आम्हाला ऐकायला मिळाले आहे. याचीदेखील चौकशी करण्यात यावी. मा.महापौर साहेब, या पत्राचे उल्लंघन काय केले याचे उत्तर मला पाहिजे.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त,प्रशासन)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, समितीपुढे जो विषय आला आहे तो मनपा आस्थापनेवरील 'कान-नाक-घसा तज्ञ' या पदावर सरळ सेवेने भरती करायची आहे. महापालिकेच्या अखत्यारीतील पद असल्यामुळे मा.विधी समितीने शिफारस केल्यानुसार हा विषय मान्यतेसाठी आला आहे. सन्मा.सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. शासनाकडील सदर पत्र आपल्याला प्राप्त झाले आहे. याचा अहवाल शासनाने मागवला आहे. तोही शासनाकडे पाठवला आहे. आत्ता ज्या पदोन्नती झाल्या आहेत तर त्या मा. हायकोर्टात ज्या केसेस पेंडींग आहेत, त्याच्या आधीन राहून प्रमोशन्स केलेले आहेत. ही प्रचलित पद्धत आहे. मा.महासभेने हे ठरवून दिले आहे. त्याच्या अनुषंगानेच आत्ताच्या पदोन्नती केल्या आहेत. आणि शासनाला जो अहवाल अभिप्रेत आहे तो अहवाल पाठवण्यात आलेला आहे. आजचा विषय वेगळा असल्यामुळे ते डॉक्युमेंटस् आता सध्या माझ्याकडे नाहीत. ते डॉक्युमेंटस् मी उपलब्ध करुन देईन.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब, हे पत्र वाचून दाखवावे. या पत्राप्रमाणे तुम्ही प्रमोशन्स केली आहेत का ते तुम्ही बघा.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त,प्रशासन)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, दि.२२ नोव्हेंबर २०१६ चे मा.उपसचिव,नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील मा.आयुक्त यांना पत्र आहे. या पत्राच्या अनुषंगाने ॲड.गौतम चाबुकस्वार, मा.विधानसभा सदस्य यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे तक्रार दाखल केली असून त्यास अनुसरुन सदर प्रकरणी चौकशी करावी असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या आदेशास अनुसरुन संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये आपला अहवाल मागवण्यात आला आहे. तथापि सदरचा अहवाल अप्राप्त आहे. तरी सदरचा अहवाल तात्काळ

पाठविण्यात यावा. त्याप्रमाणे अहवाल आत्ता पाठवण्यात आला आहे. त्यानंतर प्रस्तूत प्रकरणी शासनाच्या संदर्भाधीन अनु क्र.१ वरील पत्रान्वये स्थापत्य अभियांत्रिकी पदाच्या पदोन्नतीची बिंदूनामावली तसेच कनिष्ठ अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता यादी तयार करण्याबाबतीत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. तथापि, यास अनुसरून अद्याप कार्यान्वित झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तूतप्रकरणी अद्यापही शासनाकडे विविध स्तरांवर तक्रारी होत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १९८३ च्या ठराव क्र.८ अन्वये, महाराष्ट्र नागरी सेवानियम १९८२ लागू केलेला आहे. याप्रकरणी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय घेण्यात आले होते. सामान्य प्रशासन विभागाच्या अनुषंगिक संदर्भाची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुढील कोणतीही कारवाई सामान्य प्रशासन विभागाच्या सदरच्या अनौपचारिक संदर्भातील अभिप्राय तसेच पदोन्नतीबाबतीत वेळोवेळी सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेले स्थायी आदेशमधील तरतूदीचा समावेश करण्यात यावा. या पत्राच्या अनुषंगानेही मा.महासभेने केलेले ठराव, मा.उच्च न्यायालयात ज्या पेडींग केसेस आहेत त्यांचा अंतर्भाव आणि आपल्या महासभेने जी प्रचलित पद्धत घालून दिलेली आहे, त्या सर्वांच्या माहितीचा अहवाल शासनाला अवगत करण्यात आलेला आहे.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब, पण या लेटरमध्ये शासनाने स्पष्ट म्हटले आहे की, १९८३ च्या ठरावाप्रमाणे करा.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त,प्रशासन)** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, याबाबतीत डिटेल्स रिपोर्ट शासनाला पाठवला आहे. सामान्य प्रशासन विभागाने आपली बिंदूनामावली तपासत असताना नगरविकास विभागाला त्याची अनौपचारिक प्रत दिली होती. त्याअनुषंगाने कारवाई करायला सांगितले आहे. परंतू याच मुद्यावर आपल्या लोकांनी हायकोर्टात रिट पिटीशन केले आहे की, महापालिकेने जी प्रचलित पद्धत वापरली आहे ती चुकीची आहे. कारण आपण जे कोर्टामध्ये रिटपिटीशन आहे त्याच्या अधिन राहूनच ही पुढची कारवाई करतोय. या संदर्भातील डिटेल्स रिपोर्ट पुन्हा शासनाला पाठवलेला आहे.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब, शासनाने दि.२२ नोव्हेंबरला दिलेला लेटेस्ट निर्णय आहे. आणि ब्लॅक अँड व्हाईटमध्ये आहे. चार महिने हेच सांगितले होते की, आम्ही शासन व कोर्टाच्या ऑर्डरवर थांबलोय. मग प्रमोशन कसे काय दिले आहे. इंजिनिअर यांनी प्रमोशन करण्यासाठी किती पैसे दिले आहेत हे विचारा. तुम्ही न्याय देणार नसालतर मी राज्य शासनाकडे घेऊन जाणार. हे पत्र मराठीत आहे.

**मा.महापौर** - हा विषय कोर्टात आहे.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब, कोर्टात मॅटर असेलतर सबज्युडीशियल होते. विषय कोर्टात पेंडींग असेलतर प्रमोशन कसे काय दिले. मला गेले चार महिने हेच सांगितले आहे.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आपल्याकडे डेप्युटी इंजिनिअरची साधारणतः १४ पदे रिक्त होती आणि आयुक्त साहेब आल्यापासून आमच्यासारखी जी काही सिनिअर मंडळी आहेत. आम्ही स्वतः आयुक्त साहेबांना सारखी विनंती करत होतो. महापौर मॅडम आपल्याला पण विनंती केली होती की, डिपीसी लवकर लावा. सिटी इंजिनिअर, ॲडीशनल इंजिनिअर ही पदे भरा. हे भरण्यात आयुक्तांचा माणस असाच होता की शासनामध्ये जसे प्रमोशन होते त्याप्रमाणे व्हायला पाहिजे. डिग्रीवाले भेटत होते, डिप्लोमावाले सुद्धा भेटत होते. वेगवेगळे लोक येत होते. यात अनेकांनी तक्रारी केल्या की, यात काहीतरी गफलत आहे, काहीतरी गफलत आहे काहीतरी गफलत आहे. म्हणून आयुक्त साहेब निर्णय घेत नव्हते. आम्ही दहा वेळा प्रशासनाला विनंती केली होती की, तुम्ही अधिका-यांचे प्रमोशन करा. परंतू १९८३ पासून एकच पद्धत प्रचलित पद्धत चालत आली आहे. दुरुस्ती करायची झालीतर काही लोकांना डिप्रमोट करावे लागेल, मागे जावे लागेल. एनफोर्स जे करायचे ते आपण चांगल्या पद्धतीने करावे. हायकोर्टात जे ॲफिडेव्हिट दिले आहे. १:१ याअनुषंगाने आपण प्रमोशन द्यावे अशी मी स्वतः विनंती केली होती. अनेकांनी केलेली आहे. शिवाय जी.बी.ने व विधी समितीने देखील तशी मान्यता दिलेली आहे. तेव्हा हे मान्य करायला काही हरकत नाही. परंतू शासनाचे जे निर्देश आहेत. आदरणीय आमदारांनी शासनाकडे ज्या काही तक्रारी केल्या आहेत, त्याचा खुलासा प्रशासनाने केला आहे. त्यात काही चुकीच असेलतर शासन तसे डायरेक्शन्स देईल. परंतू आपण कोर्टात जे ॲफीडेव्हीट दिले आहे त्यालाच अधिन राहून म्हणून इथून मागे मा.आशिष शर्मा थांबले होते, मा.बंड साहेब पण थांबले होते, अनेक अधिकारी या गोष्टीला थांबवून रहात होते. परंतू पहिल्यापासून एकास एक म्हणजे एक डिग्री, एक डिप्लोमा अशा पद्धतीने चालू आहे. कारण असं आहे की उद्या प्रशासनाला असे वाटायला नको, आम्ही काहीतरी देतो आणि जी.बी.त मूग गिळून गप्प बसतो. साहेबांचा जो उद्देश्य आहे, भ्रष्टाचार झाला असेलतर कोणी केला, कोणी पैसे दिलेत याची चौकशी करावी. परंतु आमच्यासारख्यांनी जी विनंती केली होती. आम्हाला सांगणे गरजेचे आहे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवावर्गात वर्ग २ मध्ये सुरक्षा अधिकारी हे पद असून वेतनश्रेणी (९३००-३४८०० व ग्रेड पे ४६००) अशी लागू करणेत आली आहे. तसेच सदर पदास सर्व प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार प्रदान करणत आलेले आहे. त्यानुसार कामगार कल्याण अधिकारी, संगणक अधिकारी, प्रशासन अधिकारी या वर्ग २ चे पदानुसार सुरक्षा अधिकारी हे समकक्ष पद येत असताना या पदास वर्ग ३ ची वेतनश्रेणी लागू करणेत आली असल्याचे स्पष्ट होत आहे. प्रत्यक्षात सहाव्या वेतन आयोगात मा.कामगार कल्याण अधिकारी व संगणक अधिकारी यांची विदयमान वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड पे ५४०० लागू करणेत येऊन सुरक्षा अधिकारी या पदाची विदयमान वेतनश्रेणी ७४५०-२२५-११०५० व पाचव्या वेतन आयोगातील सुधारित

वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे ४६०० लागू करणेत आली आहे. ज्यामुळे वर्ग २ मधील पदास लागू करणेत आलेला ग्रेड पे ५४०० व सुरक्षा अधिकारी पदाचा ग्रेड पे ४६०० यामध्ये तफावत असून र.रु. ८०० चा फरक दिसून येत आहे. त्यामुळे सुरक्षा अधिकारी पदाचे सुधारित वेतन कमी आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी पुणे १८ मध्ये प्रशासन विभागाकडील आदेश क्रं. प्रशा/०१/कावि/३३४/२०१३ दि.२६/०३/२०१३ अन्वये वर्ग २ चे सुरक्षा अधिकारी या पदावर (९३००-३४८०० + ग्रेड पे ४६००) या वेतनश्रेणीत श्री. उदय गणपत जरांडे यांची नेमणुक करणेत आली असून ते सुरक्षा अधिकारी या पदावर दि.०४/०४/२०१४ रोजी रुजू झाले आहेत.

तरी कामगार कल्याण अधिकारी व संगणक अधिकारी यांना पाचव्या वेतन आयोगात लागू करणेत आलेल्या वेतनश्रेणीनुसार सुरक्षा अधिकारी यांच्या रुजू दिनांकापासून सदरची वेतनश्रेणी गृहीत धरुन महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये देखील सदर वेतनश्रेणी लागू करणेकामी शिफारस केलेली बाब विचारात घेता सहाव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणी र.रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे ५४०० लागू करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच योगेश बहल यांनी उपसूचना दिली त्या उपसूचनांबाबत मा.आयुक्त साहेबांना परत एकदा सांगु इच्छितो की गेल्यावेळेस मी सुरक्षेचा विषय काढला होता त्यामध्ये आठ दिवसात चौकशी करुन सुरक्षा विभागामध्ये भ्रष्टाचार झाला किंवा त्यांच्यावर जे जे मी आरोप केलेले आहेत ते सिध्द करण्यासाठी आपण समिती लवतो अस सभागृहात सांगीतल असताना त्यांच्यावर आपण चौकशी लावली  असताना आदरणीस माजी महापौर योगेश बहल यांनी हा जो विषय मांडला आहे तो मला दुर्दैवी वाटतो. या विषयावर मी ज्यांच्या नावावर आरोप केलेला आहे ते सिध्द करण्याच आपल्याकड काम सोपवलेल आहे त्याच्यावर अजून काही निघालेल नाही. त्या विषयाच काय झाल हे सांगाव. त्याच मला पहील्यांदा उत्तर दयाव.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच कुमार साहेबांनी जे काही प्रश्न विचारले होते, त्यासंदर्भात आता आपल्याकडून समजल की ती कोर्टात केस असल्यामुळे जे आपले कायदासल्लागार आहेत त्यांनी सांगाव की असं देता येत का कोर्टात केस असताना प्रमोशन देता येत का.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याकड आरोग्य कार्यकारी अधिकारी जे पद आहे ते आपण किती वर्षे रिक्त ठेवलेल आहे. आपण ॲडीशनल अधिकारी नेमतो. आपल्याकड आरोग्य विभागामध्ये त्या पदासाठी सक्षम व्यक्ती उपलब्ध असताना आपण ते प्रमोशन का करत नाहीत, त्याचा खुलासा करावा.

**मा.तानाजी शिंदे (अति.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सन्मा.दत्तात्रय साने यांनी सुरक्षा विभागावर जे प्रश्न पुर्वी विचारलेले होते त्यावेळी मा.आयुक्तांनी सांगीतले होते की त्या तक्रारीबाबत आम्ही चौकशी नेमू. त्याबाबत चौकशी समिती अतिरीक्त आयुक्त आणि इतर दोन सदस्यांची चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे. त्या चौकशीच काम चालू आहे, येत्या आठ दिवसामध्ये त्याचा अहवाल मा.आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात येईल.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता उत्तर दिल त्याच्यावर अभिनंदन कराव का काय कराव हे मला माहित नाही. त्यांनाही माहिती आठ दिवसानंतर सभागृहात आम्हीही येणार नाहीत. मी प्रश्नोत्तर विचारले होते त्याला तीन महिने झालेले आहेत. म्हणजे तुमचे आठ दिवस नक्की कुठले. या वर्षाचे आठ दिवस का पुढच्या वर्षाचे आठ दिवस. सभागृहामध्ये आयुक्तांनी आठ दिवसाच्यामध्ये समिती नेमून चौकशी करुन तुम्हांला पुढच्या मिटींगमध्ये उत्तर देतो असे सांगीतले होते अस उत्तर असताना आता आणखीन पुढचे कुठले आठ दिवस. या उत्तराशी मी सहमत नाही. याच्या अगोदर सुध्दा मी आपल्याला भेटून विचारलेल होते. त्यावेळेस पण तुम्ही म्हणाले होते की पुढच्या मिटींगमध्ये देतो. याचा अर्थ आपण कोणाला पाठीशी घालणार आहात का. तुम्ही चुकीच्या विषयाला आयुक्त या नात्यान पाठीशी घालता. आता आठ दिवसापुर्वी एका सिक्यूरीटी गार्डने फाशी घेतलेली आहे, याच हरॅशमेंटमुळे. आत्महात्या करण्यापर्यंत जर हे लोक असं करत असतीलतर मला वाटत नाही तुम्ही या लोकांना पाठीशी घालाव म्हणून. चुकीच्या पध्दतीन सिक्यूरीटीच काम चाललेल आहे. तुमचे आठ दिवस मला माहित नाही, आजच मला सांगाव. ही शेवटची मिटींग आहे या मिटींग नंतर सभा होईल का नाही सांगता येत नाही कारण आम्ही आमच्या इलेक्शनला जाऊ. मा.महापौर साहेब, आपण आदेश दयावेत या विषयाला तीन महीने झालेले आहेत.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, आर.एस.कुमार साहेबांच्या प्रश्नाच काय झाल.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त,प्रशासन) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्थापत्य अभियंता टु उपअभियंता, उपअभियंता टु कार्यकारी अभियंता यांच्या पदोन्नतीसाठी जी आपली पॉलीसी ठरलेली आहे त्याला काही लोकांनी कोर्टामध्ये चॅलेंज केलेल आहे. त्याच्यामध्ये ऑर्डर अशी आहे की कोर्टाच्या निर्णयाच्या आधिन राहून आपण कारवाई करु शकतो. म्हणून आपण कोर्टाच्या निर्णयाच्या आधिन राहून ही कारवाई केलेली आहे. मा.कोर्टाने जसा आदेश देईल त्याप्रमाणे आपण रिलीज पण करु शकतो. आरोग्य कार्यकारी अधिकारी पदासाठी जे सेवाशर्ती आहेत त्याच्यानुसार आपल्या महापालिकेच्या मंजूर सेवाशर्ती आहेत त्याच्यानुसार आपल्या महापालिकेतील एकही कर्मचारी त्या पदासाठी पात्र नाही. त्या पदासाठी कोणीही कोर्टात गेलेल नाही.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, माझ्या प्रश्नाचा खुलासा आयुक्तांनी करावा.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सुरक्षा रक्षाकाच्या बाबतीत मा.सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला होता. त्याच्यावर समिती फॉर्म झाल्यानंतर त्याच्या चौकशीच्या कार्यवाहीला थोडासा विलंब झालेला आहे. जरी विलंब झाला असेलतरी येत्या आठ दिवसामध्ये याचा चौकशी अहवाल आपल्यापुढे सादर होईल.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, शासनाच्या आदेशाची पायमल्ली केलेली आहे. मी तुम्हांला कागदपत्र दाखवलेले आहेत.

**मा.महापौर -** शासनाला उत्तर पाठवलेल आहे. उपसूचना स्विकारली का ?

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ९६६ विषय क्रमांक-६

दिनांक-२२.१२.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/६६७/२०१६, दि.०७/०९/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४ दि.२/१२/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'कान-नाक-घसा तज्ञ'अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०७/२०१५ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.२३९/२०१५ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. 'कान-नाक-घसा तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.२०/१२/२०१५ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.२८/०३/२०१६ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे ' कान-नाक-घसा तज्ञ ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.२१/०७/२०१६ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखीपरीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.तेलंग वृषाली राहूल यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये ' कान - नाक - घसा तज्ज ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यते अधीन नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. डॉ.तेलंग वृषाली राहूल यांना वेतनश्रेणीर.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'कान - नाक - घसा तज्ज' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवावर्गात वर्ग २ मध्ये सुरक्षा अधिकारी हे पद असून वेतनश्रेणी (९३००-३४८०० व ग्रेड पे ४६००) अशी लागू करणेत आली आहे. तसेच सदर पदास सर्व प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार प्रदान करणत आलेले आहे. त्यानुसार कामगार कल्याण अधिकारी, संगणक अधिकारी, प्रशासन अधिकारी या वर्ग २ चे पदानुसार सुरक्षा अधिकारी हे समकक्ष पद येत असताना या पदास वर्ग ३ ची वेतनश्रेणी लागू करणेत आली असल्याचे स्पष्ट होत आहे. प्रत्यक्षात सहाव्या वेतन आयोगात मा.कामगार कल्याण अधिकारी व संगणक अधिकारी यांची विदयमान वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड पे ५४०० लागू करणेत येऊन सुरक्षा अधिकारी या पदाची विदयमान वेतनश्रेणी ७४५०-२२५-११०५० व पाचव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणी रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे ४६०० लागू करणेत आली आहे. ज्यामुळे वर्ग २ मधील पदास लागू करणेत आलेला ग्रेड पे ५४०० व सुरक्षा अधिकारी पदाचा ग्रेड पे ४६०० यामध्ये तफावत असून र.रु. ८०० चा फरक दिसून येत आहे. त्यामुळे सुरक्षा अधिकारी पदाचे सुधारित वेतन कमी आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी पुणे१८ मध्ये प्रशासन विभागाकडील आदेश क्रं. प्रशा/०१/कावि/३३४/२०१३ दि.२६/०३/२०१३ अन्वये वर्ग २ चे सुरक्षा अधिकारी या पदावर (९३००-३४८०० + ग्रेड पे ४६००) या वेतनश्रेणीत श्री. उदय गणपत जरांडे यांची नेमणुक करणेत आली असून ते सुरक्षा अधिकारी या पदावर दि०४/०४/२०१४ रोजी रुजू झाले आहेत.

तरी कामगार कल्याण अधिकारी व संगणक अधिकारी यांना पाचव्या वेतन आयोगात लागू करणेत आलेल्या वेतनश्रेणीनुसार सुरक्षा अधिकारी यांच्या रुजू दिनांकापासून सदरची वेतनश्रेणी गृहीत धरुन महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये देखील सदर वेतनश्रेणी लागू करणेकामी शिफारस केलेली बाब विचारात घेता सहाव्या वेतन आयोगातील सुधारित वेतनश्रेणी र.रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे ५४०० लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९६७ विषय क्रमांक - ७

दिनांक- २२.१२.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.
क्र.स्था/BSUPप्र/४९९/२०१६ दि. ४/१०/२०१६
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.९५३ दि.२८/११/२०१६

केंद्रशासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार व त्यासंबंधी प्रस्ताव सादर करणेसाठी शासनाचे मा.श्री. निर्मलकुमार देशमुख, राज्य अभियान संचालक यांनी दि.०३/०२/२०१६ तसेच दि.१३/०४/२०१६ च्या पत्रामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना "सर्वांकरिता घरे २०२२" मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून नेमणूक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR (Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाच्या छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकास मंडळाच्या कार्यालयाकडे सादर करणेविषयी कळविले आहे.

**या योजनेतील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-**

१) सदर योजनेमध्ये केंद्रशासनाचे प्रत्येक घरासाठी र.रु.१.५ लक्ष व राज्य शासनाचे र.रु.१ लक्ष इतके अनुदान आहे व उर्वरित हिस्सा महानगरपालिका व लाभार्थी यांचा असणार आहे.

२) सदर योजनेमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत.

३) या योजनेसाठी शहरातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या नागरिकांचे अर्ज मागवावयाचे आहेत. ज्या व्यक्तीचे उत्पन्न वार्षिक र.रु.३ लाख आहे तोच लाभार्थी पात्र ठरणार आहे.

४) लाभार्थी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.

५) सदर योजनेतील घरे हे कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील आणि कर्ती महिला सदस्य नसेल तर या ठिकाणी कर्ता पुरुष यांच्या नावे घर राहिल.

६) लाभार्थी कुटुंबामध्ये पति / पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल. या अभियान अंतर्गत केंद्राकडून अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता देशातील कोणत्याही भागात लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे पक्के घर नसावे.

७) अभियान अंतर्गत बांधण्यात येणा-या घरांची सहकारी संस्था स्थापन करणेत येईल.

८) या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता प्रधानमंत्री आवास योजना, “सर्वांसाठी घरे” - नागरी च्या मार्गदर्शक सूचनानुसार राहील

सदरची योजना केंद्रशासनाची असून योजनेस केंद्र व राज्य शासनाने सदर योजनेस आर्थिक मदत दर्शविली आहे. त्याअनुषंगाने सदर योजना नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाद्वारे लागू केली असून त्यामुळे सदर योजनेमध्ये महानगरपालिकेने भाग घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार EWS (Economically Weaker Section) च्या आरक्षित जागांवर घरकूल प्रकल्प राबविणेकरिता DPR बनविणेकामी त्या जागेचा सविस्तर सर्व्हे करणे, इमारत बांधकाम नकाशे तयार करणे, मुलभूत सुविधा (Infrastructure) नियोजन करणे, बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पाकरिता पर्यावरण नाहरकत दाखला, शासकीय तसेच निमशासकीय संस्थाकडील नाहरकत प्रमाणपत्रे सादर करणे, प्रकल्पाच्या बांधकामास परवानगी घेणे, निविदा तयार करणे, DPR बनवून तो शासनाकडे सादर करणे, तसेच त्यास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी तसेच अनुदान मिळविणेकामी वेळोवेळी पाठपुरावा करणे व इतर तदनुषंगिक वास्तुविशारद व अभियांत्रिकी विषयक सल्ला इत्यादी आवश्यक कामे करणेकामी सदर क्षेत्रातील अनुभवी वास्तुविशारद व अभियांत्रिकी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत EWS योजनेच्या घरे बांधणेचे काम करणेसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. इनग्रेन आर्किटेक्ट अँण्ड अर्बन प्लॅनर यांची नेमणूक केली आहे व त्यांचेमार्फत DPR बनविणेचे काम सुरु आहे.

सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरे या आरक्षणांतर्गत च-होली येथे स.नं.४०८ पै,४०९ पै, (आरक्षण क्र.२/८३) मधील २.१५ हेक्टर क्षेत्रात महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. सदर जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २.५ F.S.I. अपेक्षित धरुन १४४२ घरकुले बांधणेचे नियोजन केलेले आहे.

- **प्रकल्पातील इमारतींविषयी ठळक वैशिष्ट्ये**

१) इमारत पार्किंग + १४ मजली (तळ मजला पुर्णपणे पार्किंगसाठी राखीव). इमारतीभोवती पुरेशी मोकळी जागा

२) दोन लिफ्ट - १.४८ X २.१० मी. (५' X ७')

३) एक स्ट्रेचर लिफ्ट ३.३६ X १.९९ मी. (११' X ६.६')

४) दोन जिने (रुंदी १.५० मी.), जिन्या मध्ये कोटा फरशी.

५) सामाईक पॅसेज (रुंदी १.३५ मी.), Vitrified tiles सुरक्षिततेच्या दृष्टीने १.२ मीटरउंचीची पडदी (Parapet) Oil Paint सह.

६) इमारतीला बाहेरुन Texture Paint व आतून Oil Bound Distemper

७) नियमानुसार आवश्यक ती अग्निशमन व्यवस्था (Fire Fighting).

८) जमिनीखाली व इमारतीवर आवश्यक क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या.

९) प्रत्येक इमारतीस सोलर हिटर सुविधा.

१०) इमारतीचे Alluminium Form Work च्या सहाय्याने एकसंध RCC बांधकाम (Monolithic Construction).

११) पार्किंगमध्ये Trimix पध्दतीचे Flooring. प्रत्येक इमारतीच्या पार्किंगमध्ये स्वच्छतागृहासह सोसायटी ऑफीस.

१२) प्रत्येक मजल्यावर १६ सदनिका, प्रत्येक सदनिकेला पुरेसा उजेड, हवेशीर अशी व्यवस्था.

१३) इमारतींचा देखभाल - दुरुस्तीचा कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ३ वर्षे व लिफ्टची देखभाल दुरुस्तीचा कालावधी ५ वर्षे राहील.

१४) मलशुध्दीकरण केंद्राचा देखभाल दुरुस्तीचे कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ५ वर्षाचा राहील.

- **इमारतीतील सदनिकेची ठळक वैशिष्ट्ये**

१) केंद्र शासनाच्या नियमानुसार एका सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (Carpet Area) ३० चौ.मी. (३२२ चौ.फुट).

२) बैठकीची खोली (Hall)- ३.०६ X ३.२ मी. (१०' - १ X १०' - ६'')

३) स्वयंपाक गृह (Kitchen)- २.४९ X १.९८ मी. (८'X ६' - ६'')

४) शयनगृह (Bedroom)- २.७४ X ३.२० मी.(९'X १०' - ६'')

५) स्नानगृह (Bathroom) -१.५२ X १.२० मी. (५'X ४') Wash basin सह, स्नानगृहामध्ये Antiskid ceramic tileflooring,४ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado व Oil Paint.

६) शौचालय (W.C.)- १.२० X ०.९१ मी. (४'X ३') ओरीसा पध्दतीचे W.C. पॅन, सिरॅमिक टाईल फ्लोरींगव ४ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado व ४ फुटाच्या वरील भागास Oil Paint.

७) माळा (Loft) स्वयंपाकगृहामध्ये ०.६ मी. (२') रुंदी व ०.७५ मी. (२' ६'') उंचीचा.

८) मुख्य दरवाजा व बेडरुम चा दरवाजा - PUF Material मध्ये.

९) स्नानगृह व संडास चा दरवाजा - PVC Material मध्ये.

१०) खिडक्या - Alluminium Sliding व लोखंडी Grill सह.

११) विद्युत तारा- Casing पट्टीमध्ये, Powerpoint,Switches - Anchor कंपनीचे

/ तत्सम.

१२) Kitchen Otta - Kadappa Platform मध्ये Stainless Steel sink, Platform वर २ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado.

१३) सदनिकेमध्ये आतील भिंतींना सर्वत्र Oil Bound Distemper.

अशा पध्दतीची इमारतीची व सदनिकेची वैशिष्ट्ये राहतील.

सदर प्रकल्पा अंतर्गत च-होली येथे १४४२ सदनिका बांधणेकामी रु.१,१९,३१,७६,९४९/- इतका खर्च येत आहे. त्यानुसार प्रत्येक सदनिकेला येणारा खर्च हा र.रु. ८,२७,४४६/- इतका आहे. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. त्यानुसार प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.१,५१८/- इतका येत आहे.

१) केंद्रशासन अनुदान - रु.१.५० लक्ष

२) राज्यशासन अनुदान - रु.१.०० लक्ष

राज्य शासन योजनेसाठी रु.१ लक्ष चे अनुदान देणार आहे. सदरचे घर हे १४ मजली इमारतीमध्ये सर्व सोयी - सुविधायुक्त असणार आहे. यापूर्वी EWS च्या घरकुल योजनेसाठी सन २०१० मध्ये लाभार्थ्यांकडून त्यांच्या हिश्श्यापोटी रु.३.७६ लक्ष घेण्याचे मनपाने मान्य केले. त्यानुसार लाभार्थ्यांनीही सदर योजनेतील त्यांच्या हिश्श्यापोटी रु.३.७६ लक्ष भरले आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनेतील सदनिकेच्या लाभार्थ्यांकडून त्यांच्या हिश्श्यापोटी र.रु.५ लक्ष घेण्यास हरकत वाटत नाही. त्यामुळे सदर प्रकल्पातील महानगरपालिकेचा प्रति सदनिका हिस्सा रु. ७७ हजार इतका राहील. प्रकल्पाचा नियोजित कालावधी ३ वर्ष इतका असल्याने महानगरपालिकेस प्रतिवर्षी रु. ३.७२ कोटी घालावे लागणार आहेत.

सदनिकाच्या खर्चाचे वाटप खालीलप्रमाणे.

१) केंद्र शासन - रु.१.५० लक्ष

२) राज्य शासन - रु.१.०० लक्ष

३) म.न.पा. - रु.०.७७ लक्ष

४) लाभार्थी - रु.५.०० लक्ष

**एकुण - रु.८.२७ लक्ष**

प्रत्येक प्रकल्पामध्ये कमर्शिअल वापरासाठी २% जागा विकास नियंत्रण नियमावली (D.C. Rule) नुसार ठेवणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सदर प्रकल्पातील जागा ६०३७.३० चौ.फुट इतकी आहे.

प्रकल्पामध्ये महानगरपालिकेचा हिस्सा प्रत्येक सदनिकेसाठी र.रु.१ लक्ष इतका आहे. तो हिस्सा कमी करणेच्या दृष्टीकोनातून व मनपाचा Infrawork साठी सुध्दा खर्च येणार आहे तो काही प्रमाणात कमी व्हावा म्हणून कमर्शिअल जागेकरीता स्वतंत्र निविदा काढून ५० वर्षाचे Lease ने देणे व त्यातून मिळणाऱ्या Premium द्वारे मनपाचा स्वहिस्सा कमी करता येईल.

कमर्शिअल वापराकरिता बांधून वापरा या तत्वावर करारनामा करुन अटी व शर्ती ठरवून विकसकाकडून Premium ची रक्कम २ वर्षात २ हप्त्यात घेण्यात येईल. ५० वर्षांनंतर इमारतीसहित संपूर्ण जागा मनपाला विकसकाने परत देणे क्रमप्राप्त राहील. Lease कालावधीत इमारतींचे मिळकत कर, पाणीपट्टी, विद्युत बिल इत्यादी विकसकाने भरणे आवश्यक राहील.

महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामध्ये (D.P.) च-होली येथील जागा EWS साठी राखीव असल्याने सदर प्रकल्पामध्ये जागेची किंमत गृहित धरण्यात आलेली नाही

लाभार्थ्यांचा हिस्सा रु.५.०० लक्ष इतका आहे. त्यामध्ये सोडतीमध्ये (Lucky Draw) नाव आल्यानंतर पहिला हप्ता २०% रक्कम, दुसरा हप्ता ४०% रक्कम हा इमारतीचे काम ५०% झाल्यानंतर व तिसरा हप्ता ४०% रकमेचा भरणा ताबा मिळण्यापूर्वी मनपाकडे करणे आवश्यक आहे. सदरची सदनिका मनपा मार्फत बांधून लाभार्थ्यांना त्यांचा हिस्सा भरुन घेतलेनंतर ९९ वर्षाच्या Lease ने देणेत येतील. त्याशिवाय विज, पाणी मिटर व स्वयंपाकासाठीचे गॅस पाईपलाईन करिता अनामत रक्कम जोडणी शुल्क यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च लाभार्थ्यास स्वतः (स्वहिश्श्या व्यतिरिक्त) महानगरपालिकेकडे भरावा लागेल. तसेच लाभार्थ्यांना मिळकत कर, वीज बिल इ. बिले स्वतः भरावी लागतील. प्रत्येक इमारतीची सोसायटी स्वतंत्र करणेत येईल व सोसायटीमार्फत सामाईक वीज बिल, सामाईक पाणी बिल भरावे लागेल.

महानगरपालिका ज्याप्रमाणे मनपा क्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, दिवा बत्ती, ड्रेनेज, मलशुध्दीकरण केंद्र (STP), घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management) इत्यादी मुलभूत सुविधा (Infrastructure) स्वखर्चाने करते त्याप्रमाणे या प्रकल्पातही महानगरपालिकेने स्वखर्चाने करावे असे वाटते. या सुविधा MPCB पर्यावरण खात्याच्या नियमानुसार करणे आवश्यक आहे. त्या मुलभूत सुविधाचा खर्च खालीलप्रमाणे :-

| **अ क्र** | **ठिकाणाचे नाव** | **सीमा भिंत** | **रस्ते** | **पावसाळी गटर व** Rain water harvesting | **पा.पु.** | **ड्रेनेज** | **मल शुध्दी करण केंद्र (STP)** | **घनकचरा व्यवस्थापन (S.W.M)** | **दिवा बत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर इ.** | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्व आकडे लक्ष मध्ये** | | | | | | | | | | |
| १ | च-होली | २७.९२ | २३२.८६ | ९३.८८ | १२.६१ | ४३.३२ | १५१.१५ | १.०० | २३३.४७ | ७९६.२१ |

एकंदरीत वरील सर्व ठिकाणी मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी रु.७९६.२१ लक्ष इतका खर्च येईल. सदर प्रकल्पातील इमारतींचे काम सुरु झालेनंतर मुलभूत सुविधा (Infrastructure) करिता निविदा काढण्यात येतील.

सदर प्रकल्पासाठी खालील बाबींची मंजूरी आवश्यक आहे.

१) प्रस्तावास प्रशासकीय मान्यता

२) बांधकाम परवानगी

३) पर्यावरण खात्याकडील नाहरकत दाखला (Environmental Clearance Certificate), केंद्रीय भूमिजल बोर्डाकडील नाहरकत दाखला.

४) राज्य शासनाच्या “केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती” (CSMC) ची मान्यता.

प्रशासकीय मान्यतेनंतर बांधकाम परवानगी साठी व पर्यावरण दाखल्यासाठी अर्ज दाखल करणेत येईल. प्रस्तावास मनपाची मान्यता मिळालेनंतर सदर योजना म्हाडा मार्फत राज्य शासनाच्या “केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती” (CSMC) ची मान्यता घेवून प्रकल्पाच्या इमारतीच्या बांधकामांच्या सर्व निविदा काढणेत येतील.

सदर प्रकल्पास सक्षम प्राधिकारी (झोनिपू विभाग), नगररचना विभाग, भुमि आणि जिंदगी विभाग, बांधकाम परवानगी विभाग, कायदा सल्लागार (कायदा विभाग) व माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचेकडून अभिप्राय आलेला आहे.

पंतप्रधान आवास योजनेकरिता प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**तक्ता - अ**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा इमारत बांधकामासाठी एकुण खर्च | १,१९,३१,७६,९४९ |
| २ | ५% Contingencies सह | १,२५,२८,३५,७९६ |
| ३ | २% Work charges establishment Charges सह | १,२७,७८,९२,५१२ |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | ७,१५,९०,६१६ |
| | **एकुण (३ + ४)** | **१,३४,९४,८३,१२८** |
| | **Say एकुण रु.** | **१३५.०० कोटी** |

महानगरपालिकेमार्फत मुलभूत सुविधा पुरविणे (Infra) कामांचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

**तक्ता - ब**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा infra साठीचा एकुण खर्च | ७,९६,२१,००० |
| २ | ५% Contingencies | ८,३६,०२,०५० |
| ३ | २% Work charges establishment | ८,५२,७४,०९१ |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | ४७,७७,२६० |
| | **एकुण (३ + ४)** | **९,००,५१,३५१** |
| | **Say एकुण रु.** | **९.०० कोटी** |

**तक्ता अ** नुसार केंद्र शासन, राज्य शासन व मनपा यांचे संयुक्त निधी मधून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत १४४२ सदनिका बांधणेकामी **तक्ता अ** नुसार **र.रु.१३५.०० कोटी** चे खर्चास व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी **तक्ता ब** नुसार येणा-या **र.रु.९.०० कोटी**चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. केंद्रसरकारने नवीन योजना शहरी गरीब लोकांसाठी आणलेली आहे. ती ३० चौ.मी.ची आहे आणि त्याचे रेट आज जास्त आहेत. मागे राष्ट्रवादी काँग्रेस युती सरकार होतं त्यावेळेस जी योजना होती त्या योजनेत ऐरीया जास्त होता आणि पैसे कमी होते. ही जी शासनाची योजना आहे ती ३० चौ.मी.ची आहे. केंद्रसरकार गरीबांसाठी योजना आणते. गरीब ज्यावेळेस योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्राची पुर्तता करतात.

**मा.महापौर-** मागच्यावेळेस या विषयावर चर्चा झालेली आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ही जी योजना आलेली आहे ती शहरी गरीब नागरीकांसाठी आहे त्या बद्दल दुमत नाही. केंद्रसरकार आणि राज्यसरकार ज्यावेळेला एवढी मोठी योजना काढते त्यावेळेला आपण स्वहिस्सा देतो आणि नागरीक सुध्दा स्वहिस्सा देतात. आणि ज्यावेळेस आपल्या अटि, शर्ती असतात त्या अटि, शर्ती पुर्ण करत असताना नागरीकांकडून काही चुका होतात त्या झालेल्या चुका, त्या नागरीकांने केलेल्या चुका लोकप्रतिनीधीच्या माती का मारल्या जातात. लोकप्रतिनीधी आणि पक्ष, सत्ताधारी पक्षाला लोक बदनाम करतात. मला या संदर्भात सांगायच आहे की आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत मागे एक स्किम आलेली होती से.नं. २२ दुमजली गाळे, प्राधिकरणाकडून आपण शंभर एक्कर जागा घेवून त्याठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविला त्या प्रकल्पाच्या ठिकाणी ३३०० गाळे बांधण्यात आले. ३३०० गाळे बांधल्यानंतर

त्याठिकाणी काही गाळयांच दुमजली रुपांतर केलं. त्याच्यामध्ये शहरातील काही झोपडपट्टया शिफ्ट करायच्या आणि शहर हे झोपडपट्टीमुक्त करायचं असं एक धोरण सुरवातीला झालं होतं पण त्याला त्यावेळेसच्या नागरीकांनी विरोध केला होता. मा.महापौर साहेब, दि.१७/४/१९८४ रोजी ३३०० ओटे बांधण्याच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाली होती. एक कोटीच्या तरतूदीला मान्यता देण्यात आली होती. मे.आगरवाल स्टोन उदयोग यांना दि. ४/६/८४ ला देण्यात आले होते. प्रकल्प खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले होते. ३३०० ओटयाचे बांधकामपैकी त्यावेळेस १५६३ ओटयाचे मनपा परिसरातील झोपडपट्टीवासियांसाठी करण्यात आले आहे. उर्वरीत १७७० ओटयाचे वाटप न करता त्यावर दुमजली पध्दतीने एक चटई क्षेत्र निर्देशंकानुसार ३५४० गाळे र.रु. १ कोटी ५४ लाख अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता, मनपा सभा ठ.क्र.१३१७ दि. १.१२.८९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. त्यानंतर दुमजली स्किम बी.जे.शिर्के कंपनी आणि शासन निर्णय क्रमांक दि.११/१२/८४ नुसार स्थायी समिती ठ.क्र.१३५६ दि. २६/३/१९९० नुसार निवीदा  न मागविता थेट पध्दतीने करण्यात आली होती. एवढी मोठी स्किम त्याठिकाणी झाली त्याच्यामध्ये काहीतरी ४२१ गाळे वाटप करण्यात आले. ४२१ गाळयाचे वाटप झाल्यानंतर त्यामध्ये घुसखोरी झाली आणि दि. ३१/१२/१९९१ रोजी २२९ घुसखोरांना बाहेर काढण्यात आलं होतं. त्यानंतर १९९२ मध्ये ३०० घुसखोरांना बाहेर काढण्यात आले होते. त्यानंतर तत्कालीन समाजकल्याण मंत्री ना.रामदास आठवले यांच भाषण झाल. करोडो रुपये खर्च करुन त्याठिकाणी घुसखोरी झाली आणि त्यानंतर त्या लोकांना आपण ऑथोराईज घर दिली. महात्मा फुले पुतळयाच्या अनावरणाच्या टाईमाला त्यावेळेस मा.पवार साहेब आले होते. दिलीप बंड यांनी त्या घुसखोराना बाहेर काढण्याच काम  केलेल होत. २००२ ते २००७ च्या दरम्यान दिलीप बंड यांनी घुसखोराना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. मा.शरदचंद्र पवार साहेबांनी त्याठिकाणी राहील त्यांना घर देण्यासंदर्भात सुचना मांडली त्याच सुध्दा पत्र आहे. दि.१६/२/२००५ रोजी महात्मा फुले यांचा पुतळयाच्या अनावरण समारंभाच्यावेळी आमदार विलास लांडे, छगन भुजबळ होते, मा.शरद पवार होते. त्यांच्या समवेत आम्ही चर्चा केली आणि  त्याठिकाणची झोपडपट्टी....

**मा.महापौर-** या विषयावर बोलावे. जुन काढू नका, विषय तहकूब ठेवणार आहे त्याच्यावर तुम्हांला काय सांगायच तेवढच सांगा.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तेथील राहणा-या लोकांना हे घर दयायच त्यांच्याकडून पैसे घ्यायचे असं धोरण ठरल होतं. गेल्या दोन दिवस पेपरमध्ये बातमी येते त्या बातमीच्या अनुषंगाने मी त्या भागातील प्रतिनिधी म्हणून नगरसेवक या नात्याने काम करतो. काम करत असताना त्या लोकांवर जे चुकीचे कागदपत्र दिलेले असतीलतर त्यांच्यावर निश्चित कारवाई करा, त्याबद्दल माझ दुमत नाही.  माझ एवढच मत आहे की त्या भागामध्ये लोकप्रतिनिधीची नाव येतात, पक्षाच नाव बदनाम होत हे काय

चाललं आहे. पक्षानी योजना आणली म्हणजे पक्ष चुकीच काम करत असं नाही. आता ही केंद्रसरकारने योजना आणलेली आहे त्या योजनेच उदया काही झालतर त्याला केंद्रसरकार जबाबदार आहे का. या सगळया गोष्टीची माहीती घेतलीतर आपण त्या भागामध्ये ब-याचशा लोकांना आपण घर दिलेली आहेत. काही लोक त्याठिकाणी अजून घरापासून वंचीत राहीलेले आहेत. ही योजना आणा तुम्ही त्या भागातील लोकांच पुनर्वसन कस ठेवल नवीन योजना आणली त्या लोकांना घरकुल योजना दिली. आता ही तीसरी योजना आणतो मग त्या भागातील लोक किती दिवस उघडयावर राहणार आहेत. त्या लोकांना घर नको का. रेडझोनच्या नावाखाली ते मुलाबाळासहीत पावसामध्ये तिथ राहतात. स्पाईन रोडच काम केल त्यावेळेस तेथील झोपडपट्टी काढून शिफ्ट केली. त्या लोकांना घर देता येत नाहीत. त्या लोकांचा ड्रॉ झालेला आहे. आम्ही लोकप्रतिनिधीन काय करायचं. त्या लोकांना घर मिळावीत म्हणून आम्ही प्रयत्न करतो आणि रेडझोन सारखे प्रश्न काही ठरावीक लोक स्वत:च्या स्वार्थासाठी उपस्थित करुन त्याच्यामुळे काम थांबवतात. आज केंद्रसरकार म्हणते गरीबांना घर दिली पाहीजेत. का गरीबाना बाहेर काढायला लागलेत. काय दोष आहे त्यांचा आज कोटयावधी लोकांना घर दयायचे त्याठिकाणी रेडझोनचा मुद्दा उपस्थित झाला आज ती लोक रस्त्यावरती आहेत. माझी एवढीच विनंती आहे सरकारला मुख्यमंत्री साहेब आपण लक्ष घातल, धन्यवाद. याच्या बद्दल ज्या काही गोष्टी घडलेल्या असतील त्याची आपण सखोल चौकशी करावी. याठिकाणी आपण ज्यांच ऐकूण हे केलेल आहे त्यांना वाटलतर त्या भागातील प्रतिनिधी म्हणून आम्ही आणि तेथील जे काही चुकीचे कागद आणलेली लोक या लोकांची नार्को टेस्ट करा. रेडझोन कशाबद्दल उपस्थित झालं. का लोकांना घरापासून वंचीत ठेवलेल आहे. नार्को टेस्ट झाली पाहीजे आणि दुध का दुध पाणी का पाणी होईल. घेण्यानंदेण्याच कोणाला नाव ठेवणे आणि कोणाला बदनाम करण्यामध्ये तुम्हांला चांगल वाटत असेलतर आपण नार्को टेस्टमध्ये सामील होऊ. मुख्यमंत्री साहेबांना माझी विनंती आहे साहेब, आपण राज्यात चांगल काम करता याठिकाणी महापालिकेत लक्ष घातल, घ्या नार्कोटेस्ट. पक्षाला बदनाम करण्यासाठी गोरगरीबांचा बळी नका पाडू. गोरगरीबांना बळी मारण्यासाठी स्वत:चा अजेंन्डा नाही तुमचा. धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर या शेवटच्या सभेला मला तक्रारीचा सुर लावायचा नव्हता म्हणून मगापासून हात वर करत नव्हते. मा.महापौर साहेब, अधिकारी, पत्रकार बंधु आणि जे माझे बंधु भगिनी आरक्षणामुळे पुढच्या वर्षी येऊ शकणार नाहीत त्यांच्या बरोबर पाच वर्षे काम केलं, खुप चांगले अनुभव आले, काही वाईट अनुभव आले. चांगले अनुभव मैत्री देऊन गेले आणि वाईट अनुभव सुध्दा काहीतरी शिकवून गेले त्यांच सर्वस्वी मी आभार मानते. तसेच आता जो घरकुल संदर्भाचा विषय सभागृहामध्ये आहे. मी आता पाटिल साहेबांना विचारल घरांची शासनाने किमंत वाढवली का तर ते म्हणाले शासनाने किमंत वाढवली नाही आम्ही वाढवली. महापालिकेनी वाढवली,

मटेरीयलचे दर वाढले त्यामुळे वाढवली. शासनाचा काही संबंध नाही, एकतर अर्धवट माहिती घ्यायची, तुमचाही वेळ वाया, आमचाही वेळ वाया सगळयांचाच वेळ वाया. माहितीतरी घ्या की महापालिकेच्या अधिका-यांनी त्याच्यामध्ये काय केले. खरच शासनाने रेट वाढविलेत का. आणि शासनाने वाढविलेतर शंभर टक्के शासनाच्या विरोधात आम्ही सुध्दा जाणार. अशाप्रकारचा दर आम्हांला परवडणार नाही. पाटिल साहेबांनी सांगीतल आम्ही ते दर वाढविले. शासनाने मागच्यावेळेस एका घराच्या मागे जे केंद्राने अनुदान दिलं होत ते १ लाख ७९ हजार रुपये होत आणि आता जे दिल ते १ लाख ५० हजार रुपये. महाराष्ट्र शासनाने १ लाख १ हजार रुपये दिलं होत आणि आता १ लाख रुपये दिल आहे. म्हणजे काय कमी केलं पाच ते दहा हजार रुपये इकडे तीकडे. परंतु त्याची काही माहिती घ्यायची नाही आणि मलाच सगळ माहिती आहे मी त्यातला तज्ञ आहे अशाप्रकारचा विषय घेऊन बोलन आणि केंद्रसरकारवर, मुख्यमंञ्यावर आक्कल शिकवण एवढे मोठे तुम्ही ग्यानी लागून गेला नाहीत. दुसरा विषय असा की मी काही कुठल्या गरीबांच्या विरोधात नाही. पण गरीबांच्या नावाखाली ज्यांनी ज्यांनी भ्रष्टाचार केला असेल आणि ज्यांनी पैसे खाल्ले असतील, आता पोलीस उलटसुलट जवाब घेणार, उलट तपासणी होणार आणि तपासणीमध्ये ज्यांच नाव येणार त्यांनी त्यांच्या कर्माची फळे भोगायची. मग मला म्हणायच खरंच गरीबांचे कैवारी होते का गरीबांच्या नावा खाली मलिदा खात होते. तुम्ही शिकवणार आणि आम्ही ऐकूण घेणार अशातला अजीबात भाग नाही. से-२२ कोर्टामध्ये आहे मागच्या दोन तीन दिवसात मी सांगीतल हे सबज्युडीशिअल असल्यामुळे बोलता येत नाही. आता या विषयावर बोललात ठिक आहे तुम्ही सुरवात केली मी पण सुरवात करणार परंतु अशाप्रकारच्या विषयामध्ये आपण एखादया गोष्टीमध्ये फौजदारी गुन्हा महानगरपालिका दाखल करते, मग त्याच्यामध्ये सुध्दा तुम्हांला प्रॉब्लेम कोर्टात गेल तरीही प्रॉब्लेम. मग करायच काय. कोर्टात जा कोर्टात न्याय मागा, मग कोर्टात गेलो, कोर्टात न्याय मागायला लागलो, मग म्हणाले केंद्रात आणि राज्यात तुमची सत्ता आहे त्याठिकाणी तुम्ही न्याय मागा कशाला तुम्ही पत्रापत्री करता. तिथं न्याय मागीतल मग त्यांनी सांगीतल फौजदारी गुन्हे दाखल करा. मग फौजदारी गुन्हा दाखल करायलेतर आता म्हणतात गरीबांच्या जीवावर उठलेत. अंध/अपंग व्यक्तीकडून कोणी पैसे घेतले, जे बीचारे रस्त्याने भीक मागत फिरतात गाडयामध्ये, रेल्वेमध्ये लोणावळ- पुणे गाडयामध्ये त्यांच्याकडून ज्यांनी पैसे घेतले त्यांना शरम वाटली पाहीजे की आपण काय केलं. कुठ पाप आपण फेडणार आहेत. चार आठ दिवसात दुध का दुध, पाणी का पाणी होणार आहे. घाई कशाला याच्यासाठी. प्रत्येक गोष्टी तुम्ही उचकवतात, तुम्ही उचकावल की मी काढणार. मा.महापौर साहेब, मला काही ते माणस माहिती नव्हते. २०० कागदपत्र तपासले २०० मध्ये ११९ लोक त्यांना बोगस निघाले असतील, एखादी महिला जर वयाच्या दुस-या वर्षी मुलगा झाला म्हणत असेलतर याच्यावर पण आम्ही बोलायचच नाही. त्या बाईला विचारलतर बांगलादेश म्हणजे तेथून आलेल्या लोकांना जर घर

मिळत असेल आणि ती सांगत असेल दि.१/१/९५ ला मला मुलगा त्याठिकाणी जन्म झाला होता तर असं म्हणत असेलतर तुम्हीच विचार करा. असे एक नाही अनेक उदाहरण देवु शकते. मी अलीगेशन केलेल नाही पण ज्यांनी केल त्याला बरोबर लागणार आहे ते काही सुटणार नाही. त्याठिकाणी काही घोळ झाला का नाही झाला, त्याठिकाणी कोर्टाने माझ म्हणणं मान्य केलं. त्याठिकाणी जर तुम्हांला स्टे मिळाला असेल, आता राजकारण त्याच्यावर करतात का से-२२ वर करतात, सगळेच करतात. काँग्रेसन केल, राष्ट्रवादीने केल, भाजपन केल, शिवसेनेनी केल, सगळयांनी राजकारण केलं से.२२ वरती. प्रत्येकानी सांगीतल रेडझोन घालवतो, कोणी घालवला रेड झोन, नाही घालवला आणि तो जाणारही नाही हे त्रिवार सत्य आहे. जर तिथला दारुगोळा कमी केला, त्या डेपोचा जर झोन बदलला तरच त्याठिकाणी यार्ड कमी होणार आहे आणि त्याच्यावरती चर्चा चालू आहे. मागच्या गव्हर्मेटंच आठवतं, केंद्रामध्ये काही आमच गव्हर्मेंट नव्हतं. तुम्ही सगळे जण गेला, दोन दिवस त्याठिकाणी राहीलात, यार्ड कमी होतं का असं होत का तस होतं का असे रोज पेपरला रकानेची रकाने भरुन आले. आम्ही बोललो, आम्ही प्रपोगंडा केला का. तुम्ही केलं ते बरोबर आणि इतरांनी केल ते चुक असं नाही, तुम्ही राजकारणत आहेत आम्ही राजकारणात आहोत. तुम्ही जे करु शकतात ते आम्ही करु शकत नाहीत अशातला भाग नाही. तुम्ही प्रपोगंडा केला नाही का, मग रेडझोनवरती राजकारण केल नाही का तर शंभर टक्के सगळया पक्षानी केलेलं आहे. परंतु माझा विषय राजकारणाशी संबंधीत नसून माझा विषय त्याठिकाणी जे बोगस लाभार्थी आहेत, जे खरेखूरे लाभार्थी आहेत त्यांना शंभर टक्के घर मिळाली पाहीजेत या मताची मी सुध्दा आहे. दुसर म्हणजे ज्याठिकाणच्या झोपडपट्टया घेवून तुम्ही एकत्रीकरण केलेलं आहे, एकदा तुम्ही ओटे दिले होते, ओटे दिल्यानंतर परत तुम्ही त्यांच जर पुनर्वसन करत असालतर, परतजर तुम्ही त्यांना घर देणार असालतर बाकीच्यांचा नंबर येणार कधी. मग शहरातील सगळे नंबर तुमचे संपले होते का, नव्हते संपले, मग त्यांचा नंबर आलाच नाही. दुसर म्हणजे मोफत घर देण्याची तरतूद कायदयामध्ये होती, ती महापालिकेकडून कुठे पाळली गेली. तुम्ही एक मुद्दा घेवून चालता त्यामध्ये ३१० कोटीचा प्रकल्प ६५० कोटीवर जातो. ३१० कोटीच्या प्रकल्पाला ६५० कोटीच्या निवीदा स्विकारल्याच कशा. बोलायच नाही का त्याच्यावरती. बोललच पाहीजेनां. परंतु विषय असा आहे शेवटची मिटींग आहे खरंच तकतक करायची नव्हती. आणि त्याच्यावर कुठलेही राजकारणाच्या मुडमध्ये सुध्दा नाही जे करायच ते नियमाने करते, कायदयाने करते. उदया पोलीसांना वाटलं यात काही तथ्य नाहीतर पोलीस फेटाळतील त्यांच म्हणणं. पण त्यात जर तथ्य निघालतर जो दोषी असेल तो जाणारच, गेलाच पाहीजे. ज्या गरीबांचा कळवळा घेवून तुम्ही बोलता त्या लोकांकडून कुणी पैसे घेतले ते समोर आलच पाहीजे आणि ते समोर येणार आहे. पोलीस तपासणी करा, नार्कोटेस्ट करा, शंभर टक्के नार्कोटेस्ट केली पाहीजे. त्यांची केली पाहीजे, त्यांच्यावर कोण दबाव आणतं, कोण त्यांना दमबाजी करतं, कोण काय करतं. हे सगळ

आहेनां, कालांतराने हे सगळे विषय उघडकीस येणार आहेत. तुम्ही जितक एखादया गोष्टीला टोचणार तीतकी ती गोष्ट पुढे न्यावी लागेल. तुम्ही ठरवायच आपण काय करायच ते, करायच का नाही करायच. परत तेच तेच बोलायच आणि आम्ही बोललो की मग तुम्हांला जिव्हारी लागतं, धन्यवाद.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गरीबांसाठी घरांचा विषय आहे. पंतप्रधान आवास योजना, स्वागत आहे. आपण पाहत आहोत आदरणीय पंतप्रधान गोरगरीबांच्या बाबतीत किती काळजी घेतात. मी नौकरीला लागले त्यावेळेस १२५/- सोनं होतं आता सोन्याची काय किमंत आहे, वाढत जात प्रत्येक वस्तूचे दर वाढतात. मी पहील्यांदा पगार घेवून गेले तेव्हा तीन तोळे सोनं घरात घेवून गेले रेट हे वाढतच जातात. आम्हांला त्या बद्दल काही बोलायच नाही, तो हिशोब करायला तुमच्याकडे दिलेला आहे. फक्त काम करायच आणि विरोधकानी त्याचा हिशोब बघायचा आणि तो हिशोब लोकांच्या समोर मांडायचा. आमच एवढ एकच काम आहे, काम करायच. काम करण्यासाठीच आलेली आहे पंतप्रधान आवास योजना. योजना पुर्वीचीच आहे परंतु त्यामध्ये बदल झालेला आहे, लोकांच्या वर भार टाकलेला आहे अधिकचा त्याबद्दल मला बोलायच आहे. गरीबांसाठी प्रशासनाने, शासनाने सहन केल पाहीजे त्याच्यामुळे त्यांनी जास्त सहन केले पाहीजे. आता त्यांनी त्यांच्या बरोबरच आपल्याला धरणार आहेत. आपल्याकडे एलबीटी नाही, जकात नाही, कशामधुन आपण देणार आहोत हे मा.आयुक्तांनी आम्हांला सांगायच आहे. महापालिकेचा ७७ हजार पर हाऊस एवढा वाटा त्यांनी सांगीतलेला आहे. आपण देत होतो पण आता आपण कुठून देणार. हे शासनाला कळलं पाहीजे. महापालिका कुठून हा हिस्सा देणार, कुठून हा पैसा भरणार आता मला वाटत पुढच्या एक दोन वर्षापासून आपल्या पाचशे कोटीच्या ठेवी संपल्या की केंद्रशासन राज्यशासनाला आणि राज्यशासन आपल्याला अशाप्रकारे ग्रामपंचायतीला ज्याप्रमाणे अनुदान येतं त्याप्रमाणे आपल्याला अनुदान येणार आहे. हे अनुदान आपल्याला जर केंद्रशासनाकडून आलतरच आपण यांचा हिस्सा भरणार. मग केंद्रशासन तेवढ वाढवून देणार आहे का. मग महापालिकेनी देण्यापेक्षा केंद्रशासनानेच ती रक्कम भरावी किंवा राज्यशासनाने भरावी. सरळ आणि सोपं आहे. आपण पाऊणेचार लाखामध्ये त्यांना घर देत होतो. आता त्याची किमंत त्यांनी आता पाच लाख भरायचे आहेत. गरीबांच्यासाठी, गरीबांच्यासाठी म्हणतो आणि एवढी किमंत आपण वाढवत जातय स्वत: शासनच. आपण हे घर ३७० चौ.फुटाच देत होतो आमच्या पक्षाच्या राजवटीत. आता त्यांनी त्यामध्ये अजून कमी केलेलं आहे. म्हणजे ३७० ऐवजी ३०० एवढच त्यांनी केलेलं आहे. म्हणजे क्षेत्र कमी केलेलं आहे आणि किमंत वाढवलेली आहे म्हणजे यापेक्षा ते ज्ञानो घर निघाले होते एक लाखामध्ये सुरवातीला, त्यांनी घर दिलं म्हणजे अशी काहीतरी योजना यांनी शासनाने राबवावी. गरीबांच्यासाठी जर एवढा कळवळा असेल पुर्वीची आलेली योजना आहेतर मग तसं म्हणा आमची योजना आहे म्हणून. तुम्ही जर ही योजना

राबवणार असालतर त्यांच्या किमंती एवढया अव्वाच्या सव्वा राबवलेल्या आहेत त्या चुकीच्या आहेत आणि क्षेत्र जे कमी केलेलं आहे आणि ऐरीया घराचा कमी केलेला आहे तो सुध्दा चुकीचा असं आहे, म्हणजे तुम्ही घरही छोट देता, किमंतीही वाढवता. बिल्डरच काम करतंय शासन. या विषयामध्ये पान नं. १० वर शेवटचा परिच्छेद सर्वांनी वाचावा. खास मलातर वाटतय तो परिच्छेद मंजूर करण्यासाठी एवढा आटापिटा आहे. त्यामध्ये त्यांना ५० वर्षाच्या लीजने कमर्शिएल जागा देणे आहे. साधा आणि सोपा विषय आहे त्यासाठीच हा विषय आलेला आहे. जी प्रशासनाने चुक केली ती राष्ट्रवादीने चुक केली असं तुमच समीकरण असतं आम्हांलाही लोकांच्या समोर मांडू दयात. म्हणजे इथेही तुम्ही मांडू देत नाहीत, काय करतय प्रशासन ते. एखाद काम करायच म्हणलतर लोकांच्यावर जास्तीत जास्त भार कसा टाकता येईल, त्यांच जास्तीत जास्त कसं आपल्याला शोषण करता येईल एवढच तुम्ही बघा, ही नवीन योजना तुम्ही आणतायनां. तुम्ही म्हणता पुर्वीचीच योजना आहेतर मी स्वागत करते. परंतु पुर्वीच्या योजनेमधले जे लोक वेटींगला आहेत त्यांचे काय. माझ्या वाचण्यात आलेल आहे पुर्वीची वेटींग लीस्ट ती तशीच बंद करायची, कॅन्सल करायची आणि नवीन हे करायच. का एवढी वर्षे त्यांनी नवीन घराच स्वप्न पाहीलं त्यांच्या स्वप्नावर तुम्ही पाणी टाकणार आहात का. हे चुकीच आहे. जी वेटींग लीस्ट आहे ती तशीच पुढे घ्यावी ती कॉम्प्युटर लीस्ट आहे. ती प्रशासनाने केलेली लीस्ट आहे मग ती कमी करुन तुम्ही असे कोणते लोक त्याच्यामध्ये भरणार आहात. त्यांनी पुन्हा जे आहेत तीच लीस्ट परत घ्यावी हे मला सांगायच आहे. शासनाला जर गरीबांचा एवढा कळवळा असेलतर त्यांनी जेएनएनयुआरएमची स्किम का बंद केली त्याच उत्तर दयाव. झोपडपट्टीवासियांना घर देण्याची योजना आहे जेएनएनयुआरएम त्याची मुदत का संपवली, मुदत वाढवणं कोणाच्या हातात होतं. याच शासनाच्या हातात होत त्यांनी गोरगरीबांची घर बांधण्याच बंद केलेलं आहे. आमच्या झोपडपट्टीवासियांची स्किम अर्धवट राहीलेली आहे. मा.आयुक्त साहेब फक्त आपण चार पाच झोपडपट्टयांच पुनर्वसन केलेलं आहे. वेताळनगर, विठ्ठलनगर, अजेंठानगर, मिलींदनगर अशा ७५ झोपडपट्टया आहेत. साहेब, आपण झोपडपट्टीत पाहील. आपण जे त्यांना सोळा सोळा हजार रुपये दिले त्यामध्ये त्यांनी किती हुरळून जाऊन, तुम्ही स्वत: पाहील माझ्या झोपडपट्टीमध्ये खुप अगदी हौसेनी त्यांनी ते शौचालय बांधलेले आहे, आपण सगळयांच कौतूक केलेल आहे. आपण आठ हजार रुपये आदि देतच होतो त्यासाठी आम्ही फॉर्म भरले होते नंतर १६ हजार आले. आम्ही हागणदारीमुक्तची कल्पना आमच्या काळामध्ये मांडली होती. गाडगेबाबा अभियान कोणाच होतं. ती गुजरातमधील नव्हती कल्पना, महाराष्ट्राची कल्पना होती. तीच योजना पुढे आलेली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** विषयावर बोला. बाकीच्यानी शांत रहावे.

**मा.शमीम पठाण-** मा.महापौर साहेब, ही पंतप्रधान आवास योजना आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत जे अनुदान शासनाने परत घेतलेल आहे, केंद्रशासनाने परत घेतलेल आहे. माझ्या येथील झोपडपट्टीच पुनर्वसन राहील कारण यांनी जेएनएनयुआरएम योजना बंद केली म्हणून आमच जळतंय. आम्हांला वाटत नाही का पुनर्वसन व्हाव, आमच्या लोकांना घर मिळावीत. म्हणजे ते शासन जर अशा गोरगरीबांसाठी काही योजना आणत असेलतर झोपडपट्टीवासियांसाठी जी घर बांधण्याची योजना होती ती का बंद केली, त्यांच मला येथे कोणी उत्तर देणार आहे का. मग आम्ही कुठल्या व्यासपीठावर बोलायचं. आम्ही झोपडपट्टीवाल्यांचे प्रतिनीधी आहोत म्हणुन आम्हांला हे व्यासपीठ आहे. या महापालिकेच्या माध्यमातून आपण हजारो लोकांना घर दिलेली आहेत. आमच घर येता येता तोंडचा घास हिराऊन घेतलेला आहे मग आमच्या लोकांच्या बद्दल आम्हांला नाही का वाईट वाटणार. म्हणून ही योजना बंद केली त्यामुळे आपण त्यांना घर देवू शकत नाहीत याच आम्हांला खुप वाईट वाटत. पुन्हा अशाप्रकारची योजना शासनाने सुरु करायला पाहीजे. एवढे मोठमोठे हिस्से ते महापालिकेवर टाकतात. कुठलीही योजना महापालिकेनी राबविली की महापालिकेचा एवढा वाटा असावा, अरे, वाटा कुठून दयायचा. नाहीचतर दयायचा कुठून. आडातच नाहीतर पोह-यात कुठून येणार आहे. म्हणून मला म्हणायच आहे की केंद्रशासन आता जीएसटी गोळा करेल त्यावेळेस त्यांच्या खर्चातूनच त्यांच्या योजना राबवाव्यात. आपल्यावर अशाप्रकारचा भार टाकू नये आणि यापुढे गोरगरीबांच्यासाठी ज्या घरांच्या योजना होतात विशेषत: झोपडपट्टीवाल्यांसाठी, आघाडीसरकारने ज्या योजना राबवल्या होत्या त्या आपण बंद करु नये आपल्याला तशाप्रकारे काही निवेदन शासनाकडे पाठवता आलंतर ते पाठवाव अशी याठिकाणी विनंती करते.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आता जो केंद्रसरकारच्या योजनेचा विषय होता. गरीबांना घर मिळणार आहेत, पैसे कसे जातील पैसे कसे वाढविले याची आम्हांला माहिती नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की मुख्यमंत्र्यांना मी चुकीच बोललो नाही. मुख्यमंत्री साहेब चांगली काम करतात म्हणलो. बावळट मी म्हणलो नाही असं कोणी बोलल असेलतर त्यांनी त्यांचे शब्द माघारी घ्यावीत कारण मुख्यमंत्र्यां बद्दल बोलण तुमची माझी लायकी नाही. या केंद्रसरकारच्या योजना ज्यावेळेस आपण आणतो चांगली गोष्ट आहे आम्ही त्याचे समर्थन करतो. कारण योजना शहरामध्ये येते त्यामुळे आम्ही त्या योजनेच्या पाठीशी राहू. दुसरी गोष्ट केंद्रसरकारने अशीच योजना जेएनएनयुआरएमची आणली होती, ती योजना कोर्टात जाण्याच कारण काय होत तेच मला कळल नाही. रेडझोन कोणी उपस्थित केला त्या मागच कारण काय. एका झोपडपट्टीच प्रतिनिधीत्व करणा-या नगरसेविकेनी कोर्टात जाऊन रेडझोन उपस्थित करण्याच कारण काय. ठिक आहे, भ्रष्टाचार झाला असेलतर त्यांना खेचानां कोर्टात. रेडझोनमुळ झाल काय, अख्ख रुपीनगर, तळेगाव सगळ बाधीत झाल आहे. एका फक्त रेडझोनच्या केसमुळे, आज कितीतरी गोरगरीब त्याठिकाणी आता

झोपडीपासून वंचीत आहेत, त्याठिकाणचा विकास करता येत नाही. नाही ते प्रश्न टिव्हीला बातम्या येतात, पेपरला येते आणि त्याठिकाणचे लोकप्रतिनिधी काही करत नाहीत असे नाव ठेवतात. ज्यावेळेस या परिसरामध्ये आपण विकास काम करतो, केंद्रशासनाची योजना येणार उदया अजून परत योजना थांबवलीतर कोणाच नुकसान होणार आहे. मध्ये आडीच एफएसआय वापरता येत नाही म्हणून हायकोर्टात गेले होते. हायकोर्टाने परवानगी दिली मग सुप्रीम कोर्टात जायची काय गरज होती. तुम्हांला गरीबांचा कळवळा आहेना मग का गरीबांच्या विरोधात तुम्ही कोर्टात जातात. तीथ जर तानाजी खाडेनी चुक केली असेलतर त्याला दंड करा, भर चौकात फटके टाकाना. गोरगरीबांचे काम होत असताना घेण्यानदेण्याचे तुम्ही कोर्टात जाऊन मग या घराची किमंत होती ती आज किमंत वाढणारच. कोर्टात जाऊन एवढी मोठी काम थांबवली. ज्यावेळेस केंद्रसरकारने एवढी मोठी योजना आणली अजून त्याठिकाणी ड्रॉ झालेल्या लोकांना घर दयायची राहीलेले आहेत. आठ हजार घर बांधायची राहीलेली आहेत. घरकुलामध्ये घुसखोरी झाली म्हणतात मध्ये चुकीचे लोक घुसली मी मोर्चा काढलेला होता बाबा कांबळे यांच्या बरोबर मी मोर्चा काढलेला आहे. प्राधिकरणात मोर्चा नेलेला आहे. चुकीच्या लोकांना जर घर मिळत असतीलतर ती ताब्यात घ्या, त्यांच्यावर कारवाई करा पण गोरगरीब लोकांना घर मिळाली पाहीजेत या मताशी मी सहमत आहे. मा.महापौर रेडझोन संदर्भात जो काही आता विषय चाललेला आहे. त्या रेडझोन संदर्भात त्याठिकाणची बरीचशी लोक राहीलेली आहेत. त्या लोकांना ती घर मिळाली पाहीजेत. तुम्ही कितीही करा तुम्ही तुमचा पक्ष लकलाभ तुम्हांला मी सभागृहात जास्त वेळ घेणार नाही. सकाळचे पत्रकार अविनाश चिलेकर यांनी दोन-तीन दिवस लई झोडपलय. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि चार नगरसेवक कोण आहेत देव जाणं नाव काही कोणी सांगीतल नाही पण पक्षाला झोडायच काम चालू आहे, पक्षाचा काय संबंध आहे. मी पत्रकार अविनाश चिलेकर यांना विनंती करतो आपण पत्रकार आहात, चौकशी करा, इलेक्शन आलेले आहेत लोकांना तिथं इलेक्शन लढवायच आहे. तुमची थोडी चुकीची बातमी त्याठिकाणी एखादयाच प्रामाणिकपणाने काम केलेल्याच्या वरती पाणी फिरणार आहे त्यामुळे आपण असल्या चुकीच्या गोष्टी टाकू नका अशी मी विनंती करतो. पेडन्युज वगैरे असला प्रकार असेलतर तस सांगा, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राजन पाटील यांनी पहील्यांदा खुलासा करावा की मुळ प्रस्ताव तुमचा काय होता आणि तुम्ही त्यात काय वाढवला, केंद्राचा, राज्याचा काय प्रस्ताव आहे आणि तुम्ही त्यामध्ये मनाने काय वाढविल आहे याचा खुलासा करा.

**मा.राजन पाटील (सह शहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो पंतप्रधान आवास योजनेचा प्रस्ताव आहे यामध्ये आपल्याला शासनाकडून गाईडलाईन्स अशा दिलेल्या आहेत यामध्ये महापालिकेला प्रत्येक सदनिकेच्या मागे भारतसरकार तर्फे १

लाख ५० हजार, राज्यसरकारतर्फे १ लाख रुपये मिळणार आहेत आणि बाकीचा हिस्सा महापालिकेनी ठरवायचा आहे. यानुसार नियोजन केले आणि आम्हांला लक्षात आलं की प्रत्येक सदनिकेला ८ लाख २७ हजार खर्च येतो. त्याप्रमाणे महापालिकेचा हिस्सा किती असावा. मागच्या योजनेमध्ये महापालिकेनी ७० हजार प्रत्येक सदनिकेमागे दिलेले होते त्याप्रमाणामध्ये आम्ही थोडीशी त्यामध्ये वाढ करुन ७७ हजार रुपये केले. यामध्ये जास्त वाढ केलीतर महापालिकेच्याच बजेटमधुन खुप मोठया प्रमाणात रक्कम जाते. पुर्वीचे बेनिफीशीरीचे जे कॉन्ट्रिब्यूशन होतं ३ लाख ७६ हजार. आम्ही त्याच्यामध्ये बघीतले की पुर्वीचे ३ लाख १७ हजार खर्च होता एका सदनिकेचा तो आता ८ लाख २७ हजार झालेला आहे. पुर्वी ७ लाख १७ हजार जो खर्च होता तो आता ८ लाख झालेला आहे. त्याप्रमाणे याच्यामध्ये वाढ करणे गरजेचे होते अन्यत: ती वाढ केली नाहीतर केंद्रशासनाचे, राज्यशासनाचे पैसे फिक्स आहेत. महापालिकेला याचे कॉन्ट्रीब्युशन वाढवावे लागेल याचा विचार करुन आम्ही तो ३ लाख ७६ हजारचा हिस्सा ५ लाख घेतला. आता याच्यामध्ये महापालिका सभेसमोर विषय आहे यामध्ये आपण बदल करु शकता. पुर्वी केंद्रसरकारचे १ लाख ६९ हजार होते. राज्यशासनाचे १ लाख होते म्हणजे थोडक्यात केंद्रशासनाचे व राज्यशासनाचे २ लाख ७० हजार होते ते आता २ लाख ५० हजार झालेले आहेत.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझी विनंती आहे की राजन पाटील यांनी खुलासा केला. हा डीएसआर जुना आहे आणि डीएसआरच्या तुलनेमध्ये महापालिकेचे कॉन्ट्रीब्युशन जास्त होते. पुर्वीच्या तुलनेमध्ये शासनाने वीस हजार कमी केलेले आहे. आता डीएसआर वाढलेला आहे. महागाई वाढलेली आहे त्या परिस्थितीमध्ये केंद्रशासन, राज्यशासना कडून २० हजार कमी केलेले आहेत तर ते पैसे आपल्याला वाढवता येतील का. आणि पुर्वीच्या तुलनेमध्ये सदनिकेची साईज कमी केलेली आहे. त्याच्यासाठी काही करता येईल का याचेसाठी सांगावे. कारण महागाई वाढलेली आहे त्या तुलनेमध्ये केंद्रशासनाकडून, राज्यशासनाकडून पैसे कमी येतात ते मागता येतील का. लाभार्थी कडून टोटल याच्यामध्ये वीस हजार कमी झालेले आहे याच्यामध्ये काही करता येईल का. या योजनेची मुदत किती असणार.

**मा.राजन पाटील (सह शहर अभियंता) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मागची जी सर्वसाधारण सभा झाली त्यावेळेला अशा सूचना दिलेल्या होत्या प्रशासनाला की यामध्ये ३७ स्क्वे.मी.चच घर बांधण्या विषयी शासन मंजूरी देते का ते विचारा आणि जेएनएनयुआरएम मधले लाभार्थ्यांना घर देता येईल का ते विचारा. या विषयी जीबी संपल्यानंतर लगेचच जे या योजनेचे समन्वयक आहेत, महाडा यांच्याकडे आम्ही रेफरन्स केला प्रत्यक्ष त्यांच्याकडे जाऊन आलोतर त्यांनी स्पष्टपणे खुलासा केला फक्त पत्राव्दारे त्यांनी दिलेला नाही त्याची आम्ही वाट बघतो पण त्यांनी जो खुलासा केला तो आपल्याला सांगतो.

३० स्क्वे.मी. मर्यादा ही पुर्ण भारतासाठी आहे. त्यामध्ये चेंज केलातर आपला डीपीआर मंजूर होणार नाही. दुसर त्यांनी असं सांगीतल की पुर्वीचे लाभार्थी जेएनएनयुआरएमचे होते ती आता जेएनएनयुआरएमची योजना संपलेली आहे. पुर्वीची जेएनएनयुआरएमची जी योजना होती त्याच्यामध्ये लाभार्थीची आर्थीक मर्यादा ६० हजार प्रतिवर्षी होती आता लाभार्थ्यांची मर्यादा प्रतिवर्षी ३ लाख रुपये आहे. त्यामुळे ते लाभार्थी सगळेच्या सगळे घेवु शकत नाहीत पण ते लोक परत एकदा या योजनेमध्ये अप्लाय करु शकतात आणि लक्की ड्रॉ मधुन त्याना घर मिळण्याची शक्यता आहे. ती पहीली योजना संपलेली आहे. पुर्वीची योजना चारशे कोटीची होती. पुर्वीच्या लोकांना परत अप्लाय करावा लागेल, परत लक्की ड्रॉ निघणार आहे.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय मागच्या लोकांना देता येत नाही हे क्लेअर होते तरी सुध्दा सगळया गोष्टी पुर्ण केलेल्या आहेत जुन्या लोकांना देवु शकणार नाही ही काळया दगडावरची रेष आहे, तुम्ही कुठेही फॉलोअप करा ते होणार नाही. नवीन पंतप्रधान आवास योजना जी आलेली आहे त्यामध्ये त्यांनी क्लेअरकट सांगीतलेल आहे. महापालिकेनी सांगीतले ५ लाखापर्यंत येणार आहे. १४४० लोकांना घर देवू शकतो असे म्हणलेले आहे यामध्ये काही कमर्शीअल ऍक्टीव्हीटीज महानगरपालिका करु पाहते. ७७ हजार जो आपल्याला स्वहिस्सा महापालिकेला भरायचा. टेंडरमध्ये काही अबव्ह आलेतर ती रक्कम महापालिकेला भरावी लागेल. कारण केंद्रसरकार आणि राज्यसरकार हे कुठेही वाढवून देणार नाही. मागच्या वेळेस जे झाले तेच या वेळेस होण्याची शक्यता आहे. दुसर म्हणजे आम्ही पाटील साहेबांना सांगीतल होत. ही योजना मुंबईच्या धरतीवर बनवतो, त्या अमॅनेटी देवू करतो. त्यांना मिटींग हॉल असेल, गार्डन असेल, ऑडोटोरीयम आपण देतो. त्याचा खर्च तुम्ही तेथे राहणा-या सदनीकेच्या व्यक्तीवर टाकू नका. ते महापालिकेच्या बजेटमध्ये त्या वॉर्डाच्या सुविधेमध्ये घ्यावे म्हणजे तो खर्च त्या माणसावरती लोड होणार नाही अशी सूचना पण आम्ही केलेली होती त्याचे तुम्ही काय केले. तो खर्च या लोकांवरतीच धरलेला आहे का, नाही धरलेला. तो कमी केला खर्च तो कमी करुन सुध्दा एवढी रक्कम येते. वॉल कंपौड असेल तो खर्च तुम्ही त्यांच्यावरती धरलातर स्क्वेअर फुटची रक्कम वाढणारच आहे. मॅपल का ऍपल म्हणून पंतप्रधान योजना पेपरला जाहीर झाली होती, त्याचे होर्डींग्ज लागले होते. हजारो लोकांनी अर्ज केलेले होते त्यावेळेस पण रक्कम तेवढीच होती. लोकांना घर पाहीजेत का तर हो पाहीजेत. पाच लाख स्वहीस्सा धरुन सुध्दा लोकांनी तुमच्याकडे लाईन लाऊन १४४०/- तुम्ही म्हणताय तर तुमच्याकड एक लाख लोकांची लाईन लागेल. तो विषय वेगळा आहे. मुळ कळीचा मुद्दा हा आहे महापालिकेनी १३२०० लोकांची ही स्वस्तात घरकुल जी योजना जाहीर केली होती त्या योजनेला बासनात गुंडाळायच का. लोकांच्या डोळयात आपण धुळ फेकू शकत नाहीत. त्या लोकांना सुध्दा यामध्ये समाविष्ठ करुन घेतले पाहीजे. तस तुम्ही शासनाला लेखी स्वरुपात कळवा, लेखी स्वरुपात उत्तर घ्यावे. नाहीतर तुमच्या अंगावरती लोक

आल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नाहीतर एकाही नगरसेवकांना वॉर्डातून लोक फिरु देणार नाहीत. म्हणजे तुम्ही सगळया गोष्टी करायच्या आणि आम्ही का भोगायच. त्यामुळे तुम्ही त्या योजनेचा खुलासा करावा. आता किती दिलेले आहेत, किती जणांना देवू शकतो आणि आता एक्झॅक्टली किती लोक राहीलेली आहेत हे आम्हांला कळलं पाहीजे. आजजर एकूण ६७०० राहीलेत तर तुमच्या अशा चार योजना झाल्यातरी ते पुर्ण होणार नाही मग नवीन पंतप्रधान आवास योजना तुमच्यासाठी उपयोगाचीच नाही. एकाही ठिकाणी तुम्ही नवीन लाभार्थी घेऊ शकणार नाहीत. आणि नवीन घेतलेतर तुम्हांला ही योजना मंजूर होणार नाही. पंतप्रधान आवास योजना आलेली आहे ती अत्यंत उत्तम आहे. आपण जरी करायची नाही ठरवलीतरी त्यांना काही फरक पडणार नाही. पण शहरातील नागरीक तुम्हांला तीकडून सुध्दा बोलणार आहेत. जर ५ लाख रुपयामध्ये आम्हांला घर मिळतयं तर तुम्ही का देत नाहीत असं पण विचारणारी लोक आहेत. त्यामुळे पाटील साहेब, अजून किती प्लॉट रिझर्व्ह आहेत, किती ठिकाणी आपण अशाप्रकारची घर करु शकतो आणि मागच्या वेटींग लीस्टमध्ये अजून किती लोक आहेत आणि त्यांच आपण काय करु शकतो या सगळया गोष्टीचा खुलासा करावा. मग या प्रसंगाला तो प्रसगावधान मॅच होणार आहे का. ही योजना पण चांगली आहे आम्हांला ही योजना पण करायची आहे. ही सरकारची योजना आहे आणि तुमच कर्तव्यच आहे, शासनाच्या या योजना करण्याच तुमच कामच आहे. तुम्ही नाही केलीतर प्रायव्हेट बिल्डर्स कडून शासन ही योजना राबऊ शकत हे तुम्हांला पण माहिती आहे. मागीतलातर आडीच एफएसआय प्रायव्हेट बिल्डर्सला सुध्दा मिळेल. आर्थीक दृष्टया दुर्बल असेल तो सुध्दा त्याच्या स्वतच्या जागेमध्ये घर बांधायला केंद्रशासनाच अनुदान घेऊ शकतो. ही शासनाची योजना आहे मग असं आहेतर तुमच्याकडे कोणी हात पसरायला येणार नाही. ही योजना करायची असेलतर महापालिकेमध्ये जीबीने काही ठराव केलातर त्याची तुम्ही वरती पाठऊन मंजूरी अणु शकता का, नाही आणु शकत स्पष्ट आणि सरळ आहे. ही योजना तुम्ही जी आहे त्या प्रकारे राबवा. ही योजना हातची घालू नका. कारण ५ लाखात घर सुध्दा कमी नाही. गरीबांना आज घर मिळत नाही. ५ लाखाला बँकेचा हाप्ता सात ते आठ हजारपर्यंत येईल. एखादा व्यक्ती तेवढ भाड भरतो आणि आयुष्यभर भाडयाच्या घरात राहतो. यामध्ये त्याच स्वत:च घर होईल. केंद्राची योजना म्हणजे केंद्राच्या मंञ्यासाठी योजना नसते की तीथल्या अधिका-यांसाठी योजना नसते. योजना ही तळागाळातील लोकांसाठी असते. याच्यावरती कुठल्याही प्रकारच राजकारण न होता मा.आयुक्त साहेब तुम्हांला ही योजना राबवावीच लागेल. आपल्याकड रिस्पेक्टन आलीतर आपण राबवायलाच पाहीजे. याच्यामध्ये राजकारण आणल नाही पाहीजे. ही चांगली योजना आहे फक्त त्या लोकांच काय करायच ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे, केंद्रशासनाची नाही. आपल्या भाववाढीने आपले जास्त पैसे खर्च झाले त्याच्यामुळे आपण ही जी योजना करु पाहतो आहे त्याच्यामध्ये चांगल्या योजनेला खो नको, आणि आमचे सगळे नगरसेवक आहे त्यांच सुध्दा हे

आहे की आमच्या काळात ही योजना मंजूर झाली. नाहीतरी येणारे लोक करणारच आहेत. त्यामुळे मा.महापौर साहेब, याचा विचार नीट व्हावा, ही योजना परत पाठविलीतर त्यांच शहरवासीयांकडन काही जाणार नाही. निश्चितपणे नुकसान होणार आहे आणि तुमचा तो प्रश्न आहे ६७०० चा तो जसा आहे तसाच राहणार आहे त्यात काही बदल होणार नाही. लोकांना फसवू नका याठिकाणी जो खुलासा आहे तो सांगावा अशी मी तुम्हांला विनंती करते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण जी जेएनएनयुआरएम मध्ये घरकुल योजना राबवली त्यामध्ये ३८ स्क्वेअर मी. घर देत होतो आणि नागरीकांकडून पैसे पण कमी हिस्सा घेतलेला आहे. आता स्क्वेअर फुटामध्ये बदल तुम्हांला करता येणार नाही. घर जर ३० स्क्वेअर मीटरच देणार असूतर पुर्वीची जी वेटींगची लोक आहेत या लोकांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे न्याय दिला पाहीजे. त्यामध्ये तुमच्याकडे आलेले सर्व पेपर सुध्दा आहेत परत काही लोक अशी आहेत की कॉन्ट्रॅक्टमध्ये कामाला होते काही लोक परत परमनन्ट झालेले आहेत. पहीले त्या लोकांमधुन अर्ज मागवा. आता ज्या तुमच्या अटि शर्ती आहेत तर काहीच तीन लाखाच पण उत्पन्न आहे काहीच तेरा हजारच पण. जे तुम्ही पुर्वी तीन हजार, सहा हजार दिलेल होतं. त्यांच उत्पन्न पण वाढलेल आहे. तरी तुम्ही पहीले मधले जे ६७०० शिल्लक राहीलेले आहेत त्या लोकांचे पहीले आपण फॉर्म स्विकारावेत, सभागृहाच्या वतीने मला असं वाटत की पहीले त्यांचे फॉर्म मागवावेत फक्त येथे १४४० जे आहे ते च-होलीसाठीच आहे. माझ्या माहीतीप्रमाणे परत पिंपरी मध्ये काही जागा आहेत. काही मोहननगरमध्ये जागा आहेत या पण जागा लवकरात लवकर तुम्ही बघुन घ्या आणि त्याच पण नियोजन करा. पुर्वी आपण नागरीकांकडून ३ लाख ७६ हजार घेत होते. सुलभाताई म्हणाल्या ५ लाख घेतलेतरी नागरीक अगदी मनापासून तयार आहेत परंतु ज्या दिवशी मी घरकुलमध्ये मिटींगला गेले होते काही बँकेनी त्यांचा जो स्वतःचा हिस्सा भरला आहे तो सुध्दा त्यांना दिलेला आहे. आंध्र बँकेनी लोकांचा स्वतःचा हिस्सा भरलेला आहे तो सुध्दा त्या लोकांना बँकेनी पैसे दिलेले आहेत असे त्यादिवशी कोणीतरी बोलले आहे. हे असं असेलतर नागरीकांना वाटत की त्यांचे असे गैरसमज झाले आहेत की काही बँकानी स्वहिस्साचे पैसे घेतले आणि काही बँकानी घेतलेले नाहीत. माझी सर्वाना विनंती आहे की आपण ३० स्क्वे.फुटला आपल्याला मर्यादीत रहाव लागणार आहे त्या मर्यादीत तुम्ही रहा परंतु जे लोक वेटींगमध्ये आहेत त्यांची त्या पध्दतीने शॉटलीस्ट करा. वेटींगप्रमाणे त्यांना घ्या त्यांचा ड्रॉ काढा. पहील्या लोकांना तीतकेच पैसे भरायचे आहेत दुस-यांनाही तीतकेच भरायचे आहेत. उदया नवीन स्किम निघाली आणि लोकांना म्हणल सात लाख रुपये दया लोक म्हणणार आम्ही आणखीन कर्ज काढू. कारण आपल्या सभागृहाने नागरीकांना कमीटमेंट केलेली आहे त्या कमीटमेंटप्रमाणे जे काही असेल दिड लाखाचे तीन लाख झाले त्यावेळेला दिडचे ३ लाख ७६ हजार केले आता ३ लाख ७६ हजाराचे ५ लाख कशाला करायचे. म्हणून ३ लाख ७६ हजार जे आहेत त्याच्यावर स्टिकअप

रहावे आणि जो काही आपल्या वाटयाचा खर्च असेल तो आपण दयावा. जे त्यातल कमर्शीअल आहे मगाशी माझ्या भगिनीनी सांगीतल की कमर्शीअलच पण तुमच्या याच्यामध्ये आहे. आज घरकुलमध्ये प्रत्येक लोकांनी स्वत:ची दुकान थाटायला सुरवात केलेली आहेत स्वत:च्या हॉलमध्ये. एसआरएच्या सगळया स्किममध्ये पार्कींगमध्ये दुकान थाटायला लागलेली आहेत. मग हे जर चित्र उदया विदारक व्हायच नसेलतर याच सुध्दा टेंडर काढा व या ७६०० मधल्या काही लोकांना जर त्यातल प्रायोगीकने देता आलतर त्यांना दया. अशी माझी उपसूचना असेल. या गोष्टीला सभागृह सहमत असेल आणि यातून पुर्वीच्या लोकांनाही सहकार्य लाभेल. आपल्यालाही ही योजना घालवायची नाही म्हणूनच आज आपण चर्चा करतो. ३० स्क्वेअर मीटरवर तुम्हांला रहायच आहे. कैंद्रसरकारने व राज्य सरकारने किती पैसे दयायचे ते त्यांच ठरलेल आहे. आपल्यालाच काय करावे लागेल ते लागणार आहे. पुर्वीची ६७०० लोकांना या सभागृहाची कमीटमेंट आहे. सभागृहाने पुर्वी निर्णय घेतलेला आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.राजन पाटील साहेबांनी खुलासा करावा की जेएनएनयुआरएमची योजना होती त्याच्या अटि, शर्ती, नियम वेगळे होते, उत्पन्नाच्या दाखल्याचे दर वेगळे होते आणि आताच्या योजनेचे वेगळे आहेत. मग तुम्ही उगीचच आजचा दिवस ढकलायचा.

**मा.राजन पाटील (उपशहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताचा जो १४४२ सदनिकेचा प्रकल्प आहे यामध्ये महानगरपालिकेच कॉन्ट्रीब्युशन ७७ हजार आहे त्यामध्ये आपण जवळ जवळ ११ कोट रुपये टाकतो. आपण जी सुचना केली ३ लाख ७६ हजाराची त्याच्यामध्ये २१ कोटीची वाढ होईल. दुसर आपण विचारत होतात की लाभार्थी तेच घ्या आम्ही मुंबईला स्वत: म्हाडाकडे गेलो होतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी लाभार्थी तेच घ्या म्हणले नाही फक्त त्या ६७०० मधुन प्राधान्य दया, शॉर्टलीस्ट करा. त्यातले लाभार्थी तुमच्या अटी, शर्तीमध्ये कोणते बसतात त्यांना अर्ज करायला लावा असे म्हणलेली आहे.

**मा.राजन पाटील (उपशहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ते सर्व लाभार्थी परत अर्ज करु शकतात. ते अर्ज सर्वच लोकांना ओपन आहेत त्यावेळेला परत लक्की ड्रॉ होईल.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जस महापालिकेनी आकडा ठरवला तस आपण सुध्दा प्राधान्याने दयावे आपण त्या लोकांना कमीटमेंट केलेली आहे. मग त्या लोकांची कमीटमेंट तुम्ही का पुर्ण करणार नाहीत ती पुर्ण करा हे म्हणण्यापेक्षा याच्यामध्ये प्रायोरीटीन करा. ६७०० मध्ये जेवढ आपल्याला सहकार्य करता येईल तेवढ करा.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. येथे सहकार्य हा शब्द नाही, प्राधान्य हा शब्द दिशाभूल करणारा आहे. ते पाटीलसाहेब तुम्ही स्पष्ट करा. हे उदया पेपरला आलतर लोक सगळयांच्याच आमच्या घरी येणार आहेत. प्राधान्याचा विषय आला कुठ.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ६७०० लोकांचे राहीलेले अर्ज आहेत ते आताच्या अटि, शर्तीमध्ये बसतात. त्या लोकांना त्यांनी प्राधान्य दयाव.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे असं बोलतात की पुर्वी आपल्याकड १३२५० घर देण्यासाठी नव्हती. १३२५० घर बांधायचे असं आपण लोकांना सांगीतल. आपल्या शहरातील कोणत्याही व्यक्तीनी मा.महापौरांना, आयुक्तांना पत्र दिलेले नव्हत की काहीही करा माझ आर्थीक उत्पन्न कमी आहे, मला घर दया. अशी कोणत्याही नागरीकांना आपल्याला मागणी केलेली नव्हती. तुमच्या पक्षाला वाटल की आपण घर दिल पाहीजे, आणि ते केल, केलतर हरकत नाही चांगली गोष्ट केली. निश्चितपणे त्यासाठी तुमच कौतूक केल पाहीजे. जर त्या लोकांना ६१८४ च घर देण्यासाठी होती तर मग आपण १३२५० लोकांचे अर्ज का घेतले आणि त्यांना वेटींगला का ठेवलं. कोणता अधिकार त्यावेळेस राष्ट्रवादी कॉंग्रेसला होता. लोकांना खोटी स्वप्न दाखवाची, लोकांच्या भावनेशी खेळायचं. ते ज्याठिकाणी भाडयाने राहत होते त्याठिकाणी ते समाधानी होते. मग अशावेळेला आपण असं करायच आणि आज शेकतय असं दिसल की मग नियमात बसत नाही, हे करता येत का ते करता येत का असं करुन पुन्हा लोकांच्या भावनेशी खेळू नका. प्रत्येकवेळेला चुकीचे विषय करायचे, चुकीच्या पध्दतीने वागायच आणि पुन्हा म्हणायच की आम्ही हे सगळे लोकांसाठी करतो. निश्चितपणे गोरगरीबांचा कळवळा असलाच पाहीजे. ज्या शहरामध्ये आपण राहातो त्या शहरामध्ये जे काही नागरीक राहतात त्या गोरगरीब नागरीकांसाठी आपण योजना राबवलीच पाहीजे. ही आपल्याला सर्वांना संधी आहे ती आपण डावलू नये त्या संधीच आपण सुध्दा सोनं केल पाहीजे परंतु पुन्हा एकदा शब्दांचे खेळ करुन लोकांच्या भावनेशी खेळू नका जितकी घर आहेत तीतकी त्यांना संधी दिलीतर आम्हांला पण आवडणार आहे. मागचे शिल्लक राहीलेले वेटींगचे लोक आहेत त्यांना संधी दिलीतर ते आम्हांला आवडणार आहे याची नोंद घ्या. परंतु तसे आपण देऊ शकतो का हे आज आपण सभागृहात क्लिअर करा. नुसतीच पेपरबाजी करायची, जसे आपण मागे फ्लेक्स लावले, यांव त्यांव, त्यांव तसंच पुन्हा एकदा आम्ही केलं, आम्ही बोललो. पुन्हा एकदा केंद्रसरकारने, राज्यसरकारने केलं नाही. जे होऊ शकत नाही ते त्यांनी केलं नाही असं म्हणून त्यांच्या माथी मारण्यापेक्षा निश्चितपणे आपण ते करु शकतो का याची भुमीका राजन पाटील साहेबांनी सभागृहात स्पष्ट करावी. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा की आपण हे करु शकणार आहोत का. करणार असालतर आम्हांलाही आनंद होणार आहे कारण त्या लोकांना, जे काही ६५०० लोक शिल्लक राहीलेले आहेत आणि जर तस होणार असेलतर निश्चितपणे

नियमात बसून त्याच लोकांना प्राधान्य दयाव. परंतु होतय का नाही फक्त पेपरबाजी, भाषणबाजी करु नका जे खरं आहे जस आम्ही नेहमीच खरं बोलतो आम्ही पुराव्यानिशी बोलतो, त्या पुराव्यानिशी तुम्ही पण बोला.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला वाटते काहीतरी विसंगती होते. वास्तविक पाहता येथे कोणालाच असं वाटत नाही की गरीबाला घर मिळू नये. मंगलाताईच म्हणण असं आहे की जी यादी आपण शॉर्टलिस्ट केली होती ते लोक आहे पुर्वीची फ्लॅटची जी साईज होती ती वेगळी आहे. आताची साईज छोटी आहे. जरी छोटी असलीतरी नियमाने ती बदल करता येत नाही तो पाटील साहेबांनी खुलसा केला. आपली जी वेटींग लीस्ट आहे त्या वेटींग लीस्टमध्ये पुन्हा एकदा नीट शॉर्टींग करुन त्यातलेही पुन्हा पात्र आहेत का. पुन्हा असे होऊ नये की सत्ताधा-यांनी काहीतरी उपसूचना केली आणि काहीतरी चुकीच केलं. जी लोक वेटींगमध्ये आहेत त्यांच आपल्याला जेएनएनयुआरएम मध्ये किंवा त्यामध्ये घर दयायची होती ती देता आली नाही. ठिक आहे त्याला अनेक कारण आहेत. कमीटमेंट प्रमाणे लाभार्थी वाढत असेल आणि १ लाख २४ हजारचा इतका भुर्दंड बसतो. महापालिका १ लाख २४ हजाराचा भुर्दंड सोसायला तयार आहे अशाप्रकारची उपसूचना त्यांनी दिलेली आहे नवीन लोकांना नवीन जे अर्ज करायचे त्यांना ते पाच लाखामध्ये अर्ज करायचे असं सगळयाचंच म्हणण आहे. परंतु जुनी जी लोक राहीलेली आहेत त्याच्यासाठी १ लाख २ हजाराचा फंड उचलायला तयार आहोत अशाप्रकारची उपसूचना दिलेली आहे.

**मा.महापौर -** आपण लोकांसाठी खर्च उचलायला तयार आहोत, राजन पाटील म्हणतात की तशाप्रकारे होऊच शकत नाही.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जे पात्र आहेत त्यांना मागच्यावेळेस आपण कमिटमेंट केली तर त्याचा जो काही भुर्दंड होतो तो आपण कमिटमेंट म्हणून ते करता येईल.

**मा.राजन पाटील** **(उपशहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पंतप्रधान आवास योजनेचा फॉर्म सुध्दा वेगळा आहे. याच्यामध्ये प्राधान्य असे काही नाही. आम्ही त्यांच्याशी पुर्ण चर्चा केली आहे. यामध्ये ते लोक अर्ज करु शकतात. आम्ही त्यांना विचारले होत या लोकांना कसं प्राधान्य देता येईल तर ते म्हणाले की त्या लोकांबरोबर बाकीच्या लोकांचे अर्ज आलेतर त्या सगळयाची स्क्रूटीनी होईल आणि त्याचा लक्की ड्रॉच होईल. याच्यामध्ये काही शॉर्टकट नाही.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या आवास योजनेमध्ये आपण किती घर बांधु शकतो.

**मा.राजन पाटील** **(उपशहर अभियंता)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताची च-होलीची जागा आहे त्याच्यामध्ये १४४२ घर आपण बांधु शकतो. अजुन डुडूळगाव

आहे ते ताब्यात नाही. एक ते दिड वर्षामध्ये तीन जागा आपल्या ताब्यात येतील. आपल्या डुडूळगाव आणि रावेतच्या या जागा लवकर ताब्यात येतील. रावेतची जागा दिड हेक्टर आहे आणि डुडूळगावची दोन हेक्टर जागा आहे.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे १४४२ घर म्हणतात आणि आपण ६ ते ७ हजार घर म्हणतो. याचा ताळमेळ कुठ बसणार नाही. आपल्या कोणाचाही या योजनेला विरोध नाही. परंतु आपली जी मागची लोक राहीलेली आहेत त्या लोकांना आपण कशी घर देणार. त्यासाठी जो काही विलंब झाला आहे तो विलंब राष्ट्रवादी पक्षाने केलेला नाही. त्याचे फॉर्म काही राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यालयात मिळत नव्हते. प्रश्न असा आहे की प्रशासनाने जी चुक केलेली आहे ती आम्ही दुरुस्त करायची म्हणतो रेड झोनमध्ये बांधल, चुकीच्या जागेमध्ये बांधल, हे केलं, ते केलं. ही प्रशासनाची चुक आहे. आकडा जो दिला आहे तो पण तुम्हीच दिला आहे. वेटींगला लोक लावले आहेत ते तुम्हीच लावले. आम्ही लावायला लावले नाहीत वेटींगला लोक. आणि म्हणून आम्ही म्हणतोत की वेटींगची जी लोक आहेत या लोकांना कसा न्याय देता येईल हा त्याच्या मागचा हेतू आहे. येथे म्हणल जात की चुकीची फिगर सांगू नका, लोकांची दिशाभूल करु नका, अमुक करु नका, तमुक करु नका. आम्ही काही बाहेर झेंडा लावुन बसलो नव्हतो फॉर्म दयायला. जर प्रशासनाने ही चुक केलेली आहे तर त्यांनी ती जबाबदारी स्विकारावी. त्याच खापर आमच्या डोक्यावर कशाला फोडायच. आता स्वप्न पडलेले नव्हते. आता आवास योजनेसाठी काही लोक गेलेले होते का मागायला मा.पंतप्रधानाकड. त्या स्किम प्रमाणे ती राबवायच काम कुणाच होतं. जेएनएनयुआरएम मध्ये दिड लाख होते आता १ लाख ७० हजार म्हणजे त्यावेळेस वीस हजार रु. कमी होते. आता महागाई वाढली आहे. सगळे वाढले त्यामुळे खर्च वाढला पाहीजे होता परंतु ते वाढले नाहीत. आम्ही काही टिका करत बसलेलो नाही. आमच म्हणण असं आहे की पुर्वीच्या तुलनेमध्ये वीस हजार रु. कमी केले. आम्ही म्हणल का, देऊ नका म्हणून. वेटींग लीस्ट कुणी लावली. वेटींग लीस्ट आम्ही लावायला लावली का. पुर्वी जेएनएनयुआरमध्ये जे काही लाभार्थी होते, फॉर्म भरले गेलेले होते ते प्रशासनाचे नियोजन होत आम्ही राजन पाटील यांना बोलून सांगीतल नव्हतं. आता याठिकाणी सिमाताईनी उल्लेख केला जेव्हा तानाजी खाडे बोलले त्यावेळेस त्या म्हणाल्या की तुम्ही पहीली माहिती घ्या आणि मग बोला. मग आम्हांला हेच म्हणायच आहे आता सुध्दा प्रशासनाने केंद्राचे दिड लाख रुपये, राज्याचे एक लाख रुपये हे आकडे आपल्या समोर आता आल्याच्या नंतर त्यांनी काय सांगीतल की आम्ही कॅलक्यूलेशन केलं. त्यावर उबाळेताई म्हणाल्या तुम्हांला कॅलक्यूलेशन कोणी दिलं. याच्यात तुम्ही पैसे खर्च केले का. म्हणजे आम्हांला हेच म्हणायच आहे की प्रशासन परस्पर हे सगळा उदयोग करतं आणि त्यानंतर अशाप्रकारचे फसवे आकडे समोर ठेवायचे मग त्याच्यावर चर्चा होते आणि त्याच्याबद्दल सत्ताधा-यांवर खापर फोडल जातं. ही प्रशासनाची चुक आहे मग त्यांना कोणी तो

अधिकार दिला. हे ठेवायच्या अगोदर प्रशासनाने आम्हांला विचारायच होतं. की हे असं असं आहे केंद्राचे एवढे पैसे, राज्याचे एवढे पैसे आहेत त्यानंतर येणारा खर्च असा असा आहे. लाभार्थ्याकडून एवढा खर्च आहे. मग हा अधिकार त्याना कोणी दिला. हे दिल होतं तर याच्या बद्दल आम्हांला पुर्ण माहीती पाहीजे होती. केंद्राचे पैसे एवढे, राज्याचे पैसे एवढे, महापालिकेचा हिस्सा एवढा, लाभार्थ्याचा हिस्सा एवढा. कुठल्या कमिटीची त्याला मंजूरी घेतलेली आहे का. डायरेक्ट जनरल बॉडीमध्ये विषय ठेवला आहे. मग हे चुकीच नाही का. अशा पध्दतीने विषय ठेवायचे आणि यांनी मात्र तोंडसुख घ्यायच. मा.महापौर यामध्ये आपण सांगीतल्याप्रमाणे जर काही बदल होत नसेलतर माझी विनंती आहे हा आहे तसा विषय मंजूर करावा.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, योगेश बहल यांनी जो विषय मांडला त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर-** आहे तोच मुळ विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९६८ विषय क्रमांक - ८

दिनांक- २२.१२.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
स्वभाअक/३/कावि/६६/२०१६ दिनांक ३/१२/२०१६

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्र शासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती | २,४४,९६,०००/- | ४,८९,९२,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | शौचालय | | |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमता बांधणी | १,५०,०००/- | ४६,०००/- |
| ५ | **एकूण** | **२,८७,०३,०००/-** | **५,०३,९१,००० /-** |
| | | **केंद्र शासन व राज्य शासन एकूण अनुदान** | **७,९०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/११/२०१६अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ८६३२ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत<br><br>स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ६५५७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ४३८२ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ३७८९ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ३३०७ | |

| | | | |
|---|---|---|---|
| शौचालयांची संख्या | | | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ४०९७ लाभार्थी | GOI+GOM=२४५.४२लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =८१.९४ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३२७.७६ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | २३५४ लाभार्थी | GOI+GOM=१४१.२४ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =४७.०८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१८८.३२ लाख** | |

स

बब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.सुमान नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भारत स्वच्छता अभियानामध्ये आता सभागृहापुढे जो विषय आहे असा विषय आमच्या क प्रभाग समितीच्या पुढे सुध्दा विषय होता आणि त्यामध्ये हागणदारीमुक्त जे प्रभाग करायचे होते ते वॉर्ड करायचे होते दुर्दैवाने त्याठिकाणी माहिती अशी मिळाली कि संततुकारामनगर हा प्रभाग हागणदारीमुक्त आहे. आयुक्त साहेब याची व्याख्या मी आता वाचली ज्या ठिकाणी ओपन डेफिकेशन होत असेल त्याठिकाणी हागणदारीमुक्त करण्याचा विचार असला पाहीजे. अ प्रभागामध्ये सुध्दा काही भाग निगडी-प्राधिकरण सारख्या ऐरीया आपण हागणदारीमुक्त करतो. जिथे ओपन डेफिकेशन होतच नाही किंवा संततुकारामनगरमध्ये ओपन डेफिकेशनला जागाच नाही म्हाडाची घर आहेत, सगळयांची स्वतंत्र शौचालय आहेत, उच्चभ्रू लोकांची सोसायटी आहे त्याठिकाणी आपण कसंकाय हागणदारीमुक्त करु शकतो. आणि म्हणून महानगरपालिकेला स्वच्छतेचे पुरस्कार मिळतात. साहेब, कुणाच्या डोक्यात धुळफेक आपण करतो. क प्रभाग समितीला विषय माघारी घ्यायला लावला, प्रशासनाला. ज्याठिकाणी ओपन डेफिकेशन होत नाही त्याठिकाणी हागणदारीमुक्त तुम्ही म्हणूच शकत नाहीत ही साधी, सरळ, सोपी व्याख्या

असताना सुध्दा काही पदाधिकारी आणि अधिकारी मिळून स्वच्छतेचे पुरस्कार खोट बोलून आणतात आम्हीतर सांगीतल होत की आपल्या महानगरपालिकेच्या पाठीमागे हागणदारी आहे ती पहीले घालवा. परंतु तसे न करता एखादया चांगल्या भागाला आपण हागणदारीमुक्त म्हणतो आणि त्याठिकाणी म्हणजे माझ्या वॉर्डामध्ये १२०० शौचालय बांधुन आहेत. सेंटर संस्थेनी केले आणि काही शंभर ते सव्वासे लोकांनी अनुदान घेतल. जिथे उंब-याची संख्या १७०० ते १८०० आहे त्यामध्ये १२०० लोकांनी जर घरामध्ये शौचालय बांधले असतील आणि वापरात असतीलतर त्या वस्तीला हागणदारीमुक्त म्हणु शकत नाही. आणि जिथ चांगली वस्ती आहे संततुकारामनगर भाग, अ प्रभाग असेल, ड प्रभागाचा काही ऐरीया असेल म्हणजे चांगल्या ऐरीयात, उच्चभ्रू ठिकाणी यांनी हागणदारीमुक्त जाहीर केलं केवळ आकडयाचा खेळ करायचा आणि स्वच्छतेचे पुरस्कार घ्यायचे आणि मग आमचा स्मार्ट सिटीत समावेश का झाला नाही मग आम्हांला आसच का डावललं, तसच का डावललं आरोप करायला मोकळे. सन्मा.महापौर साहेब, मगाशी एका सदस्यांनी सकाळ पेपरचे उपसंपादक मा.अविनाशजी चिलेकर यांच्यावर अत्यंत घाणेरडा आरोप केला पेडन्यूज घेता का याला खालून शिकवण्यात येत होतं तानाजी खाडेना त्यांचा मी तीव्र शब्दात याठिकाणी निषेध करते. याठिकाणी कुठल्याही पत्रकार बंधुवर जर असा आरोप होत असेलतर त्यांचा सगळयांचा मी निषेध करते. प्रामाणिकपणे काम करणारा कार्यकर्ता असेल, नगरसेवक असेल आणि एखादा पत्रकार असेल आणि त्याचा जर तुम्ही हा असा सभागृहामध्ये उपमई जर करत असालतर तुमचे बुडायचे दिवस आलेले आहेत. काय बोलतो आपण आणि कोणा बद्दल बोलतो. खोटं बोलून पुरस्कार घेतात. चांगल्या भागाला हागणदारीमुक्त दाखवतात. आणि तरी म्हणतात खरं छापलतर पेडन्युज आहे का. पेड आहेतर तुमच्याकड पैशाला कमीच नाहीना पेडच पेड लावलेले आहेत, झाडच आहेत हालवा आणि दया. आपण कोणाला बोलतो काय बोलतो त्यांची उंची काय आपली उंची काय, त्यांच ज्ञान कुठे, आपल ज्ञान कुठे एखादा पत्रकार गरीब आहे म्हणून त्याला तुम्ही काहीही बोलणार. माझ्यासाठी सगळे पत्रकारबंधु माझे गुरु आहेत. हो, त्यांनी माझ्या बातम्या छापल्यात पण त्यातला तथ्य समजून त्यांनी छापलेल्या आहेत त्यांनी दाखवलेले आहे. मिडीयाने मला डोक्यावर घेतल असेल जे जे कार्यकर्ते प्रामाणिकपणे काम करतात त्या सगळयाना ते डोक्यावर घेतात. उदया जर आम्ही सत्तेत असूतर आम्हांला सुध्दा तेवढच ते पायदळी तुडवणार आहेत. चुकल तिथ आमच्या सुध्दा पाठीशी असलेतरी त्यांनी लाथ घातलीच पाहीजे या मताची मी आहे. हा लोकशाहीचा तीसरा स्तंभ आहे आणि हा जागृत स्तंभ आहे त्या स्तंभाला याठिकाणी ज्यांनी कोणी डाग लावला असेल त्या तानाजी खाडेंचा याठिकाणी मी तीव्र शब्दात निषेध करते. आणि ज्या लोकांनी त्यांना प्रवृत्त केल ज्यांनी त्याना उचकावलं त्यांचा सुध्दा मी निषेध करते. ते या सभागृहाचे जुनेजाणते नगरसेवक असताना सुध्दा ते खालून म्हणत होते म्हणं की त्यांनी पेडन्यूज घेतली का, म्हण त्यांनी असं केलं का. हे जे काही झाल ते आजच्या या

मावळत्या सभागृहात योग्य लक्षण नाही. मा.महापौर मला घरकुलवरती खुप बोलायच होत परंतु मी बोलले नाही, धन्यवाद.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुकारामनगर केंद्रसरकारचे स्वच्छ भारत अभियान हे नरेंद्र मोदी साहेबांनी आणलेलं आहे. मी नगरसेवक तानाजी खाडे आज याठिकाणी सांगतो १९९७ साली माझ्या प्रभागामध्ये १५६३ ओटयामध्ये १ कोटी ६ लाखाचा खर्च करुन प्रत्येकी ५०० रु. लाभार्थ्याकडून घेवून मी स्वत: माझा हागणदारीमुक्त ऐरीया केलेला आहे आणि मी सिनीअर आहे ज्यावेळेस प्रभागामध्ये काम करत असताना चांगल्या कामाच कौतूक केलच पाहीजे. आज माझ्या भागात जो माझा वॉर्ड आहे तो प्रभागामध्ये घेतला नाही त्याच कारण असं की स्पाईन रोडला जी झोपडपट्टी होती ती सुलभाताईच्या वॉर्डातील होती, सुलभाताईंचे मतदार होते. त्यावेळेस रस्त्याला जागा दयायची होती माझ्याकडची मोकळी जागा होती त्या लोकांला कुठ रस्त्याला जाऊ नये म्हणून मी माझ्याकडची जागा दिली. कारण त्यांचा ड्रॉ झालेला आहे. त्यांना बिल्डींग तयार आहे बिल्डींगमध्ये त्यांना घर नंबरसहीत अलौट झाली फक्त चावी दयायची आणि ताब्यात घ्यायचे परंतु शुल्लक कारणाने रेडझोन, आज हे माझा निषेध करतात मला त्यांना सांगायच, रेडझोन जो आला तो कशामुळे आला ठेकेदारांनी तुमचे मनमानी पैसे दिले नाही त्याच्यामुळे आला...

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सिमाताई हे सभागृह आहे तुम्ही खाली बसा सिमाताई खाली बसा

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सिमाताई हे सभागृह आहे आपण नगरसेवक आहात खाली बसा. तानाजी खाडे तुम्ही विषयावर बोला. दोघानीही खाली बसावे. हे सभागृह आहे भांडण करु नका.

(सभागृहात गोंधळ)

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर तो दंड थोपटतो, त्यांनी बाईचा अपमान केला.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सभागृहाचा अवमान दोघानी केलेला आहे आपण दोघानीही सभागृहा बाहेर जावा. तानाजी खाडे तुमच चुकीच आहे हे दंड थोपटणं. तुम्ही दोघांनीही सभागृहाचा अवमान केलेला आहे दोघानीही सभागृहा बाहेर जावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** तानाजी खाडे तुम्ही खाली बसा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** विषय क्रमांक ८ मंजूर करण्यात येत आहे. विषय क्रमांक ९ घ्यावा. तानाजी खाडे खाली बसा. तुम्हांला बोलायला चान्स दिलेला होता तुम्ही गैरवर्तन सारख बोलायला लागले, दोघानीही बाहेर जा. दोघानीही सभागृहाचा अपमान केलेला आहे दोघानीही बाहेर जा. विषय क्रमांक ८ मंजूर करण्यात येत आहे, विषय क्रमांक ९ मांडावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९६९ विषय क्रमांक - ९

दिनांक- २२.१२.२०१६ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. क्रमांक- वैद्य/१४/कावि/८००/२०१६ दिनांक -०५/१२/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी तसेच कुटुंब व्याख्येनुसार त्यांचे वर अवलंबुन असणारे कुटुंबीय आणि सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी (पती/पत्नी) यांचेसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु करणेत आलेली आहे.

त्यानुसार दिनांक १ एप्रिल २०१६ ते ३१ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत धन्वंतरी योजनेमध्ये अधिकारी/कर्मचारी आणि त्यांचे अवलंबित तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे अवलंबित यांनी उपचार घेतले असून त्यांची बिलांची संख्या ५१६५ इतकी झाली आहे. त्यापैकी अद्यापपर्यंत ३२४१ रुग्णांवर उपचारापोटी केलेल्या बिलांची रक्कम अदा करणे प्रलंबित आहे. सदर प्रलंबित बिलांची रक्कम ही र.रु.१३,८९,१९,९७०/- इतकी आहे. त्यामुळे र.रु.१३,८९,१९,९७०/- ची अदायगी धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयांना अदा करणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे झालेला खर्च हा पॅनलवरील रुग्णालयांमार्फत महानगरपालिकेच्या कर्मचा-यांवर झालेला असल्यामुळे सदरची बिले रुग्णालयांना अदा करणे क्रमप्राप्त आहे.

धन्वंतरी स्वास्थ्य योजना या लेखाशिर्षावर सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी र.रु. ९ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी दि.९/११/२०१६ अखेर र.रु.७,७६,२०,३२१/- इतकी रक्कम खर्ची पडली असली असून र.रु. १,२३,७९,६७९/- इतकी तरतूद शिल्लक आहे.

धन्वंतरी योजनेअंतर्गत दरमहा प्राप्त होणा-या कर्मचारी वर्गणी व महापालिकेचा हिस्सा याचा विचार करता धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचे लेखाशिर्षावर अतिरिक्त किमान र.रु.११ कोटीची तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम आर्थिक अनुदान (Cross Subsidy) स्वरुपात वैद्यकीय विभागाचे इतर लेखाशिर्षावरुन धन्वंतरी योजनेचे लेखाशिर्षावर वर्ग करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

स्थायी आस्थापना - ३ कोटी

अस्थायी आस्थापना - १ कोटी

उपकरणे खरेदी - ६ कोटी

एन.यु.एच.एम. - १ कोटी - **एकूण र.रु. ११ कोटी**

सबब, वर नमूद केल्याप्रमाणे एकूण र.रु. ११ कोटी इतकी रक्कम धन्वंतरी स्वास्थ्य योजना या लेखाशिर्षावर वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९७० विषय क्रमांक - १०

दिनांक- २२.१२.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.विधी समिती</u>**

अ) दि. २/९/२०१६ व दि. ७/९/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. १४/१०/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ९७१ विषय क्रमांक - ११

दिनांक- २२.१२.२०१६ विभाग - मा.नगरसचिव

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

दि.२६/१०/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्व अधिकारी, सर्व पत्रकार, सर्व नागरीक व सर्व कर्मचारी. या पंचवार्षीक मधली ही जी बी आहे, आचारसंहिता कधी लागेल हे माहिती नाही व पुढची जीबी होईल असे वाटत नाही. आणि म्हणून आताची जीबी ही या पंचवार्षीक मधील शेवटची जीबी असे समजून महापौर तुमचे

नगरसचिव, आयुक्त सर्व अधिकारी, कर्मचारी या सर्वांनी या पंचवार्षीक मध्ये आम्हांला सगळयांनी खुप चांगल सहकार्य केलेले आहे मी सगळयांचे मनापासून आभार मानते मग ते अगदी क्लेरीकलमधील लोक आहेत त्यांचे, शिपाई पाणी देतात त्यांचे, सिक्युरीटी असेल या कॉर्पोरिशनमधल्या सगळया लोकांचे राष्ट्रवादी कॉंग्रेस तर्फे मी आभार मानते. मा.महापौर तुम्ही सुध्दा ही आडीच वर्षाची कारकिर्द उत्कृष्टपणे चांगल्या पध्दतीने, सर्व पक्षाचे महापौर असतात त्या पध्दतीने काम केलं तुमचे सुध्दा मनापासून आभार मानते आणि ही शेवटची सभा आहे परत एकदा सर्वांना नाताळाच्या आणि नवीन वर्षांच्या हार्दीक शुभेच्छा देऊन थांबते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.महापौर -** आचारसंहिता कधी लागेल ते सांगता येत नाही माझ्या कार्यकाळात ज्या नगरसेवकांनी मला चांगली साथ दिली, माझ्या पक्षानी साथ दिली, इतर नगरसवेकांनी साथ दिली. चांगल काम करण्याची संधी मला याठिकाणी दिल्यामुळे मला आडीच वर्षे मिळाली याच श्रेय खरंच तुमच्या सर्वांना आहे म्हणून हे सभागृह मी चालू शकले. सर्वांना नाताळाच्या हार्दीक शुभेच्छा, येणार नवीन वर्षे आपल्याला सुखाच, समृध्दतीच जाओ. इलेक्शन आहे त्याच्यासाठी आपल्याला शुभेच्छा देते. सन्मा.नगरसेवक, नगरसेवीका, आयुक्त, अधिकारी वर्ग, माझा कामगार वर्ग यांनीही खुप सहकार्य केलं या सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

---------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/८७/१७
दिनांक - २२/०२/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.